मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.


सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

अनुक्रमणिका



अनुक्रमणिका



प्रा. प्रभाकर उध्वरेषे : हरवलेले दिवस

प्रा. उध्वरेषे यांचे १० जुलै १९८९ रोजी पुणे मुक्कामी निधन झाले. विदर्भ साहित्य संघाच्या व युगवाणीच्या जडणघडणीच्या प्रवासात प्रा. उध्वरेषे यांचाही महत्त्वाचा वाटा आहे.

१९६८-७१ या कार्यकाळात ते विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीचे सदस्य व युगवाणीचे संपादक होते. येथल्या वाङ्मयीन - सांस्कृतिक - शैक्षणिक जीवनात ते त्यांच्या मिसळून जाण्याच्या स्वभावाने त्या वातावरणातले एक अभिन्न घटक झालेले होते. विशिष्ट तात्त्विक चिंतनाने, कायनि प्रेरित होऊन त्यात आपला जीवनाकार शोधण्याच्या आज दुर्मिळ होत चाललेल्या जीवनदृष्टीच्या या समर्थकास युगवाणीची ही विनम्र भावपूर्वक श्रद्धांजली.

अनुक्रमणिका

युगवाणी

॥ विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ॥

संपादक : श्रीपाद भालचंद्र जोशी

प्रबंध संपादक : केशव जोशी

वर्ष पंचेचाळीसावे / अंक ७-८-९ जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९८९

मूल्य-१० रु. /वार्षिक वर्गणी : ३९ रु

त्रैवार्षिक वर्गणी : ९० रु.

अनुक्रम ■ ■ ■

[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

संदर्भ सेवा : चंद्रकांत कुळकर्णी, आमंत्रक, श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय, वि. सा. संघ, नागपूर

आवरण पृष्ठ : संजय धोतरकर / रेखाटने : भाऊ समर्थ

मुद्रित शोधन / संकलन / प्रतिलिपी इ. सहकार्य : सौ. शोभा उबगडे /श्यामकांत कुळकर्णी /

जाहिरातविषयक संपर्क : संयोजक, प्रकल्प विभाग, वि. सा. संघ, नागपूर

संपादकीय पत्रव्यवहार : संपादक / युगवाणी, विदर्भ साहित्य संघ

झाशी राणी चौक /नागपूर-४४० ०१२

मराठीतील वाङ्मयीन व युगवाणीसारख्या इतर नियतकालिकांच्या अस्तित्वाचा प्रश्न हा युगवाणीच्या नव्या संपादन कार्यकाळाचे सुरुवातीसच अग्रक्रमाचा प्रश्न म्हणून जाणवलेला होता. तो ज्या स्वरूपात जाणवला तसा मांडण्याच्या केलेल्या प्रयत्नास वाङ्मयीन नियतकालिकांच्या विश्वातून तसेच वाङ्मयप्रेमी वाचकांकडून लाभलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने या समस्येबाबत सामुहिक कृतीची व्यक्तविलेली गरज अधिक सुस्पष्ट होण्यास सहाय्य केले आहे.

'मायमराठी'च्या संपादकांनी ही समस्या विस्तृतपणे मांडणारे युगवाणीचे संपादकीय पुनर्मुद्रित करण्याची केलेली विचारणा, अनुष्टुभ, कवितारती या नियतकालिकांच्या संपादकांनी अशा नियत-कालिकांच्या अस्तित्वासंबंधाने व्यक्त केलेली सामुहिक कृतीची गरज व त्याबाबत त्यांचेही असलेले काही विचार, याच अंकातील वाङ्मयीन नियतकालिकांच्या अस्तित्वासंबंधाने आयोजिलेल्या चर्चेत काही दैनिक वृत्तपत्रांच्या संपादकांनी शोधलेले याबाबतचे वास्तव, वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रा. राम. शेवाळकर यांचे या चर्चेतील भाष्य, युगवाणीच्या संपादकीयात सुचविलेल्या काही उपायांचा पाठपुरावा करणारा दैनिक लोकमतचा अग्रलेख व युगवाणीच्या वाचकांच्या या समस्येबाबतच्या युगवाणीच्या संपादकीयावरील, या अंकात समाविष्ट प्रतिक्रिया यांनी युगवाणीने या समस्येचा घेतलेला वेध अचूक असल्याची व तो अनाठायी, अवेळी नसल्याची पावतीच दिलेली आहे.

त्याबद्दल युगवाणी या साऱ्यांची कृतज्ञतापूर्वक आभारी आहे. या समस्येने ज्यांना ग्रासलेले आहे. अशा महत्वाच्या नियतकालिकांचा उल्लेख करताना या अगोदरच्या संपादकीयात आलोचनेचा नामनिर्देश करण्याचे राहून गेले होते. प्रा. वसंत दावतरांनी त्याबद्दल क्षमा करावी.

या माध्यमाच्या विकासार्थ सर्व संबंधितांचे विचार, सूचना व अपेक्षा जाणून घेऊन करावयाच्या सामूहिक कृतीची योजना आखणे या प्रतिसादामुळे आता अधिक सुलभ होईल यात शंकाच नाही.

या वाङ्मयीन नियतकालिकांनी आपले कार्य व्यवस्थित पार पाडावे असे वाटत असल्यास भाषा, साहित्य, संस्कृती, कलासृजन, संशोधन यांच्या वैचारिक बाजूंची चर्चा करणारी ही नियतकालिके समकालीन समाजापासून वेगळी, असंबद्ध व एकाकी राहून अथवा तशी राखून त्यांचेकडून ही अपेक्षा पूर्ण करवून घेतल्या जाऊ शकत नाही हे देखील लक्षात घेतले पाहिजे. त्यांचे स्थान स्वायत्त असण्याच्या किंवा ते तसे राखण्याच्या नावाखाली स्वायत्तता भोगण्याची शिक्षा म्हणून त्यांचे रखडत जगणे हे त्यांचे प्राक्तनच असल्याचा व ते त्यांनी स्वत:ला खार लावूनच भोगत राहाण्याचा सिद्धांत मांडणारे आपली एकतर या नियतकालिकांप्रती असणारी जबाबदारी टाळत तरी आहेत किंवा ही नियतकालिके जगली काय किंवा मेली काय, त्यांना त्याचे कसलेच सोयरसुतक असणार नाही असाच त्याचा अर्थ होतो. असे सिद्धांत मांडणाऱ्यांनी, दोन लाख रुपयांचा निधी उभारण्याची कल्पना मांडून, ट्रस्ट स्थापून, काहीही करून 'अभिरुची' जगलीच पाहिजे या वेडाने झपाटलेली मानसिकता टिकविणाऱ्या व्यक्ती व संस्था याही काळात आहेत व वाङ्मयीन संस्कृतीचे वहन वेळोवेळी अशा मानसिकतेनेच केलेले आहे हेही विसरून चालणार नाही.

या वाङ्मयीन नियतकालिकांनी आपली भूमिका व कार्य व्यवस्थितपणे पार पाडावे अशी ज्यांची ज्यांची इच्छा असेल त्या त्या वर्तमानपत्रांनी, गावोगावच्या महाविद्यालयांनी, ग्रंथालयांनी, विदर्भ साहित्य संघासारख्या साहित्य संस्थांच्या गावोगावच्या शाखांनी व वाङ्मयीन सांस्कृतिकतेशी कर्तव्य असणाऱ्या साऱ्याच घटकांनी, माध्यमांनी पुनः एकदा या समाजातील हरवलेले, वाङ्मयीन चैतन्याने भारलेले, वातावरण जागविणारा सांस्कृतिक उठाव, वाङ्मयीन जागर, उत्साहपूर्वक सुसंघटित करण्यातील आपआपली भूमिका नव्याने पार पाडण्याचे ठरविल्याशिवाय तरणोपाय नाही. हे वातावरण असण्याची गरज भासल्याशिवाय ती गरज भागविणाऱ्या युगवाणीसारख्या नियतकालिक साधनांना आपली भूमिका, कार्य, दर्जा व त्यांची नियमितता कायम राखू शकण्यास सामर्थ्यच प्राप्त होऊ शकत नाही. ज्या ज्या कालखंडात युगवाणीसारख्या वाङ्मयीन नियतकालिकांनी आपले कार्य अधिक दर्जेदार व अधिक प्रभावीपणे केलेले आढळते त्या त्या कालखंडातील वाङ्मयीन व सांस्कृतिक उठावाचे वातावरण आठवून बघितल्यास हे म्हणणे पटू शकेल.

अशा नियतकालिकांच्या झपाटलेल्या संपादकांसोबतच, चेतलेले वाङ्मयीन-सांस्कृतिक वातावरण व वाङ्मयीन संस्कृतीचा घटक असण्याच्या आकांक्षेने धडपडणारी सामाजिक मानसिकता हवी असते. ती विझून जाऊन तिची जागा ज्या बाबींनी घेतलेली आहे, त्या बाबींचा जीवनात स्वीकार करावयास भाग पाडणाऱ्या समकालीनतेशी देखील या समस्यांची नाळ जुळलेली आहे; हेही दुर्लक्षून चालणार नाही.

अत्यंत मिळमिळीत, गुळमुळीत, गुळगुळीत, चटपटीत, खमंग, रंगीन, भेदरलेल्या, भांबावलेल्या, धास्तावलेल्या, एकमेकांचा टोकाचा अनुनय करण्यात गुंतलेल्या व त्यायोगे कसेही करून छोट्या-मोठ्या लाभाच्या बाबी पदरात पाडून घेऊ इच्छिणाऱ्या संस्कृतीचा लेखक-कलावंत देखील एक घटक झालेला आहे. परिणामी, वाट्याला आलेल्या वाङ्मयीन संस्कृतीला असल्या चर्चा या अकारण, निष्फळ, वांझ, केवळ टिंगल-टवाळी करण्यायोग्य अथवा टोकाच्या अतिरेकी वाटू लागल्या असल्यास नवल नाही.

कलासृजन, कलाव्यवहार आणि त्याचे तात्त्विक चिंतन यांचा व्यक्ती व समाजाशी संबंध प्रत्यक्ष जाणवत नसला तरी या बाबी व्यक्तीचा व समाजाचा वैश्विक, सैद्धांतिक, नैतिक असा जीवनविषयक, मूल्यविषयक पाया रचणाऱ्या बाबी असून, व्यक्ती व समाजाची सांस्कृतिकता व तिचा दर्जा त्यातूनच निर्माण होत असतो; कायम टिकू शकतो, अभिवृद्धी पावतो. दुर्दैवाने या प्रकारच्या सांस्कृतिकतेशी कर्तव्य नसणारे समाजमन घेऊन हा समकालीन समाज वावरत असल्याचे चित्र आज स्पष्टपणे साकार झालेले आहे.

मॅक्झिम गोर्कीला लिहिलेल्या एका पत्रात लेनिनसारख्या विशिष्टच तात्विक विचारसरणीचे क्रांतिकारक नेतृत्व पत्करलेल्या जगन्नेत्याने देखील केवळ एका विशिष्टच तात्विक विचारसरणीचेच नव्हे तर वेगवेगळ्या तत्वज्ञानांमध्ये निहित असणाऱ्या प्रेरकांची असलेली लाभदायकता विशद केलेली होती. तर राजकीय-सांस्कृतिक पातळीवरील क्रांतिकारक स्वरूपाचे नेतृत्व पत्करलेल्या माओ त्से तुंग सारख्याने देखील विशिष्ट तात्त्विक विचारसरणीनेच तेवढ्या पछाडलेल्या आपल्या लेखकांना, काय धिक्कारायचे, काय नाकारायचे, कशाचे गुणगान गायचे, कशाचा धिक्कार करायचा नाही व कशाचे गुणगान गायचे नाही हे सांगताना ते ठरविण्यात आपले लेखक कसे अयशस्वी, अपयशी ठरलेले आहेत हे समजावून सांगितले होते.

भारतीय समाजाला असे चिंतन, आकलन व समाजमनावरील एकसंघ पकड असणारे राजकीय–सांस्कृतिक नेतृत्व आधुनिक काळात लाभलेले नसल्याच्या परिणामी तात्त्विक चिंतनक्षमता, तत्वज्ञाने व कलात्मक सृजन यांच्या आंतरक्रियेचा प्रांत हा मुख्यत्वे मानवी अस्तित्वाच्या समस्यांचाच प्रांत आहे ही शिकवणच आधुनिक भारतीय भारतीय समाजमानसाला इथल्या माध्यमांद्वारे लाभलेली नाही.

कलात्मक सृजनाच्या वैचारिक बाजूचा, कलाविषयक तात्विक चिंतनाचा संबंध हा कल्पनारम्य चिंतनाचा बौद्धिक आनंद घेण्याची आवड असणाऱ्यांशीच पोहचू शकतो असे जर्मन तत्वज्ञ हार्टमन याने आपल्या सौंदर्यशास्त्रावरील ग्रंथात म्हटलेले आहे.

अशी आवड असणारे लोक ज्या संस्कृतीत अधिक असू शकतात, असतात, त्या वेळेच्या त्या संस्कृतीला वाङ्मयीन संस्कृती म्हणून संबोधता येऊ शकते. हे लोक असे अधिक आपोआप होऊ शकत नाहीत. घडवावे लागतात. अशी आवड उत्पन्न करण्याची गरज, इच्छा व मानसिकता असणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे राजकीय–सांस्कृतिक नेतृत्व उपलब्ध असण्यावरच अशा संस्कृतीची निर्मिती व टिकाव अवलंबून असतो. भारतीय समाजात दुर्दैवाने असे नेतृत्व ही अतिशय दुर्मिळ बाब आहे. कोणत्याही तात्विक चिंतनाचे मूळ स्वरूप हे बर्ट्रांड रसेल म्हणतो त्या प्रमाणे 'विवेकाची आसक्ती' (Love of wisdom) हेच आहे. ही आसक्ती उत्पन्न करणारी बौद्धिक शक्ती हीच मुळी एक उर्जा असते. या उर्जेशिवाय कलावंत अथवा आस्वादक यांची कल्पनाशक्ती चालना प्राप्त करू शकत नाही व कल्पनाशक्तीच्या अभावी कला, कलावंत, कलाव्यवहार यांच्या अस्तित्वाला अर्थच उरत नाही. बौद्धिक शक्तीचे महत्त्व विशद करताना जे. कृष्णमूर्ती यांनी ज्ञानापासून ती वेगळी असल्याचे स्पष्ट केलेले आहे. जे. कृष्णमूर्ती ज्ञानाला सीमित तर बुद्धिमत्तेला, प्रज्ञेला, असीम मानतात. बुद्धिमत्ता, बौद्धिक शक्ती म्हणजे ज्ञान नव्हे.

जीवनात नवनवे मार्ग धुंडाळण्याची प्रबळ इच्छाशक्ती, कल्पनाशक्ती ही वाचनवृत्ती च्याही मुळाशी असलेली एक मूलभूत बाब आहे. युगवाणीसारख्या नियतकालिकांच्या सद्यस्थितीची कारणे ही त्यामुळे केवळ आर्थिकच उरत नाहीत तर ती अशी सांस्कृतिकही आहेत. या सद्यस्थितीतील परिवर्तन हे म्हणूनच जीवनात नवनवे मार्ग धुंडाळण्याची प्रबळ इच्छाशक्ती समाजात निर्माण करणाऱ्या सांस्कृतिक–सामाजिक परिवर्तनाशी बांधल्या गेलेले आहे.

जीवनाच्या समकालीन वास्तवाने ही इच्छाशक्तीच मुळात नियंत्रित करून ती इतरत्र वळती केली असल्याचे मान्य करावयाचे झाल्यास ही इच्छाशक्ती निर्मिण्याचे व ती प्रबळ करण्याचे सांस्कृतिक कार्य पार पाडल्या जाणे हेच अग्रक्रमाचे समकालीन सांस्कृतिक कार्य ठरावयास हवे.

श्रीपाद भालचंद्र जोशी

गरगरताहेत भ्रांतीमान झुंवरं

गरगरताहेत भ्रांतिमान झुंवरं
संदिग्ध मदिर प्रकाशात
या मायावी थेंवाच्या

मद्याचा थेंव....
ज्यात लोभावून शिरलेल्या माशीला
येत नाहीय् पडता वाहेर
अन् आक्रांतानं पडू पहावं तर
पायच त्या थेंवांत घट्ट अडकून राहिलेला
तो सोडवू पाहावे तर दुसरा...तिसरा...
आणि वघता वघता
आत्मरक्षणाचा मार्गच खुंटून गेलेला...

गरगरताहेत भ्रांतिमान झुंवरं
संस्कृतीच्या इतिहासात
प्रत्येक दशकात, शतकात, सहस्रकात
प्रत्येक मानवी जीवाच्या प्रज्ञेला
ग्रासून राहल्येय् ही बलात्कारी प्रेरणा...

संपूर्ण दिवसभर कमळाला भोगत रहावे
आणि वृद्धापकाळी
चैतन्याचा सूर्य अस्ताला जाताना
कमळानेही न कळे कुठल्या
स्वयंप्रेरणेने मिटून
भुंग्याला बंदिस्त करावे
असे हे सर्वत्र सर्वकाळी घडते आहे.
सुटका नाही.
नाहीच.

अनुक्रमणिका

ख्रिस्ताला भेटलेला सैतान अथवा
बुद्धाला साधनेपासून वंचित करू पाहणारा मार
ख्रिस्ताने उद्धारलेली माग्दालिना
आणि बुद्धाची आम्रपाली
या द्वंद्वांतून विश्वाचे अनंत तरंग निर्माण होताहेत
हेलकावताहेत नि गरगरताहेत
भ्रांतिमान झुंबरं
संदिग्ध मदिर प्रकाशात
या मायावी थेंबाच्या.

मी पहातोय् तो थेंब
रित्या झालेल्या दारूच्या प्यालाला चिकटलेला
टपोर थेंब –
जो नुस्ता खुणावत
भडकवत हेलकावत आणि गरगरवत रहातो
जो सुकतही नाही
आणि ओघळून जमिनीत नग्नही होत नाही
नुसताच थर्थरत रहाणारा
टपोर थेंब...

मी पहातोय्
या टपोर थेंबात अडकलेले सर्व जीवजात
निःसंज्ञ, निष्कांचन, अनिकेत होत चाललेले
या रत्नागिरी मच्छी बाजाराच्या—
काळोख, समुद्र, दारू आणि मासळीच्या वासाने
कुंद, उद्दीपित झालेल्या
दारूअड्ड्यावरील दगडी कट्ट्यावर

तिथेच उगवून आलेल्या
ऊर्जस्वल औदुंबराच्या पारावर
नि पलिकडे
कुठे कुठे कुठे
पावसाने भिजून चिखल झालेल्या जमिनीवर
लोळागोळा होऊन लोळत
रिकामेपणाचे ऐश्वर्य तळमळत भोगणारे
क्षुल्लक माशीप्रमाणे जाळ्यात अडकलेले
अथवा शेणातील किड्याप्रमाणे वळवळणारे जीव
मृत्यूच्या कुशीत शिरतानाची त्यांची तडफड
अगदी अशीच असेल...
: अनेकदा मला वाटून गेले आहे !

मी पाहिला आहे
या अड्ड्याच्या उंबरठ्यावर
बेशुद्धावस्थेत कोसळून पडलेल्या माणसाच्या चेहऱ्यावरचा
संपूर्ण आयुष्याबद्दलचा विलक्षण तिटकारा
तरीही पालथ्याने मातीत घट्ट नखे खुपसताना
आयुष्याला चिकटून रहाण्याचीही असोशी
आभाळ निस्तरंग असते
नुस्ते भडकलेले भगव्याभोर रंगाने
तसेच डोळे. तांबारलेले.
कुणी संन्यासी आला अलख जागवीत
आणि अल्लाद येऊन घुसला अड्ड्यावर
घटाघट उतरवताना दारू घश्याखाली
विस्फोट झाला त्याच्या बायकोच्या कुकर्मांचा त्याच्याच तोंडून
आणि अधिकच चेहरा पिळवटून
त्याने खुपसला अवकाशातच लखलखता त्रिशूळ
भूतकाळ विसरू न शकलेल्या त्या संन्याशाचे
गॅसचेंबरमधील गुदमरल्या किंकाळीसारखे दुःख
अजूनही काळीज फोडून टाकते
आणि माझ्या आकांतावरून सर्वसाक्षी हात फिरवीत
सावकाश फिरत रहाताहेत भ्रांतिमान झुंबरे
लय बदलून.

... मुलगा ट्रकने उडवलेला, स्वतः क्षयाच्या शेवटच्या दशेत
कुणाची नुकतीच सुटलेली नोकरी

आणि आधारहीन प्रचंड पोकळीतं
गरगरणाऱ्या जीवासारखी आलेली अवस्था
प्रत्येकाचीच.

प्रत्येकालाच जाणवतेय् की, आपल्या आयुष्याचे फूल वाळून
आता खूपच काळ लोटला आहे
आणि त्याची वाळलेली पाकळीन् पाकळी सुटून
अगतिकपणे वाऱ्यावर उडते आहे.
हे असे वाऱ्यावर उडणे आपल्याला थोपवता येणार नाही
आणि तसे ते थोपवणेही अर्थशून्य आहे !

असंख्य ग्रहनक्षत्रांनी
व्याप्त झालेला हा विश्वाचा चक्रव्यूह
प्रत्येकच भ्यालेला आणि मूढ
असंख्य रूपांनी नटलेल्या नियतीशी
लढता लढता थकलेला
त्याला हवीय् क्षणिक ग्लानी
रक्ताची प्रत्येक पेशी हवीय् लोलकाप्रमाणं आंदोळायला.

प्रत्येक आठवण बुडबुड्याप्रमाणं वर येऊन फुटत्येय्
आणि कुठल्याही वेदनेचं रूप स्पष्ट होत नाहीय् मुळीच.
त्याचवेळी धडपडत उठतो कुणीतरी
त्याला हवं असतं कॅन्सरग्रस्त बायकोसाठी
जागरण करायला इस्पितळात
टाचते काच घुसून ग्रँग्रीन झालेल्या
कुण्या माणसाचा सुजून भप्प पाय
मी नेत असतो त्याला सांभाळून नगर रुग्णालयात
मध्यरात्र उलटून गेल्यावर
कुण्या एकादोघांच्या मदतीनं. ताळमेळ नसलेली एक रौद्र सिंफनी !

गरगरतांना अकस्मात थांबतात
भ्रांतिमान नक्षत्रं संगीत खुर्चीच्या खेळाप्रमाणं
आणि तितकाच अकस्मात उल्केप्रमाणं कुणीतरी
कोसळून पडतो कुठल्यातरी विधिनिषेधहीन जागी
क्षुल्लक.

वेदना :
अखंड परिभ्रमण करणाऱ्या

नि अखंड जन्ममृत्यूचा वनवास सोसणाऱ्या
सूर्यचंद्रांची,
सौंदर्य हरवून निस्तेज होत जाणाऱ्या नक्षत्रांची.
कोसळून काळ्याठिक्कर पडणाऱ्या एकेका उल्केची,
स्वतःच्या शरीरात चरत जाणाऱ्या
असाध्य रोगाची दहशत घेतलेल्या
माझीच,
ह्या माझ्याभोवती पसरलेल्या —
कर्दमात लोळणाऱ्या
असंख्य कृमीकीटकांची,
नि माझ्यासमोरच वठत चाललेल्या,
एकेकाळी असंख्य फळांची समृद्धी ल्यालेल्या
या निस्तेज माडाची...

अंगावर आज
फाटकी, घाणेरडी, धुळीने भरलेली
कंगाल वस्त्रे लेऊन भटकणारा मी
तुमच्या जगात वावरतही होतो कधीकाळी
उमेदीची स्वप्ने घेऊन
आज मात्र,
तुमच्या माझ्यामधून कसला तरी काळाकुट्ट प्रवाह वाहतो आहे
पलिकडच्या काठावर शुभ्र वस्त्रांतले सच्चरित्र, शुद्ध तुम्ही
हात लांबवूनच मला तुमच्या चौकोनी जगात नेऊ पहाताय्
आणि आजवरच्या तुमच्या अनुभवाने
पैलथडीला आलेलो मी
माझे हात अधिकच आखडून घाबरलेपणानं किंचाळतोय् —
'नको—नको—नको—'

गुरुनाथ धुरी

द्वारा–दत्ता मुकुंद सावंत
एस. टी. बुक स्टॉल
रत्नागिरी

बालकवी : एक उद्ध्वस्त पारवा

अक्षयकुमार काळे

एक अपवादात्मक आणि कमालीची पृथगात्म प्रतिभा बालकवींना लाभली होती. आणि त्याला साजेसे विलक्षण व्यक्तिमत्वही त्यांना लाभले होते. इतके अंतर्मुख आणि संवेदनशील व्यक्तिमत्व अभावानेच कुणाला लाभावे. हृदयाची निरामयता, बुद्धीची तीव्रता, मनाची, उत्कटता, शैशवप्रियता, निसर्गलुब्धता आणि या सगळयांना वेढून असलेली तीव्र उदासीनता हे बालकवींच्या व्यक्तित्वाचे घटक होते. काव्याचे अंत:संगीत त्यांच्या हृदयात अगदी कळत्या वयापासून निनादत होते. केशवसुत आणि रे. टिळकांच्या वाणीचा संस्कार तिच्यावर घडला आणि त्यांच्या निसर्गदत्त प्रतिभेने आधुनिक काव्यात एक विलक्षण चमत्कार घडविला. इंग्रजी वाङ्मयाचा त्यांच्यावर फारसा प्रभाव नसतानाही आधुनिक काव्याची व्यवच्छेदक वैशिष्टये बाल-कवींच्या काव्यात प्रकटली. केशवसुतांच्या कवितेमुळे आवश्यक असणारा आदर्श त्यांच्या डोळयासमोर होताच. वयाच्या अगदी २२ व्या वर्षी मोठ्या हिरीरीने बालकवींनी आधुनिक मराठी कवितेची बाजू केसरीतून[१] मांडलेली दिसते, आधुनिक मराठी कवितेतील आशय आणि अभिव्यक्तीची वैशिष्टये आपल्या काव्यात यावीत यासाठी ते जागरूक होते हे नि:संशय. त्यातही केशवसुतांची मोहिनी त्यांच्या मनावर अधिक होती. आपल्या केसरीतील लेखात केशवसुतांचे आधुनिक कविकुलगुरू म्हणून महत्त्व मान्य करूनच विषयाचे प्रतिपादन त्यांनी केले आहे.

काव्यदृष्टीतील संप्रदायनिष्ठा

बालकवींची काव्यदृष्टी केशवसुतांच्या काव्यदृष्टीने प्रभावित झालेली दिसते. पुष्कळ ठिकाणी केशवसुतांशी तिचे साम्य दिसते. 'भ्रमर आणि कवी' या कवितेत त्यांनी कवीची भ्रमराशी तुलना केली आहे. केशवसुतांनी 'भृंग' या कवितेत 'भृंग्याचे गान परमानंदाने परिपूर्ण असते, तर आपले गान गान नसून गानाला चिंध्यादान होय' असे खेदाने म्हटले आहे, पण बालकवींनी मात्र, 'आपले गाणे भ्रमरासारखेच आहे. भ्रमर मजेने नभात गिरके घेत बागडतो तर आपण सूज्ञ जनांना हर्षभरीत करीत बागडतो' असे म्हटले आहे. अर्थात ही वृत्ती शेवटपर्यंत टिकलेली दिसत नाही. 'कवीची इच्छा' या कवितेत त्यांच्या काव्यकल्पनेचा विकास झालेला दिसतो, तन्मयतेने स्वत:तच गुंगल्यावर जडतेची माती पडून हृदयज्योती तरल होतात व दिव्यसूर ऐकू येतात. त्यांचा आधार घेऊन सौंदर्याचे, स्वप्नाचे, भासांचे, कल्पकतेचे, जाणिवेतले आणि नेणिवेतले बोल कवीला गुंफायचे असतात. हे बोल हृदयाची तार हलविणारे, मनस्ताप मालविणारे व जीवनातील अंध:कार घालविणारे असतात. वस्तुवस्तूमधून काव्य विलसते. श्रवणाने हृदयी उतरून जीवाला पूर्ण करते. त्या मंजूळ गीतातून दिव्यत्व निर्माण होते. मीतूपणाच्या द्वैताचा निरास करते व जीवाला अखंड ध्यास लावते, अशी त्यांची काव्याबद्दलची कल्पना होती. 'सृष्टीने दिलेले पीक मी काव्यात साठवून ठेवतो' अशा शब्दांत काव्यप्रेरणेचा एक स्रोत केशवसुतांनी नमूद केला आहे. तसाच बालकवींनी देखील, 'ही सृष्टीसुंदरी मजला गाया शिकवी । ही चराचराची निगूढ गीते काही' या शब्दांत सृष्टीशी संबंधित असणारा काव्यप्रेरणेचा स्त्रोत नमूद करून ठेवला आहे. 'सौंदर्याचा अभ्यास कर' या कवितेत,

> रम्याकार चमत्कृति प्रचुर
> हे ब्रह्मांड नेत्री दिसे
> खेळे काहि तरी तमातुनि,
> मनी गाणे तदा होतसे

१. बालकवी आधुनिक मराठी कविता, समग्र बालकवी, पुणे १९६६, पृ. २७८-२८३

सूर्याची किरणे सुनिर्मल तशा
त्या तारकामालिका
संध्येचे रमणीय रंग,
उदयी सृष्टी मनोहारिका
वृक्ष श्यामल पुष्पसंकुल
चलद्दुर्वादलाच्छादिता
वाहे शांतपथा सुरम्य सरिता
कल्लोलमालायुता
प्रेमाने अभिषिक्त चित्र मग त्या
रामण्यविश्वी दिसे
चित्ताची रमणीयता उतरुनी
संगीत होते तसे

अशी काव्यनिर्मितिप्रक्रिया बालकवींनी स्पष्ट केली आहे. कवी व कवितेची कार्यकर शक्तीविषयीचे त्यांचे विचार म्हणजे केशवसुतांच्या विचारांचा प्रतिध्वनी आहे. काव्याच्या प्रभावाने सर्व जगाच्या मंगलाची आणि विश्वाच्या एकतानतेची, सर्वधर्मपंथाच्या एकत्वाची आणि नंदनवन व स्वर्भूमीच्या मिलाफाची भाषा केशवसुतांच्या संस्कारातून निर्माण झाली आहे हे अगदी उघड आहे. 'मी', 'कवी आणि कविवाळे' या कवितांवर 'आम्ही कोण ?'ची झाक अगदी स्पष्ट आहे. 'देवाचे दिधले असे जग तये आम्हांस खेळावया' या कल्पनेवरून 'स्वर्गाच्या तेजोगर्भी वाळे ती खेळत होती' ही कल्पना बालकवींना सुचली असावी. कारण 'आम्ही देवाचे लाडके आहोत' असे केशवसुत म्हणतात तर बालकवी 'देवाची आवडती ती कविबाळे खेळत होती' असे जवळजवळ अनुकरण करतात. या कल्पनेचा विस्तार मात्र बालकवींनी रेखीवपणे केला. ही कविबाळे पृथ्वीतलावर आल्यावर आपली पूर्वकहाणी स्मरून तळमळतात व त्यांच्या दीर्घ किंकाळचा जगाची गाणी ठरतात असा विचार बालकवींनी मांडला आहे.

कवितेला प्रेयसी कल्पून लिहिलेल्या 'भटकणे' या कवितेवर केशवसुतांच्या 'थकलेल्या भटकणाराचे गाणे' या कवितेचा अगदी शीर्षकासहित प्रभाव पडलेला आहे. 'व्यर्थी अधिकची अर्थ वसे । तो त्यास दिसे ज्या म्हणती पिसे । त्या अर्थाचे बोल कसे ?–झपूर्झा गडे झपूर्झा' या ओळींचा अगदी स्पष्ट प्रभाव, 'वेडा झाला, म्हणा हवे तर उठला जनतेतूनी । कवी हा तन्मय निजगायनी' या बालकवींच्या ओळींवर आहे. केशवसुतांना जाणवलेले व क्षणात नाहीसे झालेले दिव्यभास बालकवींना 'वनमाले'च्या रूपाने जाणवले आहेत. परंतु केशवसुतांच्या जातीचे बालकवी 'सनदी' नव्हेतच. 'हारवले ते परके झाले, मी शोधित फिरतो त्याला' यातील हरवलेले ते केशवसुतांचे, बालकवींचे नव्हेच. केवळ काव्यदृष्टीच नव्हे तर केशवसुतांची शैशव जगण्याची कल्पना, दिव्यत्वाची कल्पना. आणि सामाजिक विचार यांचाही प्रभाव बालकवींवर पडला. तुतारीच्या अनुकरणाने 'धर्मवीर' नावाची कविता त्यांनी रचली. ती गोविंदाग्रजांच्या 'दसऱ्या' इतकीच सामान्य आहे. केशवसुतांच्या हृदयात पेटलेले आत्मसामर्थ्याचे होमकुंड बालकवींच्या हृदयात पेटलेले नव्हते. त्यामुळे बालकवींचे सत्यधर्माचे प्रतिपादन कृतक आवेशाने परिपूर्ण असले तरी हृदय हलविणारे झाले नाही. केशवसुतांजवळ असणारे सलग सामाजिक तत्त्वज्ञान आणि ऐतिहासिक दृष्टी यांचा बालकवींजवळ अभाव असल्यामुळे धर्म, तत्त्वज्ञान, रूढी, शूद्र, विधवा इत्यादींबद्दलचे पुरोगामी विचार अभिनिवेशी असले तरी हृदय हलविण्यास असमर्थ ठरले. ते केवळ बालकवींचा केशवसुतांबद्दलचा आदर आणि संप्रदाय सिद्ध करण्यास उपयोगी पडणारे आहेत. 'राष्ट्र सेवा', 'राष्ट्रगायित्री', 'आर्यांची अवनति', 'माझा भारत', 'माझा महाराष्ट्र' इत्यादी कवितांमधून बालकवींचे राष्ट्रप्रेम व्यक्त झाले असले तरी त्यात भावनेचा ओलावा आणि विचारांची उत्तुंगता वा उत्कटता नसल्यामुळे ही गीते अपेशी ठरली. बालकवींचा खरा पिंड सौंदर्यपूजकाचाच होता.

सुंदरतेच्या सुमनावरचे दंव चुंबुनि घ्यावे
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे
प्रीतिसारिका गीत तियेचे ऐकावे कानी,
बनवावे मन धुंद रंगुनी काव्यसुधापानी

आपल्या काव्यशक्तीची महत्ता आणि मर्यादा यांचे असणारे अचूक भान या अपेक्षांतून स्पष्ट झाले.

निसर्गकवी

निसर्ग हा बालकवींच्या निदिध्यासाचा विषय होता. 'मी स्वच्छंदी पुरता छंदी धारी मी न कुणास। परी मोहिनी विविध-रूपिणी सृष्टीचा मी दास' अशी अनन्य निसर्गनिष्ठा त्यांनी प्रकट केली. स्वाभाविकच सुरुवातीला आनंदाची आणि मग उदासीनतेची सगळी प्रतिबिंबे त्यांना निसर्गात प्रतीत झाली. त्यांच्या काव्यप्रेरणेचा तो एक प्रमुख घटकच होता. एका पत्रात ते म्हणतात, 'विशाल गिरिशिखरे, गर्द अरण्ये, भयाण खोरी, अजस्र प्रपात या सर्वांचे दर्शन अहाहा! मला किती तरी आनंददायक वाटते–त्याकडे पाहता पाहता एक गोड वेड माझ्या डोक्यात उसळते. कल्पनासाम्राज्यातील मधुर स्वप्नसृष्टीशी मन संलग्न होते. विचारांचा विलक्षण प्रवाह सुरू होतो...'[1] काव्यप्रेरणा आणि भावप्रकटीकरणाचे माध्यम या दोन्ही दृष्टीने निसर्गाला त्यांच्या कवितेत अनन्यसाधारण स्थान मिळाले. शुद्ध निसर्गचित्रणाची हौस बालकवींच्या प्रतिभेला नाही. निसर्ग चित्रणाला सुरूवात करीत नाही तोच मानवी संबंधाचे सूक्ष्म अंकूर त्या चित्रणातून प्रकट होतात आणि वेगळीच सृष्टी आकारास येऊ लागते.

कल्पनारम्य निसर्गगोते

भवदुःखाच्या भयकारित्वाने बालकवींना आपली स्वप्निल सृष्टी निर्माण करण्यास भाग पाडले. कदाचित ती त्यांची मूळ प्रवृत्तीही असेल. या स्वप्निल सृष्टीचा मूलाधार निसर्गच होता. त्या निसर्गातील वस्तुजातांना मानवी संवेदना दिल्यावर त्यांच्याबरोबर बालकवींना रंगता येऊ लागले. यातील कुणी स्वार्थाच्या बाजारात रडणारे नव्हते. सगळे दिव्यत्वात न्हालेले होते. त्यांचा ध्यास बालकवींनी घेतला. निसर्गाचा एकेक घटक बालकवींचा सखा झाला. अरुण, निर्झर, फुलपाखरू, संध्या, रजनी, तारका, फुले, वेली, पक्षी, पाखरे, वारा, नक्षत्रे, दिशा, मेघ, नभ इत्यादींनी त्यांची मूळ रूपे टाकून दिली व बालकवींनी दिलेली रूपे स्वीकारली, वेष स्वीकारला नव्हे त्याहीपेक्षा अधिक बालकवींनी दिलेला स्वभाव स्वीकारला. व्याकुळलेले, दुःखाने शतशः तुकडे झालेले हृदय बालकवींनी त्यांना दिले नाही. दुःख स्वतःकडे ठेवून आनंदाने रसरसलेले, प्रेमाने भारावलेले सुंदर हृदय त्यांना दिले. स्वाभाविकच दिशा गालातल्या गालात हसू लागल्या, मेघ विविध रंगांनी नटू लागले, दिवसयामिनीने परस्परांना चुंबिल्याबरोबर त्यांच्या अनुरागाच्या छटा सर्व गगनात खुलल्या, आपली मोत्यांची माळा चोरून नेली म्हणून नभःश्री रुसली. सूर्याचा कर पूर्वेच्या गालाला लागताच ती अधोवदन झाली आणि प्रेमाच्या अद्‌भूत लहरीने वसुधा पुलकित झाली. केवळ 'अरुण'च नव्हे तर 'संध्यारजनी', 'तारकांचे गाणे', 'फुलराणी' या कवितांतही ही वर्णनाची अद्‌भूतता आहे.

प्रणयचंचला भ्रूलीला अवगत नसणाऱ्या फुलराणीने अव्याज बाल्यातून तारुण्याकडे केलेला प्रवास, रविकराच्या प्रेमात पडून पदरी पडलेली विरहार्त व्याकूळता, अखेर विरलेले संशयजाल आणि संपलेला विरहकाल, शेवटी झालेले मंगलमय मीलन अशी मधुर कथा 'फुलराणी'त बालकवींनी गुंफली आहे. सगळचा ऋजु आणि कल्पनातीत संवेदना या निसर्गातील वस्तुजाताला देताना प्रेम हा त्यांचा मूलाधार होता. 'सुंदरतेला नटवून। कोमलतेला खुणवून। प्रेमाच्या वसतीकरिता। जगदंतर फुलवू आता। फेकुनि द्या इकडे तिकडे। थोडेसे दंवबिंदू गडे। या निर्मल अवकाशात। प्रेमाचे पेरू शेत' ही त्यांची प्रतिज्ञा होती. वास्तवापासून दूर अशा स्वप्नाच्या रंगगंधित साम्राज्यात बालकवी वास्तवाच्या क्रूर वळांना विसरले. जगरहाटीची शिस्तमान्यता त्यांनी दूर ढकलून दिली. येथे निसर्गानेही कोणती शिस्त मानली नाही. स्वप्नांच्या साम्राज्यात का कधी शिस्त असते? 'निर्झरास', 'संध्यातारक', 'बालविहग', इत्यादी कवितांही बाल्याकर्षणातूनच निर्माण झाल्या आहेत. 'बालझरा तू बालगुणी। बाल्यचि रे भरिसी भुवनी', 'तू लडिवाळा। निज निज बाळा। मातेच्या हृदयांत', 'सृष्टिदेविच्या सगुणा बाळा, स्वर्गाच्या तान्ह्या' अशी त्यांची अनुक्रमे निर्झर, संध्यातारक आणि बाल-

१. बालकवींचे सोनाळकरांना लिहिलेले पत्र,–१८–४–१९१३ 'समग्र बालकवी'–पुणे, १९६६ पृ. ३१२

विहगावद्दलची समान अनुभूती आहे. त्यांना त्रात्य लाभले आणि दिव्यत्वही. पण आपल्याला मात्र ते लाभत नाही म्हणून मनात निर्माण झालेली खंत बालकवींनी बोलून दाखविली आहे. स्वाभाविकच या कवितांतून निसर्गानुभूतीचा आलेला प्रत्यय शबलित होत जातो व मनात रेंगाळते ती बालकवींची उदासीनता.

निसर्गचित्रातील वास्तव

बालकवींच्या काही निसर्गचित्रांतील वास्तव हे वृत्ती आणि प्रत्यय यांच्या दर्शनाकरिता वापरलेले माध्यमच आहे. वस्तुत: निसर्गातील कल्पनाविलास जात्याच बालकवींना प्रिय होता. 'पाऊस' सारख्या साध्या निसर्गवर्णनपर कवितेतही वर्षादेवी आणि मारुताच्या मिषाने तो प्रकटला. पण काही कवितांत तो कमी होऊन निसर्गाची वस्तुनिष्ठ शब्दचित्रे रेखाटण्याकडे त्यांचा कल अधिक होऊ लागला. पण अगदी शुद्ध निसर्गचित्रे बालकवींनी फारशी रेखाटलीच नाहीत. 'श्रावणमास' या कवितेचे स्वरूप 'अरुण', 'संध्यारजनी' या कवितांपेक्षा वेगळे आहे. एक गतिमान बदलते निसर्गचित्र त्यात बालकवींनी रेखाटले आहे. निसर्गातील वस्तुजातावर मानवी भावभावनांचे आरोपण त्यांनी केले नाही. बालसुलभ आणि तारुण्याच्या उंबरठ्यावरील कुमारसुलभ विचार–विकारांचे प्राबल्य जसे त्यांच्या कल्पनारम्य निसर्गगीतांवर आहे तसे इथे नाही. निसर्ग आणि त्याच्याशी संवादी असणाऱ्या मानवी जीवनाचा अनुबंध त्यांनी या कवितेत रेखाटला आहे. पूर्वीच्या निसर्गगीतांतील मानवी भावभावनांचे आरोपण इथे नाही. इथे प्रत्यक्ष जीवनाचा संदर्भ आहे, व पुढे हा देखील अस्पष्ट होत गेला आहे वेदनेच्या जाणिवेतून निसर्गाचा वेगळाच प्रत्यय त्यांनी घेतला त्याचे दर्शन इथे घडते. 'खेड्यातील रात्र', 'औदुंबर' इत्यादी कविता या जातीच्या कविता होत. प्रारंभीच्या निसर्गगीतातून निसर्गाचा प्रत्यय येत नाही तोच तो अदृश्य होत असे, बाललीलांचा आणि पौगंडावस्था संपण्याच्या बेतात असणाऱ्या तरुण-तरुणींच्या चंचल लीलांचा सौंदर्ययुक्त प्रत्यय येई, पुढे तसे होईनासे झाले. एक विकल, उदास प्रत्यय या कवितांतून येतो. 'औदुंबरा'तील पहिल्या चार ओळीत शांत निसर्गाचे वर्णन आहे. वास्तवापलीकडे कल्पना साम्राज्यात ते शिरत नाही. पुढले वर्णन अधिक घनतायुक्त होते. ते वास्तवापासून तसेही ढळत नाही पण उदासीन, अलिप्त, अंतर्मुख वृत्तीचे निदर्शन करणारे असते. औदुंबरावर ते सरळ सरळ मानवी भावनांचा आरोप करीत नाहीत; त्यामुळे 'अरुण', 'फुलराणी' या कवितांतील ढोबळ रूपके येथे अवतरली नाहीत. उलट उदासीन समधाततेची प्रचिती इथे येते 'खेड्यातील रात्र' मधील चित्र मात्र अद्भुत वास्तवाच्या प्रतीतीने विलक्षण प्रत्ययकारी झाले आहे. गडद होत जाणारा भयकारी अंधार आणि त्याहूनही अधिक भयकारी असा स्मशानज्वालेचा प्रकाश, अंधार आणि प्रकाश ही दोन्ही भीतीची आवर्तने वाढविणारीच. भूत आणि स्मशान या दोन्हीबद्दलच्या पूर्वकल्पनाच भयकारी असतात. त्यांच्या आजूबाजूचे संदर्भ अधिकच भीषण करीत एका भयकारी वास्तवाचा परिचय या निसर्गचित्रातून बालकवींनी दिला आहे

निसर्गाच्या नाजूक, कोमल, चिमुकल्या रूपाच्या आकर्षणाबरोबरच त्याच्या भयाण आणि अजस्र रूपाचे आकर्षणही बालकवींना होते. तृणपात्यांतील फुल त्यांचे मन आकर्षून घेई. तसेच काळकृतान्तापरी वावरणारे कृष्णवर्ण घनपर्वत त्यांना वेड लावीत. खोल खोल भेसूर दरडीत उगवून वर येणारे पिंपळ भीती घालीत. पण प्रामुख्याने निसर्गातील प्रखर प्रत्ययात रमणे त्यांच्या प्रतिभेला अधिक प्रिय आहे.

चित्रमयता हा बालकवींच्या निसर्गवर्णनाचा आकर्षक विशेष आहे. अतिशय सूक्ष्मपणे ते रेखा–चित्रे काढतात. त्यात आकर्षक संक्षेप व आटोपसरपणा असतो. 'भिंत खचली कलथून खांब गेला। जुनी पडकी उद्ध्वस्त धर्मशाळा' किंवा 'त्या उजाड माळावरती। बुरुजाच्या पडल्या भिंती। ओसाड देवळापुढती वडाचा पार', किंवा 'फिकट निळीने रंगविलेला कापुस मेघांचा। वरुनि कुणी गुलजार फिरविला हात कुसुंब्यांचा' अशी विलक्षण तंद्रीतील रेखाचित्रे बालकवींनी काढली आहेत. परंतु ते तिथेच थांबत नाहीत, तर मनातला संवादी आशयही पुढे प्रकट करतात.

प्रेमकविता

निसर्ग आणि औदासिन्य हेच बालकवींच्या प्रतिभेला आवाहन करणारे अनुभव घटक आहेत. प्रेमाने त्यांना झपाटून टाकल्याचे किंवा गोविंदाग्रजांप्रमाणे पोळून काढल्याचे दिसत नाही. बालकवींनी तुरळक प्रेमकविता लिहिल्या पण त्या प्रेमानुभवावर न लिहिता प्रेमकल्पनेवर लिहिल्या. ज्या दिव्याचा ध्यास बालकवींना अगदी जन्माचाच लागून राहिला होता त्या दिव्यात विलीन झाल्यासच खऱ्या प्रीतीचा लाभ होईल असे त्यांना वाटे. 'दिव्यप्रीतीसंगमता म्हणजे स्वर्गभूसंगमता. ही आत्म्याच्या पुरोगामित्वाने लाभते. एरवीची प्रीती म्हणजे दुःखदायिनी स्वार्थोद्भव लहरी आहे', या त्यांच्या प्रेमकल्पनेमुळे शारीरप्रेमाकडे किंवा प्रेमाच्या इतर तपशिलाकडे बालकवींची कविता सरकू शकली नाही. प्रेमातील हुरहूर, मीलनोत्सव प्रसंगी निराशा इत्यादींचे पडसाद बालकवींच्या काव्यात नाहीत. 'बाले ! प्रीतिस या समान गमते प्रासाद आणि दरी', 'प्रेमगंगेच्या शुद्ध सिंचनेहि शुद्ध होइ न जो दोष असा नाही', 'प्रीति हवी तर तळहातावर घे कापुनि मान' इत्यादी प्रीतिसंबंधी त्यांनी काढलेले उद्गार फार सांकेतिक आणि वरवरचे वाटतात. त्यातही 'प्रीति हवी तर' 'प्रेमलेख', '—ला' इत्यादी प्रेमकवितांतून त्यांचे अभिव्यक्तिकौशल्य दिसत असले तरी तीव्र भावनावेगाचा त्या कवितांत अभावच आहे. प्रीतीच्या ब्रह्मांडदाहिनी दाहकतेचे वर्णन त्यांनी केले असले तरी त्या दाहकतेचा त्यांना कितपत अनुभव आला होता हा प्रश्नच आहे. 'भटकणे' या कवितेत देवतेस प्रेमयाचना केली असली तरी ती प्रत्यक्षातील प्रेमदेवता नसून काव्यदेवता असण्याचीच शक्यता अधिक आहे. या संदिग्धतेमुळेच ती अधिक रमणीय झाली आहे 'थकलेल्या भटकणाराचे गाणे', 'रूष्ट सुंदरीस', 'फिर्याद' इत्यादी केशवसुतांच्या कवितांच्या संस्कारातही बालकवींच्या या कवितेचे बीजकारण असू शकते. 'ओवाळणि घाली भाई' हे नाट्यगीत फार सुरेख आहे. केशवसुतांच्या 'हरपल्या श्रेया'ची त्यावर किंचितशी झाक आहे. प्रणयात स्वप्नात रंगलेल्या गतधवेचे चित्र बालकवींनी काढलेले आहे. पूर्व प्रणयाच्या स्मृतीने व्याकुळलेल्या अंतःकरणाचे चटका लावणारे चित्र पहिल्या तीन कडव्यांत बालकवींनी रेखाटले आणि शेवटच्या कडव्यात भविष्यातल्या अधःपतनापासून झालेल्या मुक्ततेचे त्यांनी चित्रण केले आहे. पण एकूणच प्रेम हा बालकवींच्या प्रतिभेच्या रमण्याचा प्रांत नव्हे.

उदासीनतेची मीमांसा

बालकवींच्या रमण्याचा खरा प्रांत म्हणजे उदासीनता. बालकवींच्या औदासिन्याचे कारण त्यांचे जन्मजात अंतर्मुख असे व्यक्तिमत्व आहे. ते जात्याच अतिसंवेदनक्षम आहे. 'आनंदाच्या भारानेही दुखावणारे चित्त। दुःख बघुनि मग नवल न त्याचे तुकडे होतात' हे त्यांचे स्वतःबद्दलचे आकलन अक्षरशः खरेच आहे. त्यातही परिस्थितीने[१] त्यांना अधिकच दुर्बल केले. रे. टिळक म्हणतात, 'बालकवींना आंग्लकवी विल्यम कॉपरप्रमाणे क्षुब्ध कारणामुळे किंवा कधी-कधी निष्कारण सुद्धा जीवाला कंटाळण्यापर्यंत विमनस्क होऊन बसण्याचा विकार जडला होता[२] 'निराशा' आणि 'उदासीनता' या कवितांत अशा विमनस्कतेचे अगदी स्पष्ट चित्र उमटले आहे.

सुंदर सगळे मोहक सगळे
खिन्नपणा परि मनीचा न गळे

नुसती हुरहुर होय जीवाला...का न कळे काही. बालकवींच्या दुःखाचे एक कारण त्यांची सुखाची कल्पना हे होय. बालकवींची सुखाची कल्पना त्यांच्या बाल्याशी निगडीत झाली आहे. त्यांच्या तारुण्याचे दिवस सांसारिक दुःखाने काळवंडून गेलेले दुःखाचे दिवस आहेत. त्यामुळे मातृपितृ छायेखालील बालपणीचा काळ त्यांना सुखाचा वाटला यात नवल नाही. आयुष्याच्या प्रभातकाळी चित्ताच्या क्षितिजावर क्षणासाठी लकलकलेली

१. शिणले कोणी संसाराचा वाहुनि माथा भार
अनंत चिंताकाहुरांनी भरे कुणाचा ऊर
किंवा—
आम्हा करिता दुर्धर चिंता।
नाना दुःखे हाल सभोता
पुरे नको ही नरतनु आता। दुःखाची राशी

२. ना. बा. टिळक-समग्र बालकवी, पुणे १९६६ पृ. ४१

सुखस्वप्ने तारुण्य काळात विलयाला गेल्याबद्दलचे दारुण दुःख बालकवींनी 'सुकलेली फुले' या कवितेत व्यक्त केले आहे. स्वाभाविकच बालकवींचे चित्त गतकाळातील बाल्याभोवती रममाण होते. कल्पनेच्या साह्याने त्याचे पुनरुज्जीवन करण्याचा ते प्रयत्न करतात. त्या सुकलेल्या फुलांनी स्मरणाच्या थडग्यातून भूमीवर यावे आणि आपणही तारुण्य सोडून बाल व्हावे असे त्यांना वाटते. अंधार, मत्सर आणि द्वेष यापासून दूर होऊन प्रेमाच्या बालसुलभ साम्राज्यांत विहार करण्याची मनीषा बालकवींनी प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे कितीतरी कवितांत व्यक्त केली आहे. या मनीषेचाच पुढे अतिरेक झाल्यामुळे आई–मुले, भाऊ–बहिण या नात्याबद्दलचा बालकवींच्या मनातला जिव्हाळा वयमानपरत्वे विकसित होताना दिसत नाही. त्याचे स्वरूप बाल्यांतील समजासारखे अप्रगल्भच राहते. 'दीपशिखा' या कवितेत 'आईच्या मांडीवरती। गोड अहाहा। शब्द किती। प्रेमसुधा कल्लोळच ते। चल जाऊ राहू तेथे। तू भगिनी मी तव भाऊ। दोघेही एकच होऊ। आईच्या हृदयात गडे। ऐक्य तुझे माझेही घडे', अशा ओळी येतात याचे कारण हेच होय.

केशवसुतांना शैशवाचे आकर्षण होते; व सरत्या शैशवाबद्दलचे दुःखही त्यांच्या कवितेत प्रकट होते. पण बालकवींच्या कवितेत केवळ सरत्या शैशवाबद्दलचे दुःखच प्रगट होत नाही तर ते शैशव धरून ठेवण्याचा दुबळा प्रयत्न त्यांचे मन करीत आहे असा प्रत्यय येतो. देवदत्त टिळकांना[1] लिहिलेल्या एका पत्रात ते तारुण्य आणि बालपण यांचे एकीकरण करण्याचा प्रयत्न करीत आहेत असे दिसून येते. किंवा आयुष्याच्या अखेरच्या दिवसात सत्ताविसाव्या वर्षी सोनाळकरांना लिहिलेल्या पत्रात[2] मातृत्वाबद्दलचे प्रगट झालेले प्रेम वाढत्या वयानुसार विकसित होणाऱ्या प्रगल्भतेचे दर्शन घडवीत नाही. उलट एका भावनिक आततायीपणाचे दर्शन घडविते. हा आततायीपणाच त्यांच्या दुःखाला प्रामुख्याने कारणीभूत झाला.

भ्रमनिरास

आयुष्यात जी मूल्ये हृदयांतरी परोपरीने जपली, ज्या मूल्यांच्या साह्याने आयुष्यातील क्लेश, दुःख, भीती यांच्यावर मात करता येईल असे वाटले तीच निरर्थक ठरल्याची विदारक जाणीव बालकवींच्या कितीतरी कवितांतून प्रकट झाली आहे.

जी रत्ने समजूनि विश्वपुलिनी
हर्षे अहो वेचिली
मानी धन्य मनी सदैव हृदयी
राखोनि जी ठेविली
झाली पारख हाय तीच ठरली
ही काचखंडे अता
हा दैवा दुबळ्या वृथैव मम ती
गेली जगी जीविता

अशा भ्रमनिरासातच स्वाभाविकपणे अंधःकाराची आळवणी होते. तेजाकडून तिमिराकडे वाटचाल सुरू होते.

अंधःकार मातला वेष्टितसे भूतला
शून्य मना खिन्नपणे सुखदायक जाहला

असा अंधःकार विचित्रपणेच सुखमय भासू लागतो. लोचनातील हरवलेली झोप, मनाची निघून गेलेली शांतता, हृदयातील अंतरशोषिणी घोर दाहकता बालकवींचे दुःख अधिकच गडद करतात. ज्या ठिकाणी विगत चित्त विस्मरणात काळ नांदतो तिथे हा वारा पोहचविल, तेजोमय दिव्य गोलावरचे देव शांती प्रदान करतील, दिशांच्या कुशीत मुख लपविल्यास सुख होईल अशी सुखाची कृतक आश्वासने फोलच ठरतात. आणि ये काळा, ध्यान तुझे मात्र मला लागले,' अशी मृत्युशरण वाणी बालकवींच्या मुखातून बाहेर पडते.

अपूर्णता

बालकवींच्या उदासीनतेचे आणखी एक कारण म्हणजे त्यांच्या वाटचाला आलेला अपूर्णतेचा प्रत्यय. 'या अपूर्ण जगतासंगे मन तृप्त कधीही न पावे' असा या संदर्भात त्यांचा रोकडा

१. दे ना. टिळक यांना लिहिलेले पत्र. ऑगस्ट १९१२ समग्र बालकवी, पुणे १९६६ पृ. २८८–२८९
२. बालकवींचे सोनाळकरांना लिहिलेले पत्र, समग्र बालकवी, पुणे १९६६ पृ. ३१७

अभिप्राय आहे. याशिवाय इच्छा, आशा, आकांक्षा यांच्या जळत्या चितेने त्यांना अधिकच दुःखी केले. सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबुनि घ्यावे, चैतन्यशक्तीचा साक्षात्कार करून घ्यावा, प्रेमाचे मधुबोल ऐकावे, काव्यात धुंद होऊन जगावे ही मनीषा; पण अंधाराचे पाश गळता गळत नाहीत, सांसारिक दुःखाची काहिली मन भाजून काढते, अशामुळेच काव्यनिर्मितीही थांबते. निर्मितीसाठी आसुसलेला जीव निर्मितीअभावी अस्वस्थ होतो. प्रतिभेचे पंख तुटून पडल्याची विव्हळ जाणीव होते. अपूर्णतेची खंत मनात घर करते. बालकवी एका पत्रात म्हणतात, "मानवी आशा, कल्पना, ध्येय यांची सत्यता जर जगात नेहमी अनुभवाला आली तर आम्ही स्वर्ग एका क्षणात या मर्त्य जगात सुद्धा निर्माण केला असता, पण वस्तु-स्थिती त्याच्या अगदी उलट आहे."[१]

स्वाभाविकच सुंदरता, चैतन्य, काव्य, प्रीती बालकवींना सर्वस्वी अंतरतात. आणि आनंदाच्या अगदी जवळ असूनही त्यांच्या हृदयात अपार दुःख दाटते. कधी आनंदाच्या मागे लागून वणवण भटकल्यावर आणि दमल्यावर, 'खराखुरा आनंद असे की सर्वच आभास?' अशा प्रश्नावर दुःखाच्या कळा अधिकच तीव्र होतात. बालकवी म्हणतात,

अपूर्णतेने पूर्ण निराशा हृदयाची होते
अमृत मुखाशी नेता नेता विषमय हो येथे.

संशयवाद

मूल्यगर्भ जीवनाची अपेक्षा, परंतु कुठल्याही पारंपरिक मूल्यावर नसलेली श्रद्धा हे बालकवींच्या दुःखाचे आणखी एक कारण आहे. एका पत्रात[२] ते म्हणतात, "आत्मा, ईश्वर, ब्रह्म, माया, पुनर्जन्म ही सगळी स्वप्ने आहेत. ती बालमनाचे समाधान करू शकतील. त्यांचा त्यांच्यावर विश्वास बसेल, पण निदान माझा तरी त्यांच्यावर विश्वास राहिला नाही." या बालकवींच्या श्रद्धाहीन मनाचा उत्कट प्रत्यय, 'हृदयाची गुंतागुंत', 'शून्य मनाचा घुमट', 'दुबळे तारू' इत्यादी कवितांत उत्कटपणे येतो.

ज्ञानाकरिता चाललेल्या धडपडीतून शेवटी अज्ञानतिमिरामध्ये फसत चालल्याची तीव्र जाणीव झाली की शब्दचिकित्साही विटते. फुलांचे सौंदर्य दिसेनासे होते. हिरव्या वृक्षलतांची शांतता मनात विषाद निर्माण करते. गगनाची व्यापकता, ग्रहगोलांची अनंतकिरणे, दिशांची अमर्यादता, काळाची अगाधता एक विशाल प्रश्नचिन्ह बनून समोर येते. या व अशा अनेक प्रश्नांची सनातन उत्तरे समाधान देत नाहीत. धर्मतत्त्वज्ञानाचे राजमार्ग पायाखालून निघून जातात आणि वेगळीच वाट पायाखाली येते. पण हीही ज्ञानाकडे, अद्वैताकडे नेत नाहीच. व्यक्तिगत आवर्ताला सनातन अज्ञानावर्ताचे स्वरूप प्राप्त होते. न स्वार्थात गोडी ना परमार्थात, ना वैराग्यात ना अनुरागात, ना कर्मात ना कर्मत्यागात, ना श्रद्धेत ना अश्रद्धेत. संदेहाचे विलक्षण काहूर अंतरंगात माजते. कुणीतरी ज्ञान द्यावे, कुणीतरी या दुःस्वप्नातून जागे करावेसे वाटते. पण हे दुःस्वप्न अधिकच गहन होत जाते.

तर्काशी सुसंगत असलेल्या जीवनाची बाल-कवींना कधीच प्रचीती येत नाही. जीवनाचा शाश्वत अर्थ सांगणारे तत्त्वज्ञान त्यांना फोल वाटल्यामुळे चिरंतन मूल्यांचा उपहासच अंतः-करणात दाटतो. या अर्थशून्य प्रतीतीने पाखरा-प्रमाणे त्यांचे मन विद्ध होते. उल्हास आनंद विटून जातो. मानवी जीवनातील परस्पर संबंधाविषयी निराधार झाल्यामुळे एकटेपणाची भयकारी जाणीव त्यांच्या अंतरंगात भरून राहते. जीवाचा एक विलक्षण थरकाप होतो. या थरकापालाच लोकविलक्षण आकृतीचे रूप ते देत राहतात. दुःखाला उदास सौंदर्यशिल्पाचा आकार प्राप्त होतो. अनंत काळासाठी त्या शिल्पात एक वेदनाजणीच्या तशीच साकळून राहिलेली असते.

दिन पक्ष मास ऋतु वर्ष भराभर गेले
हे रक्त जसेच्या तसेच साकळलेले

१. सोनाळकरांना लिहिलेले पत्र. २९-३-१९१२ समग्र बालकवी, पुणे १९६६, पृ. ३०८

२. सोनाळकरांना लिहिलेले पत्र, १२-६-१९१५ समग्र बालकवी, पुणे १९६६ पृ. ३१५

अपूर्ण कथाकाव्ये

अपूर्णतेचा शाप बालकवींच्या व्यक्तिमत्त्वाला जितका भोवला तितकाच त्यांच्या कथाकाव्यांनाही. ही कथाकाव्ये लिहावयास त्यांनी उत्साहाने सुरवात केली. पण कदाचित वृत्तीतील चांचल्यामुळे ती त्यांना पूर्ण करता आली नसावीत. त्यातील वर्णनावरून ती दीर्घ प्रीतिकाव्ये असावीत हे लक्षात येते काही काव्यांना इतिहास आणि तदनुषंगिक युद्धाच्या वातावरणाची जोड दिली आहे, बहुसंख्य दीर्घकाव्यात कथावस्तूआधीच्या पार्श्वभूमीदाखल केलेल्या वर्णनाचाच भाग आला आहे. ही काव्ये रचताना संपूर्ण स्वतंत्र कथावस्तू स्पष्टपणे बालकवींना स्फुरली होती काय ? असा प्रश्नही उपस्थित करता येणे शक्य आहे. ती तशी स्फुरली नसल्यास या काव्याच्या अपूर्णतेचा आणखी एक धागा हाताशी लागू शकतो. तथापि ही काव्ये प्राधान्याने वर्णनप्रधान आहेत. 'तू तर चांफेकळी' या काव्यात मात्र संवादात्मकता साधली आहे. नृपाळ आणि वनबालेतील संवाद मोठ्या युक्तीचा आहे. 'दौलतरावांची मंजूळा'मध्ये बंधू आणि पित्याच्या मृत्युनंतर एकटया राहिलेल्या हतभागिनी मंजुळेच्या वर्णनाला सुरवात करण्या. आधीच बालकवींची लेखणी स्तब्ध झाली. 'मोहिनी', 'निःश्वास', 'थडग्यातील गाणी' इत्यादी कथाकाव्यांना निसर्गाची वेधक पार्श्वभूमी लाभली आहे. उग्रकठोर निसर्गाची पार्श्वभूमीदाखलची वर्णने, बालकवींना निसर्गाच्या या रूपाचेही किती विलक्षण आकर्षण होते हे सिद्ध करण्यास पुरेशी आहेत. "सौंदर्यभरी भरलेले। तारुण्य चढे रंगास । अलवार कोवळे अंग । जशि काय फुलाची मूस' अशा स्त्रीदेहरूपाच्या वर्णनातून बालकवींची सूक्ष्म सौंदर्यासक्ती प्रकट झाली आहे. परंतु ही सगळीच काव्ये अपूर्ण आहेत, खंडकाव्यनिर्मितीसाठी आवश्यक असणारी वर्णनशैली आणि संवादात्मकता बालकवींजवळ असली तरी ती निर्मिती पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारा संयम, एकाच विषयाभोवती दीर्घकाळ रमण्याची क्षमता, पात्रप्रसंगस्वभाव यांची गुंफण, वाचकांची उत्सुकता कायम ठेवण्याची क्षमता इत्यादी गुण बालकवींजवळ होते की नाही इत्यादी प्रश्न या अपूर्ण काव्यामुळे प्रायः अनुत्तरितच राहिले आहेत.

शिशुगीते

शैशवाबद्दलच्या अमर्याद आकर्षणानेच तारुण्याचा उंबरठा ओलांडल्यावरही बालकवींची बालवृत्ती टिकवून धरली होती. या बालवृत्तीतूनच त्यांची शिशुगीते आकारास आली. 'चांदोबा मजला देई', 'रागोबा आला', 'माझा भाऊ' इत्यादी गीतांत त्यांनी बोबड्या बोलांची हेतुपुरस्सर योजना केली आहे. तीन चार वर्षांच्या मुलाच्या मनात निसर्गातील वस्तुजाताबद्दलची असणारी आकर्षणे, भावाबहिणीविषयीचे प्रेम, क्षणात हरवणारे चिमुकले रुसवेफुगवे इत्यादींचा मनोरम आलेख बालकवींनी काढला आहे. 'अंगाईगीता'तील रचनेवर लोकगीतांची आणि शब्दसंहतीवर कवी दत्तांची झाक आहे. 'या बाई या । बकुळिच्या झाडाखाली फुले वेचू या', किंवा 'गोड गोडुले। मोतियाचे दाणे कोणी खाली पाडले' अशा रचनेतून ती अगदी स्पष्ट दिसते. मूलतः ज्या बालवृत्तीतून ही गीते आकारास आली त्या बालसुलभ स्वप्नाळूपणावर उदासीनतेची पुढे छाया पडल्यामुळे हा शिशुवृत्तीचा अंकुर जपणे बालकवींना शक्य झाले नाही व स्वाभाविकच शिशुगीतांची निर्मितीही थांबली.

बालकवींची शैली

बालकवींची शैली अत्यंत सुबोध आणि प्रासादिक आहे. जणू 'सौंदर्याची बहरली वेल'. ती संस्कृत शब्दांचा अनुनय करते पण कठोर वर्णाचे शब्द जात्याच त्यांच्या प्रतिभेला अप्रिय आहेत. ते माधुर्याची हानी करतील या भीतीने त्यांनी या शब्दांना जाणीवपूर्वक नकार दिला आहे. अनेक परिष्करणे करून कवितेची ही शक्ती बालकवींनी वाढविली. मृदु आणि कोमल शब्दांचे नादमधुर जाळे बालकवी सहजी निर्माण करू शकतात. त्या नादाच्या आवर्तनात रसिक अडकला की त्याची सुटका होत नाही. ताल आणि नादाच्या सुमधुर मेळाने भारावून टाकणारे संगीतमय वातावरण निर्माण करण्याचे असाधारण कौशल्य बालकवींच्या

शैलीत आहे. वृत्तीच्या गोडव्याने आणि ऋजुतेने वातावरणातील खुलावट आणखी वाढली आहे. गोड निळ्या वातावरणातील ही अव्याज आणि अर्थवाही शैली संपूर्ण पृथगात्म आहे.

कुठल्याही संवेदनेची घनता वाढविण्यात बालकवी सिद्धहस्त आहेत. हिरवे हिरवे अशा दोन शब्दांनी आलेला हिरव्या रंगाचा प्रत्यय ते 'हरित तृणांच्या' या शब्दांनी अधिक तीव्र करतात. या रंगसंवेदनामध्येच 'गार गालीचे' असा शब्दप्रयोग करून स्पर्शसंवेदनेची त्याला जोड देतात व 'मखमालीचे' या शब्दांनी त्या संवेदनेची घनता वाढवितात. रंग आणि स्पर्श या संवेदनांचा मिलाप होऊन कवितेच्या पहिल्या ओळीतच एक अद्‌भूत मिश्र संवेदनेचा प्रत्यय रसिकांच्या मनावर ताबा मिळवून बसतो. रंग, गंध, स्पर्श, श्रुती या संवेदनांची इतकी रूपे बालकवींच्या काव्यात आहेत की त्यांनी मन स्तिमित होते. स्वर्गीय रंगाच्या फुटलेल्या भांडाराने बालकवींच्या प्रतिनिसर्गनिर्मितीला समृद्ध केले. प्रायः सर्वच रंग त्यांच्या प्रतिभेला प्रिय आहेत. त्यांच्या मिश्रणावर, त्यांच्या वापरावर त्यांचे कमालीचे नियंत्रण आहे. मेघांच्या मिश्रित रंगांनी नटलेल्या आकाराचे इतके कलापूर्ण वर्णन कुणीच केले नाही. रंगांची इतकी सहज स्वाभाविक आसक्ती दुसऱ्या कुठल्याही कवीत नाही. उत्कट तन्मयतेने आणि सूक्ष्म संवेदनशीलतेमुळे त्या आसक्तीला अनोखे कलारूप लाभले. अद्‌भूत कल्पना हा बालकवींच्या शैलीचा प्राण आहे. प्रारंभीच्या कवितेत ठराविक प्रतीकांतून आणि संकेतातून ही शक्ती आविष्कृत झाली. पण पुढे स्वतंत्र प्रतिमानिर्मितीने या शक्तीच्या विकासाची कितीतरी परिमाणे सिद्ध केली. गोड सुवासाचे आळसलेले मेघ, इवलासा वेल हलवून पवनास आलेली नीज, वणवण करून दमलेले रविकरजाल, काळोखाचा काळा बागुल, स्मरणाचे थडगे, स्वच्छ धुतलेले मेघांचे पडदे, चिंतन करणारी पश्चिमा अशा कितीतरी प्रतिमा बालकवींच्या काव्यात अवतरतात. या प्रतिमा निव्वळ होत म्हणून निर्माण होत नाहीत तर त्यातून एक प्रत्ययकारी आकार निर्माण करण्याचा बालकवींचा प्रयत्न असतो.

उत्प्रेक्षांच्या दुर्निवार आसक्तीचे एक कारण बालकवींच्या प्रतिभेला जात्याच प्रिय असणारा कल्पनाविलास आहे. 'अरुण', 'बालविहग' इत्यादी कवितांतील उत्प्रेक्षांची आसक्ती अगदी कळसास पोचली आहे. उत्तुंग कल्पनाशक्तीने एक दोन भराऱ्या मारल्या तरी संपूर्ण कवितेचे वातावरण त्याशी सुसंवादी नसेल तर त्या एकट्या अतएव कुचकामी ठरतात. बालकवींचे असे होत नाही. 'फुलराणी', 'संध्यारजनी' यातील वातावरणाची उत्कटता बालकवींनी कायम ठेवली आहे. इथे त्यांची शैली वर्णनपर होते खरी, पण तिला नाट्याची जोड मिळालेली असल्यामुळे वर्णनातील हटकून येणारी नुसती निवेदनप्रधानता टळली आहे. उद्‌गार, संबोधने, वचने यांचा इतका चपखल उपयोग बालकवी करतात की मन थक्क व्हावे. अगाइ !, गडे, बाई इत्यादी उद्‌गार संबोधने वापरून सगळ्याच नाट्याला वास्तवातील लाडिक आर्जवाची हलकी किनार बालकवी लावतात. आपल्या कवितेची ही 'नाकीडोळी चित्र बाहुली' बालकवींनी जाणीवपूर्वक घडविली. 'ती रमणी विशुद्ध तरुणी सौंदर्यरंगारिणी' असा प्रत्यय देण्याचे सामर्थ्य त्या घडणीत होते. तिची अलवारता, बालकवींच्या अकाल निधनाने तिच्या वाट्याला आलेले अर्धमुर्धेपण, बालतंद्रीतले तिचे लुकलुकणे सतत हवेहवेसे वाटणारे अतएव हृदयातून न पुसण्यासारखे झाले आहे. ■

५/वन लक्ष्मीनगर, नागपूर ४४० ०२२

श्री. द. ग. गोडसे : एक आलेख

जन्म :

३ जुलै १९१४.

शिक्षण :

बी. ए. / मुंबईत हळदणकर आर्ट क्लासेसमधून चित्रकलेचे शिक्षण / १९३७ मध्ये चित्रकलेच्या उच्चशिक्षणासाठी लंडन विद्यापीठातील स्लेड स्कूल येथे गेले / साहित्य व कला यांत विशेष रस. / टाइम्स् ऑफ इंडियाच्या आर्ट डिपार्टमेंटमध्ये नोकरी [१९३९] १९४४ नंतर दिल्लीत सरकारी प्रचार यंत्रणेत गॅझेटेड ऑफीसर या पदावर कार्यरत. : मुंबईत वेगवेगळ्या जाहिरात संस्थांत कार्यरत [१९४७ ते १९६६] १९६६–७४ संभाजी विद्यापीठात कला विभाग प्रमुख.

प्रवर्तन :

कल्पना चित्रालय, स्टुडिओ डी. जी. जी.

विशेष कामगिरी :

मराठी रंगभूमीवरील नेपथ्य; मराठी ग्रंथ व विविध प्रकाशनांचे मांडणीसंकल्पन या क्षेत्रात मूलभूत कार्य.

निर्मिती, (काही मुखपृष्ठे)

रणांगण (कादंबरी) / काही कविता, (मर्ढेकर) / रामदास चरित्र, (धार्मिक) / गोट्या / राजाशिवाजी / तीन शिलेदार (बालवाङ्मय) / खेळगडी / 'इये मराठीचिये नगरी' (नियतकालिके) / ह. वि. मोटे प्रकाशन, पॉप्युलर प्रकाशन, या संस्थांच्या कार्यातील कला विषयक मार्गदर्शन निर्मिती सहकार्य, सहभाग. : वा. रा. ढवळे संपादित 'पारिजात', 'साहित्य', 'रागिणी', ही मासिके, पु. आ. चित्रे यांचे 'अभिरुची', वाईचे 'नवभारत' आणि पु. शि. रेगे यांचे छंद ह्या नियतकालिकाशी संबंधित.

नेपथ्य :

शंभराहून अधिक मराठी नाटकाचे नेपथ्य / 'द्रौपदी नाटकाची' वेषभूषा, 'वैजयंती', भाऊबंदकी, होनाजी बाळा चौऱ्याशीच फेरा, लोकांचा राजा, हयवदन, अग्निपंख, बावनखणी, राजमुकुट, मुद्राराक्षस, शाकुंतल यांचे नेपथ्य.

इतर :

'काळगंगेच्या काठी' हे स्वतंत्र नाटक, शाकुंतल, घाडिला राम तिने का वनी [रूपांतरित नाटके]

सिनेसृष्टीतील कामगिरी :

जरा जपून, कुंकवाचा धनी, ही मराठी चित्रे व 'गुमास्ता' ह्या हिंदी चित्रपटाचे कलानिर्देशक.

लेखन :

सौंदर्यशास्त्रावरील त्यांचे विचारप्रवर्तक लेख, 'पोत', शक्तिसौष्ठव', 'गतिमानी', 'लोकघाटी' या ग्रंथातून प्रकाशित. 'नांगी असलेले फुलपाखरू' या पुस्तकात गेल्या चाळीसेक वर्षात लिहिलेले लेख संग्रहित. : सौंदर्यकल्पनेतील 'वाक्' संकल्पनेवर संशोधन सुरू.

नुकतेच प्रकाशित :

'मस्तानी' (न. चिं. केळकर पुरस्काराने सन्मानित) व 'नांगी असलेले फुलपाखरू.'

■

माझे लेखन सामान्यपणे ज्या प्रकारचे असते त्यात हा लेख मोडणारा नाही. गोडसे यांच्या सर्व साहित्यावर माझ्या पद्धतीने लिहायचे तर त्याला दोनतीन वर्षे सरी लागतील. आणि त्यांच्या ७५ व्या वाढदिवशी जो लेख यायला हवा तो ७८ व्या वाढदिवशी येण्यात औचित्य नाही. ते त्रेसष्ट वर्षाचे झाले त्या दिवशी काही स्नेह्यांनी त्यांची एकसष्टी मोठ्या प्रेमाने साजरी केल्याचे मला स्मरते तारीख व महिना बरोबर होते पण वर्षाच्या बाबतीत काहीतरी गफलत झाली होती. वरील कारणामुळे सर्व तपशीलाला फाटा देऊन काही प्रमुख वैशिष्ट्यांच्या निर्देशापुरता हा लेख मर्यादित राहील. एक व्यक्ती म्हणूनही गोडसे यांच्या विषयी त्यात थोडासा मजकूर असेल; पण त्यांची पुस्तके वाचताना, त्यांच्याशी बोलताना, चर्चा करताना एक व्यक्ती म्हणून ते कसे आहेत याबद्दल मला जे जाणवले त्याच्या पलीकडे हा मजकूर जाणार नाही.

गोडसे यांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण झाली हे ऐकल्यावर दोन गोष्टी तत्काळ जाणवल्या. एक म्हणजे ७५ चा माणूस सामान्यपणे जसा असतो तसे ते अजिबात नाहीत. त्यांची प्रकृती उत्तम आहे, बुद्धी तल्लख आहे, सर्व कार्यक्षेत्रांमध्ये पूर्वीइतकाच रस आहे, वादाची खुमखुमी तशीच आहे, जिद्द व हट्टीपणा यांच्यातही बदल झालेला नाही. अंगावर घेतलेल्या कामात पूर्वीचीच शिस्त, वक्तशीरपणा, धीमेपणा इत्यादी विशेष आजही दिसतात. एखाद्या ठिकाणी (उदा. साहित्यसंघ, मुंबई विद्यापीठ) अमुक वाजता पोचायचे आहे असे ठरले असेल तर ते तेथे नेमके त्या वेळेला निश्चित पोचतील अशी आजही खात्री वाटते. त्यासाठी कितीही अंतरावरून, व कोणत्याही वेळी निघून यायचे असले तरी ते येणार म्हणजे येणारच. विद्यापीठातील एका विभाग प्रमुखाने त्यांना एका विशिष्ट पूर्वनियोजित वेळी भेटीला बोलावले होते. काही कारणामुळे सदर विभागप्रमुख त्या दिवशी विद्यापीठात येऊ शकले नाहीत, गोडसे मात्र वेळेवर पोचले, व ऑफिसमोर चारपाच तास थांबले माझे ऑफिसही त्याच इमारतीत होते. पण ते माझ्याकडे आले नाहीत; कारण त्यांनी मला पूर्वसूचना दिलेली नव्हती; अशा परिस्थितीत माझ्या पूर्व-नियोजित कार्यक्रमात व्यत्यय आणणे त्यांना अयोग्य वाटले.

त्यांच्या वयाचा विचार आल्यावर जी दुसरी गोष्ट जाणवली ती लोकांना थोडी चमत्कारिक वाटेल. गोडसे आज पंचाहत्तर नसून शंभर-सव्वाशेचे असते तर ते पटणे जास्त सोपे गेले असते अशी आजकालची परिस्थिती आहे. खरे पाहता त्यांचा पिंड एकोणीसावे-विसावे शतक या संधिकाळच्या पिढीचा आहे. त्या कालखंडातील महाराष्ट्रात प्रचंड कामे केलेली मोठी माणसे होऊन गेली. रानडे, टिळक ही टोलेजंग माणसे; त्यांनी राजकारणाला केन्द्रबिंदू मानले हे खरे; पण त्यांनी त्याखेरीज समाजकारण, विद्याव्यासंग, अध्यात्म व इतर कितीतरी क्षेत्रात कामे केली. याच्या थोडचा नंतरच्या काळात खुद्द साहित्याच्या क्षेत्रातही मोठ्या आवाक्याची व विविध प्रकारची कामे केलेली माणसे आढळतात; उदाहरणार्थ, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, नरसिंह चिंतामण केळकर. गोडसे यांनी निदान या काळात तरी जन्माला यायला हवे होते. त्यांच्या तोलामोलाची माणसे त्यावेळी होती. पण दुर्दैव असे की ते उशीरा जन्मले; आणि त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली तेव्हा तर मराठीतला ढेपाळलेपणाचा काळ सुरू झाला होता. गांभीर्य, निष्ठा, कसदारपणा, विद्वत्तेची चाड यांची जागा चुरचुरीतपणा, 'रसाळ' गप्पागोष्टी यांनी घ्यायला सुरुवात केली होती. स्वतः गोडसे काही काळ चुरचुरीतपणांच्या अवस्थेत रमले होते. परंतु त्याच वेळी त्यांच्या गंभीरतेचा प्रवाहसुद्धा होता. तोच पुढे वाढत्या जोमाने उफाळून आला; त्यानंतर त्यांनी मागे वळून सुद्धा बघितलेले नाही; त्यांची दृष्टी आजही नव्या क्षितिजांकडे आहे.

लेखक मंडळीत गोडसे 'आर्टिस्ट' म्हणून ओळखले जातात. त्यांनी अॅप्लाइड आर्टमध्ये पारंगतता मिळविली. विविध संस्थांमध्ये या शाखेतली मोठमोठी पदे भूषवली; बडोद्याच्या महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठातून प्राध्यापक म्हणून ते सेवानिवृत्त झाले. मराठी वाचकांचा त्यांच्या या बाबतीतला परिचय बव्हंशी कव्हर-डिझाइन्सपुरताच मर्यादित असतो. त्यांनी काढलेले कव्हरवरच चित्र, अक्षरे यावरून असे चटकन लक्षात येते की पुस्तकात-

तील मजकुराविषयी त्यांना जी मर्मदृष्टी मिळालेली असेल ती त्यांच्या मनात सर्व वेळ असणार. मर्ढेकरांच्या 'काही कविता 'च्या पहिल्या आवृत्तीचे कव्हर-डिझाइन ज्यांना आठवत असेल त्यांना हे तत्काळ पटेल.

रंगमंचाच्या नेपथ्याबाबत त्यांनी केलेली कामगिरी, त्यातला वेगळेपणा लोकांच्या मनात ताजा आहे. पडदा वर गेल्याबरोबर टाळी पडणे ही गोष्ट मराठी रंगभूमीच्या इतिहासात नवी नाही. या क्षेत्रातला गोडसे यांचा वेगळेपणा म्हणजे नेपथ्यात त्यांनी मूर्त केलेली ज्ञानतपस्या. ते नाटकाच्या /कथा वस्तूच्या कालखंडात जातात, त्या काळातील वास्तवाचा खोलवर जाऊन अभ्यास करतात, त्या वेळच्या कला, वेषभूषा, स्थापत्य इत्यादींमधील परंपरा व संकेत यांचा चांगला परिचय करून घेतात. नाट्याच्या प्रयोगाशी, वातावरणाशी नेपथ्य एकजीव होण्यासाठी सारखे धडपडतात; या तपस्येमुळे ते यशस्वी होतात यात नवल नाही.

क्षेत्र कोणतेही असो, त्यांच्या अभ्यासात एकाच वरच्या दर्जाची पातळी आढळते. ज्या साक्षेपी चिकित्सक वृत्तीने ते महाराष्ट्राच्या राजकीय; सांस्कृतिक इतिहासाकडे वळतील त्याच वृत्तीने लोकवाङ्मयाकडे जातील, 'ज्ञानेश्वरी 'तील वेगवेगळ्या ठिकाणातील उताऱ्यांबद्दलच्या विविध वाचकांच्या प्रतिक्रियांचा आलेख तयार करतील. या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांना चांगली गती नसती; किंवा त्यांच्या प्रयत्नात दमदारपणा आणि चिकाटी नसती तर त्यांचे लिखाण विद्वत्ता व मर्मदृष्टी यांच्या बाबतीत इतके कसदार आणि तपशीलाने भरगच्च झालेच नसते. चित्रकला हा तर त्यांचा खास प्राविण्याचा प्रांत, पण तिच्याबरोबरीने शिल्पकला, स्थापत्यकला, नाट्यकला याही जेथे जरूर पडेल तेथे येऊन महत्त्वाची साक्ष देऊन जातात. संस्कृत साहित्य, जुने-नवे मराठी साहित्य, यांचा त्यांनी केलेला व्यासंग वरच्या दर्जाचा आहे हे कोणाही गंभीर प्रकृतीच्या वाचकास नव्याने सांगायला नको. संगीताच्या एका क्षेत्रात त्यांनी स्वतःच सर्जक प्राविण्य मिळविले आहे : पखवाज.

द. ग. गोडसे : काही व्यक्तिवैशिष्ट्ये

॥ रा. भा. पाटणकर

या सर्वांपेक्षा जास्त महत्त्वाचे व आजकाल फार क्वचित सापडणारे सामर्थ्य म्हणजे त्यांची लांब पल्ल्याची कल्पनाशक्ती. ही नुसती कलावंताची कल्पनाशक्ती नसून अतिभौतिकीत नैसर्गिकपणे रमणाऱ्या विचारवंताची प्रतिमा आहे. कलेच्या, समाजाच्या, एकूण विश्वाच्या चालीगतीविषयी जो अभ्युपगम त्यांनी मनात बाळगलेला असल्याचे दिसते तो भव्य, प्रचंड आहे. तो विस्मित करणारा आहे हे बहुतेकांना मान्य होईल. पण त्यामुळे निदान काही वेळा घटिते, घटना, तपशील यांच्यावर थोडाफार अन्याय होत नाही का ? तो होणे अगदी शक्य आहे. शरच्चंद्र मुक्तिबोध, म. वा. धोंड यांच्या मते गोडसे यांच्या हातून तो झालेला आहे. या मतात तथ्यांश आहे. यात शंका नाही. परंतु असा अन्याय हेगेल, मार्क्स, स्पेंग्लर यांच्याही हातून झालेला नाही का ? परंतु त्यामुळे सर्वांच्या कामाचे ज्ञानार्जनाच्या बाबतीतले महत्त्व कमी होत नाही. अर्थात, तपशीलात जाऊन सूक्ष्म चिकित्सा करण्याची क्षमता दाखवून ज्यांनी आपली विश्वासार्हता कोठेतरी पटवून दिलेली आहे. त्यांनाच हे विधान लागू पडते. गोडसे यांनी ही विश्वासार्हता अनेक संदर्भात ठामपणे प्रस्थापित केलेली आहे.

गोडसे यांचे विचार / लिखाण हे रानडुकराच्या मुसंडीप्रमाणे आहे. त्याना कशात गोडी निर्माण होईल याचा नेम नाही. पण ते एखाद्या दिशेला

वळले म्हणजे माघार किंवा विश्रांती यांचे नाव नको. त्या दिशेने ते सुसाट वेगाने जात असताना त्यांना मूळ विषयाला पूरक असे काही आढळले तरच ते तिकडे वळणार, त्यांच्या लेखनात युक्तिवादाबरोबर जो एक रोमँटिक आवेग दिसतो तो वरील वृत्तीतूनच निर्माण झालेला आहे.


माणूस जिद्दी, पेटलेला, हट्टी असल्याशिवाय त्याच्या हातून मोठाली कामे होत नसतात. गोडसे यांच्या अंगच्या वैशिष्टयांचा प्रत्यय त्यांच्या कार्यक्षेत्रांमध्ये जसा येतो तसा इतरत्रही येतो. दैनंदिन आयुष्यातली एकदोन उदाहरणे घेतो. माझी पत्नी ही पूर्वाश्रमीची माझी मामेबहीण. गोडसे हे तिचे आते भाऊ व माझे मावस भाऊ. एकदा ते आमच्याकडे आले होते. ते आले म्हणजे कोणत्यातरी विषयावर बरीचशी चर्चा व थोडयाशा घरगुती गप्पा असा कार्यक्रम असतो. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर (आमचे आजोबा व गोडसे यांच्या आजींचे बंधु) आणि त्यांच्या पिढीतले लोक, त्याच्या पुढच्या पिढीतले लोक हा त्यांचा आमच्या गप्पामधला एक ठरलेला विषय. श्रीपाद कृष्णांना चांगले गाता येत असे, चिंतामणराव व दीनानाथ यांच्या माथी एका ओळखीच्या माणसाने मारलेला वनवास श्रीपाद कृष्णांच्या एका पुतण्याचे फार थाटात झालेले लग्न, प्रभाकर श्रीपादांचा आयुष्यक्रम इत्यादीबद्दल ते तपशीलवार बोलतात, खामगावच्या कोल्हटकर कुटुंबियाबद्दल अत्यंत आपलेपणाने विचारपूस करतात...या सर्वात माणसांबद्दलची आस्था, त्यांचे सूक्ष्म गुणदोष ओळखण्याची क्षमता हे सर्व दिसते. अशा संथ लयीतल्या गप्पा चालू असताना गोडसे केव्हा व कशामुळे उसळतील हे सांगणे कठीण. आमच्या साहित्य सहवासातल्या एकाने तेथल्याच एका स्त्रीला 'बाईजी' म्हटल्यामुळे त्या कशा रागावल्या ही हकीकत आम्ही त्यांना सांगितली. आमच्या दृष्टीने हा केवळ भाषिक गैरसमजामुळे झालेला साधा मजेदार प्रसंग होता. पण हा क्षुल्लक गैरसमज कसा नाही, 'बाईजी' म्हणणे कसे अपमानास्पद आहे, ज्याला हिंदी येते त्याने अशी चूक करणे अक्षम्य कसे आहे हे अत्यंत गंभीरपणे ते सांगू लागले. त्यांच्या मते नुसता 'बाईजी' नव्हे, तर 'बाई' हा शब्दही अनुचित आहे. आम्ही दोघे मराठीत 'बाई' हा शब्द अनेकदा आदरार्थी कसा वापरला जातो हे सांगत होतो. (स्वत: गोडसे बहुतेक स्त्रियांना 'देवीजी' म्हणतात.) वाद संपता संपता गोडसे माझ्या पत्नीला म्हणाले 'ए बाई, मला प्यायला पाणी दे जरा.' येथे 'बाई' या शब्दाचा उपयोग सदभिरुचीला धरून आहे का, असे मी मुद्दामच त्यांना विचारले; तेव्हा ते म्हणाले की 'इतरत्र नाही. पण बहिणीला 'बाई' म्हटलेले चालते.' त्यांच्या म्हणण्यात तथ्य असल्याचे हिंदी व मराठी या दोन्ही भाषा जाणणाऱ्या काही जाणकारांकडून नंतर आम्हाला कळले. यामुळे माझ्या ज्ञानात जरी थोडी भर पडली तरी गोडसे उगीचच तापले असे मात्र आम्हाला वाटल्यावाचून राहिले नाही.

यापेक्षाही मजेदार प्रसंग नात्यातल्यापैकी कुठल्या तरी मुंजीच्या वेळी घडला. त्या मुंजीचे आमंत्रण आम्हाला असणारच असे सर्वांनी गृहीत धरले होते. पण आम्हाला आमंत्रण मिळाले नसल्याने आम्ही गेलो नाही. त्यानंतर जेव्हा गोडसे आमच्याकडे आले त्यावेळी आमच्या न येण्याचे कारण ऐकून ते भडकले. 'मी स्वत: तुमच्या आमंत्रण पत्रिकेवर पत्ता लिहिला होता; आमंत्रण मिळाले नाही असे तुम्ही म्हणता याचा अर्थ काय ? समजा ते मिळाले नसले तरी तुम्ही यायलाच हवे होते,...' पोस्टात टाकलेली पत्रे अनेकदा गहाळ होतात ही साधी गोष्टही त्यांच्या ध्यानात आली नाही. चुकीने का होईना पण जर आमंत्रण मिळाले नसेल तर माणसाला त्या समारंभास जायला संकोच वाटतो हेही त्यांच्या ध्यानात आले नाही. त्याचे म्हणणे हट्टीपणाच्या पुढे जाऊन आडमुठेपणाचे कसे बनू शकते याचे हे उदाहरण. एरवी खेळीमेळीने, आपलेपणाने बोलणारे गोडसे एकदा वाद करू लागले म्हणजे केव्हा तिरीमिरीला येतील हे कळत नाही. काही बाबतीत ते जणू कटाक्षाने अगदी 'वन वे ट्रॅफिक'चा नियम पाळतात. गोडसे हे नेहमी कोणत्या तरी संकल्पाने पछाडलेले, त्यात सर्वार्थाने स्वत:ला झोकून दिलेले, व म्हणून

आदरणीय खरे पण ते तिरशिंगराव आहेत हेही तितकेच खरे. गोडसे नेहमी भेटणाऱ्या ग्रह गोलांपैकी नव्हेत; ते धूमकेतूप्रमाणे केव्हातरी उगवणार. या लेखातील शेवटच्या ओळी वाचून त्यांनी डोक्यात राख घातली नाही म्हणजे मिळवलो. ■

२-शांकुतल
साहित्य सहवास
बांद्रे, पूर्व मुंबई-४०००५१

श्री. द. ग. गोडसे यांच्या अमृतमहोत्सवी जीवनाला
युगवाणीचे विनम्र सादर प्रणाम !



कै. ना. के. बेहेरे : एक आलेख

(४ जुलै १८९० – १९ जानेवारी १९५८)

कै. ना. के. बेहेरे जन्म शताब्दी वर्ष १९८९–९०

नाव : नारायण केशव उर्फ नानासाहेब बेहेरे.
जन्म : ४ जुलै १८९०
मृत्यू : १९ जानेवारी १९५८

कार्य

वाङ्मयात कलेचे स्थान दुय्यम मानणारा, राष्ट्रातील विविध आंदोलनातून समरसता हा वाङ्मयाचा जीव व आत्मा मानणारा विचार. समाजमनाच्या घडणीस हातभार लावणारा आदर्श ध्येयवादाचा पुरस्कार / महाराष्ट्र साहित्य परिषदेचे काही काळ कार्याध्यक्ष. / विदर्भ साहित्य संघाच्या आद्य संस्थापकांपैकी एक / पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेत व्याख्याने. / १९३७–३८ या सालात नागपूर विद्यापीठाच्या रा. न. किनखेडे स्मारक व्याख्यनमालेत इंग्रजी भाषण. / सात–आठ खंडकाव्यांची रचना.

प्रकाशित वाङ्मय :

काव्यसंग्रह–

मोत्यांची माळ (विषयवार ५ भागात विभागणी)
हिंदूधर्म प्रकाश (ओवीबद्ध काव्य)
स्मरणी (खंडकाव्य, कै. बेहेरे यांच्या प्रथम पत्नी कै. लक्ष्मीबाई बेहेरे, कवियत्रीचे संबंधाने).
'धवलगिरी.'

कादंबऱ्या :

ध्येयाकडे (मध्यवर्ती कल्पना : एच. जी. वेल्स यांची 'टाईम मशीन'ही कादंबरी).
सीता वनवास / अहिल्योद्धार / जीवन–रहस्य, हिंदू कोण ?

ऐतिहासिक :

सन १८५७ / पहिले बाजीराव पेशवे (मराठी भाषेतील समग्र पहिले चरित्र). / 'शककर्ता शालीवाहन' / मेवाडचा सिंह.

स्फुटलेखन :

बोथट बाण (औपरोधिक लेखन) / गरीबांचा वैद्य.

नाटक :

(अ) पिझारो (अनुवादित).

इतर :

मनोरंजन, आनंद, खेळगडी, ज्ञानमित्र, मधुकर, नवयुग, काव्यरत्नावली या विविध नियतकालिकांमधून विविध विषयावर लिखाण. / 'सप्तर्षी' या कवितेमुळे १९३२ साली मध्यप्रांत वऱ्हाडच्या शिक्षण खात्यातील प्रथमश्रेणी सेवेतून ब्रिटीश सरकारने बडतर्फ केले. / "The Background of Maratha Ranaissace" हे त्यांच्या इंग्रजी भाषणाचे पुस्तक प्रकाशित. / शिक्षण तज्ञ. / फल ज्योतिष्य शास्त्रात विद्याभूषण ही पदवी. / मराठी चवथीपर्यंत त्यांची पाठ्यपुस्तके होती. (१९३४–१९३९) / नागपूर विद्यापीठात मराठीला योग्य तो दर्जा मिळावा व मराठीचे पदव्युत्तर शिक्षण या विद्यापीठात असावे याकरता खटपट करणाऱ्यांतील एक प्रमुख व्यक्तिमत्त्व / नागपूर विद्यापीठातील मराठीत एम. ए. परीक्षेत प्रथम येणाऱ्यास प्रा. ना. के. बेहेरे व सुवर्णपदक देण्यात येते. / ६० वर्षापूर्वी नागपूर विद्यापीठातून पहिल्या येणाऱ्या दोन विद्यार्थ्यांना ना. के. बेहेरे यांचे नावाने पारितोषिके होती. / मराठी अथवा संस्कृत घेऊन पहिला येणाऱ्या मुस्लीम विद्यार्थ्यास व उर्दू / पार्शियन घेऊन पहिल्या येणाऱ्या गैर मुस्लिमास कै. बेहेरे पारितोषिके देण्यात येत होती.

■

समकालीन प्रवृत्तींमध्ये रंगलेला वाङ्मयसेवक : ना. के. बेहेरे

: डॉ. आशा सावदेकर

कै. नारायण केशव बेहेरे यांच्या जन्मशताब्दीचे हे १९८९–९० वर्ष ! ना. के बेहेरे यांचे वैशिष्ट्य असे की त्यांनी काव्य केले, कादंबरी वाङ्मयात भर घातली, एक अनुवादित असे नाटक लिहिले व उपरोधिक लेखसंग्रहही निर्माण केला. त्यांच्या साहित्यनिर्मितीपेक्षाही त्यांची साहित्यप्रेमी आणि भाषाप्रेमी दृष्टी त्याकाळात महत्त्वाची होती नागपूर विद्यापीठाच्या विद्वत् सभेत त्यांचा समावेश होता. मराठी भाषा आणि साहित्य यावर प्रेम करणारे, राष्ट्र आणि स्वत्व याबद्दल काही विचार बाळगणारे असे त्यांचे व्यक्तित्व होते.

बेहेरे यांचे खरे महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे त्यांनी कवितेपेक्षाही कवितेमागील भूमिकेवर भर दिला; आणि १९३० च्या सुमारास मराठीच्या अनास्थेची कारणमीमांसा करून लोकजागृतीकडे लक्ष पुरवावे असा पुकारा केला. ना. के. बेहेरे यांच्या या भूमिकेमुळे त्यांची कविता ही अद्वितीय बनली नाही पण ज्यात भावनेचा चित्रण आहे असे रोकड्या बोलांचे रूप मात्र तिला प्राप्त झाले. ग्रंथाला आश्रय मिळतो तो सर्व सामान्यांकडूनच कारण पगारदारांना इंग्रजी नियतकालिके व पुस्तके घेणे परवडते. असे रोखठोक सांगून ना. के. बेहेरे यांनी मध्यमवर्गाचा साहित्य व संस्कृतीशी असलेला संबंध पुन्हा एकदा उलगडून दाखविला. विदर्भातील त्या काळच्या वातावरणावर ना. के. बेहेरे नेमके बोट ठेवतात. विदर्भातील नियतकालिकांचा अभाव, छापखाने थोडे व जुनेपुराणे यामुळे वारंवार वैदर्भीयांना पुण्यामुंबईच्या तोंडाकडे पहावे लागते असा महत्त्वपूर्ण निष्कर्ष बेहेऱ्यांनी 'मोत्याची माळ' या त्यांच्या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत नमूद करून ठेवलेला आहे.

ना. के. बेहेरे यांची दृष्टी ही अर्थातच त्यांच्या भोवतालच्या वातावरणावर, त्यातील प्रश्नांवर खिळली होती. ही त्यांची दृष्टी त्यांच्या कादंबरी-वाङ्मयातही स्पष्ट प्रतिबिंबित झालेली दिसते. त्यांच्या भोवतालच्या प्रश्नांची उत्तरे त्यांना पुराणकालातही दिसली आणि त्या भावसाधर्म्या-मुळे त्यांनी 'अहिल्योद्धार' (१९२९) सारखी पौराणिक कथा पुन्हा एकदा नव्याने मांडली आणि वाकडे पाऊल पडलेल्या स्त्रियांबद्दल माणुसकीचा कळवळा व्यक्त केला. त्याचप्रमाणे 'हिंदु कोण' (१९१९) 'शककर्ता शालिवाहन' (१९४३) अशा प्रकारच्या इतिहासाच्या आकर्षणातून निर्माण झालेल्या कादंबऱ्या बेहेऱ्यांनी लिहिल्या. ज्या कादंबरीने त्यांनी कादंबरी वाङ्मयात पहिले पाऊल टाकले ती 'सीतावनवास'ही (१९१४) कादंबरीही पौराणिक स्वरूपाची होती. १९२५ पर्यंत पुन्हापुन्हा बेहेरे पौराणिक कथांकडे वळले आणि त्यानंतर 'जीवनरहस्य' व 'युद्धसंसार' या कादंबऱ्यांमध्ये त्यांनी नव्या दृष्टीने नवे विषय हाताळले. 'ध्येयाकडे' (१९३४) या त्यांच्या कादंबरीतील केंद्रभूत कल्पना वेल्सच्या 'टाइम मशीन'वरून त्यांनी उचलली. विज्ञानकादंबरी असे नाव तिला देता येणार नाही पण परकीय विज्ञानदृष्टीला महत्त्व देणे बेहेऱ्यांना अगत्याचे वाटले ही त्या काळाच्या दृष्टीने मराठी साहित्या-तील महत्त्वाची घटना होती.

ना. के. बेहेरे यांनी काही कथाही लिहिल्या. आपल्या कथेसाठीही त्यांनी ऐतिहासिक दंतकथेचा उपयोग करून घेतलेला दिसतो. 'विलक्षण धैर्य' या त्यांच्या कथेचा त्यासाठी विशेष उल्लेख करावा लागेल. अर्थात् कथेच्या क्षेत्रात त्यांच्या कथेने खूप मोठे स्थान मिळविले नसले तरी स्वकालाने घडवलेल्या प्रतिभाबलाने भूतकाळाकडे पाहणे हा आपला विशेष त्यांनी कथेतही कायम ठेवला, इंग्रजी शिक्षणाने दिलेली आधुनिकता आणि परंपरेकडे पाहण्यातील नवता यातून त्यांची दृष्टी घडलेली होती.

ना. के. बेहेरे यांचे 'बोयट बाण' त्यावेळी 'मनोरंजन' व 'करमणूक'मध्ये प्रसिद्ध होत होते. त्यात तऱ्हेवाईक व्यक्तींचे उपरोधपर चित्रण आहे. त्यात पंडित दीनानाथ पांडे, प्रोफेसर डचांडी, रावसाहेब ढमाले, रावसाहेब ढेरपोटे अशा व्यक्ती येतात. तर 'बातमीदार' सारख्या कथेत प्रासंगिक विनोद दिसतो. 'बोयट बाण' मधील बहुतेक लेख अतिशयोक्त विनोद आणि उपहास अशा स्वरूपाचे होते.

बेहेरे यांचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे त्यांनी प्रथम 'केशवसुत' हेच नाव स्वीकारले. पुढे त्यावर आक्षेप आल्यामुळे त्यांनी आपल्या पूर्ण नावाने कविता रचली. केशवसुतांसारखी काव्य-दृष्टी हा तर या अनुकरणाचा हेतू नसावा असे वाटते. कारण बेहेऱ्यांना आपण कवितेने लोक-जागृती करू असा विश्वास वाटत होता केशव सुतांनी ज्या 'समता, बंधुता व स्वतंत्रता' या त्रिपुटीवर विश्वास ठेवला तीच तत्त्वे बेहेऱ्यांनीही आपल्या काव्यविचारात गृहीत धरली. आपली भूमिका मांडताना ते म्हणतात, "आजच्या मराठी वाङ्मयसेवकांना राजाश्रय नाही. धनिकाश्रयही नाही. घरचे खाऊन त्यांना लष्कराच्या भाकरी भाजाव्या लागतात. देशातील शिक्षित, खानदानी श्रीमंतांना व पगारदारांना टाइम्स, पायोनियर ही पत्रे व इंग्रजी पुस्तके घेणे फारतरपरवडते. मराठी पुस्तकांचा संपर्क त्यांना रुचत नाही. कारण लक्ष्मी-सरस्वतीचे पूर्वापार चालत आलेले वैर! आज मराठी ग्रंथांना जो आश्रय मिळतो. तो सामान्य दर्जाच्या व गरीब लोकांकडूनच मिळतो. तेच आजच्या वाङ्मयाचे पोशिंदे आहेत. पण या नव्या लोकशाहीच्या युगात ही इष्टापत्तीच म्हटली पाहिजे! कारण त्यामुळे वाङ्मय देखील राजे व श्रीमंत यांच्या वाऱ्याला उभे न राहता त्यांची स्तुती करण्यात दंग न होता. समता, बंधुता व स्वतंत्रता या लोकशाहीच्या त्रिताल ठेक्याने चालू लागले. हिंदुस्थानातील आजचे वाङ्मय कलेच्या उपासनेपेक्षा .लोकजागृतीकडे अधिक का पाहते याचे मर्म ह्या नवीन युगमंत्रात सापडू शकेल. देशातील संकटांशी जो झुंज घेण्यास धजणार नाही, लोकांच्या सुखदुःखाशी, विचार-विकाराशी, भावना-आकांक्षांशी जो समरस होत नसेल व होऊ शकत नसेल त्याला कवी किंवा कलावान् तरी कसे म्हणता येईल? कारण कलेचे मंदिर बुद्धि-मत्तेवर उभारले जात नाही हृदयसंवेदना हाच कलेचा आत्मा होय." (ना. के. बेहेरे, भूमिका, 'मोत्यांची माळ'. परचुरे, पुराणिक आणि मंडळी प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९३०, पृष्ठ ११).

बेहेरे यांच्या लोकतत्त्वीय भूमिकेमुळे त्यांनी राष्ट्रीय आकांक्षांचे उच्च ध्येय आपल्या कवितेत मांडले व निस्संदिग्धपणे त्याचा पुरस्कार केला. वाङ्मयाची व्याख्या त्यांनी स्पष्ट शब्दात मांडली, "राष्ट्रातील विविध आंदोलनांशी समरसता हा वाङ्मयाचा जीव व आत्मा होय." (भूमिका 'मोत्यांची माळ' पृ. १६.) आपल्या काव्याबद्दल ते कवितेतही म्हणतात—

राष्ट्रामधल्या गूढ भावना
अस्फुट शब्दे जरी
दाविल्या उकलुनी लवभरी
(मोत्यांची माळ पृ. ४१४)

बेहेरे यांचे विचार एका बाजूने राष्ट्रनिष्ठ तर दुसरीकडे आधुनिक. त्यामुळे अनेकदा त्यांच्या वर टीकाही होत असे. 'प्रतिभा'च्या २४ एप्रिल १९३३ च्या अंकात त्यांनी 'वाङ्मयातील गुरुबाजी' नावाचा लेख लिहिला. त्यातील चीड ही वाङ्मयसंप्रदाय व गुरुपरंपरा यातील ढोबळ दृष्टीवर होती. पण ती न कळल्यामुळे पुढे बराच काळ 'प्रतिभे'त वाग्युद्ध झडत राहिली.

ना. के. बेहेरे हे वृत्तीने आणि विचाराने आधुनिक होते. त्यांची विशिष्ट अशी दृष्टी होती; तिचाच पुरस्कार त्यांनी सतत केला. कल्पना-देवीची आराधना करतानाही त्यांना 'होऊ दे मज पारख पुरती मनुजांच्या हृदयाची!' अशी प्रार्थना करावीशी वाटलेली आहे. (देवी कल्पना.) कादंबरीतही त्यांना समकाल महत्त्वाचा वाटलेला आहे. त्यांची दृष्टी राष्ट्रावर, राष्ट्रनिष्ठेवर आणि राष्ट्राच्या परिस्थितीवर खिळलेली आहे. तीत 'माणूस' म्हणूनही आपली काही कर्तव्ये आहेत. याची पूर्ण जाणीव आहे. १९३० च्या सुमारास ज्यावेळी कविता अधिकाधिक आत्मनिष्ठ नव्हे 'अहंनिष्ठ' बनू पाहत होती त्या काळात

आनंदराव टेकाडे, जयकृष्णबुवा उपाध्ये आणि ना. के. बेहेरे या तीन वैदर्भीय कवींनी मात्र सतत विशिष्ट मतांचा, विशिष्ट काव्यदृष्टीचा उच्चार गद्यात आणि पद्यात केला आहे. काव्याच्या महत्तेनुसार बेहेरे यांचे स्थान वरचे नसेल ! कादंबरीकार वा कथाकार म्हणूनही ते श्रेष्ठ नसतील ! पण विशिष्ट काळात समकालीन जाणिवा, समकालीन प्रेरणा व समकालीन परिस्थिती यांच्यावर आपली साहित्यदृष्टी खिळविणारा तो एक कलावंत होता हे महत्त्वाचे आहे.

४ जुलै १८९० रोजी हुशंगाबाद जिल्ह्यात टेंभुर्णी येथे जन्मलेला हा वाङ्मयसेवक. त्याने आपल्या व्यक्तित्वात काळाचे सादपडसाद मुखून घेतले म्हणून महत्त्वाचा ठरतो. म्हणूनच की काय त्यांची दृष्टी ही अधिक जिवंत वाटते. आपली दृष्टी स्पष्ट करताना बेहेरे 'मोत्यांची माळ'ला जोडलेल्या भूमिकेत म्हणतात.

"आज हिंदुस्थानातील दगड देखील स्वातंत्र्याच्या निनादाने दुमदुमत असता बुद्धिवान, ध्येयवादी व समाजशिक्षक अशा थोर पदवीचा लेखकवर्ग त्या गर्जनेच्या जयघोषाला भिऊन आपले कान काय बंद करील ? की सुमनं सुकलेले पाहून विव्हळ होणारे त्याचे मृदुल अंतःकरण राष्ट्रातील घडामोडींना हेलावणार नाही, इतके ते नपुंसक बनले आहे ? अशा ध्याडाने निर्माण केलेल्या लिखाणाला वाङ्मय हे नाव लाभू शकत नाही. ते जिवंत माणसाचे असले तरी मृत लिखाण होय. तो जुन्या भक्तिपर वाङ्मयाचा किंवा युरोपियन वाङ्मयाचा पोकळ, बेडौल न निर्जीव पडसाद होय" (ना. के. बेहेरे भूमिका, 'मोत्यांची माळ' पृ. १३).

ना. के. बेहेरे यांचे समग्र साहित्य हे असे समकालीन वृत्ती प्रवृत्ती मांडणारे, नव्या दृष्टीने वेध घेऊ पाहणारे असे आहे. म्हणूनच जन्मशताब्दीच्या निमित्ताने त्यांचे व त्यांच्या काव्यदृष्टीचे, कलादृष्टीचे स्मरण करणे ही महत्त्वाची गोष्ट ठरावी. ■

सी–२ हेमराज अपार्टमेंट्स
१२२, शिवाजीनगर,
नागपूर–१०

आशा बगे ह्या माझ्या मैत्रिणीच्या कथेचा प्रवास तिने कथालेखनाला सुरुवात केल्यापासून मी जवळून बघितला, अनुभवला आहे. ती परगावी असताना तिच्या पत्रातून व नंतर प्रत्यक्ष. कविवृत्तीचे हळूवार मन असलेल्या आशाने सुरुवातीला कविताच लिहिल्या कवितेवर व गाण्यावर निःस्सीम प्रेमभक्ती असूनही आशा बगे नंतर कथेकडे वळली. परंतु काव्याचे, गाण्याचे पडसाद तिच्या कथांत उमटतातच. आशाला संगीताची पदवी आहे हे तिने न सांगताही तिच्या कथा सांगून जातात इतके हे स्वरूप ऋणानुबंधी आहे. एकमेकानुरूप आहे.

आशा बगेची निर्मिती ही कशी आहे ? किंवा तिच्या अंतर्मनात चाललेल्या बीजवादळाचे स्वरूप काय आहे ? हे प्रश्न निर्माण होणे अपरिहार्यच आहे. कथेच्या संदर्भात तिच्या मनात काहीतरी सांगण्यासारखे घोळते आहे हे तिच्याशी बोलताना जाणवायचे. तिच्यातली कवयित्री, तिच्यातले गाणे, तिचा अनुभव या साऱ्यातून जो कथेचा तिहेरी गोफ विणल्या गेला आहे त्याचे पद्धतशीर विवेचन मला हवे होते. साहित्याच्या वाचकाला, अभ्यासकालाही हवे होते. तिच्याशी बोलताना नेहमीच जाणवते की कुठेतरी हरवलेल्या अनुभवात गढून जाऊन मग आत्मनिर्भर होत ती हळूहळू स्वच्छ, आभाळ धुवून निघालेल्या पावसासारखी असते. असे क्षण फार थोडे असतात. अशाच काही क्षणांचे बोट धरून आशाशी झालेली ही कथाचर्चा ! नुसती चर्चाच नव्हे तर तिच्या एकंदर व्यक्तिमत्वावर तिच्याच कथांनी कसा घेराव केला आहे याचे सजग दर्शन म्हणजे ही मुलाखत

मी : मराठीत गाडगीळांच्या कथेपासून नवकथेचा प्रारंभ होतो. अरविंद गोखलेही यातलेच. अलीकडचे ह. मो. मराठे हेही त्याच वळणानी जात आहेत. गौरी देशपांडे, सानिया, या तर तुला समकालीनच आहेत. मग अशावेळी तुला कथेची जुनी वाट स्वीकारावीशी वाटली की तुझा तू स्वतंत्र मार्ग हाताळला ?

आशा : सध्या माझं लिहिणं सुरू आहे. त्यामुळे मागे वळून मी पाहिलेच नाही. नवकथेच्या आधीची वाट मी घेतली नाही. पण गाडगीळ-गोखल्यांच्या कथांतील अनुभवाची सूक्ष्मता, आणि लहानशा अनुभवावर आकाशतोलून धरून माणसाच्या मनाचा तळ शोधण्याचे लक्ष्य हे माझ्यात कायम राहिले. एवढ्या पुरती मी त्यांची वाट स्वीकारली. पूर्णपणे माझा मार्ग स्वतंत्र नाही. या नवकथेनीच मला वाट दिलेली आहे.

मी : तुझ्या कथेतली व्यक्तिचित्रणं उत्कृष्ट असतात. मनाची चटकन पकड घेतात. चित्रकाराने ज्या सफाईने चित्र काढावे त तशी सफाई त्यात असते. 'रुक्मिणी'मधली रेणू, 'महावस्त्र'मधला आचारी, 'रंग'मधला देवेंद्र, 'निवडूंग' मधली गायत्री अशी अनेक व्यक्तिचित्रण त्यात येतात. तर अशी व्यक्तिचित्रण रंगवताना तुला भाषा कधी अडली कां ? तिला कधी जुन्या वळणात टाकावी, पारंपरिक करावी किंवा वाकवावी, किंवा मुद्दाम प्रयोग करावे असे वाटले कां ?

आशा : अनुभवामधे व्यक्ती, त्या व्यक्तीचे संबंध, परस्परांशी छेद देणारे-किंवा मिळणारे हे रक्तात अभिसरण व्हावं तितके एकमेकात मिसळून गेलेले असतात. त्यामुळे भाषा वाकवण्याचा किंवा अडण्याचा प्रश्नच येत नाही. कित्येकदा तर मनात नसलेले किंवा न योजलेले शब्दही लिहिले जातात

'रंग' मधला देवेंद्र, ते बुवा आणि मानसी यांचे एकमेकांशी सुसंगत आणि विसंगत, एकमेकांना छेदणारे जे संबंध आहेत त्यातून मानसीला जो अनुभव मिळतो. तो असा की देवेंद्रची मैफिल संपलीच, तो आता परतणार नाही. बुवा आणि देवेंद्र यांना जे ताकदीने जमले ते आपल्याला जमले नाही हे तिला लक्षात येतं तेव्हा तिला देवेंद्र समजतो. म्हणून प्रश्न भाषेचा पडत नाही. ती अनुभवात मिसळून जाते. आणि जेव्हा असा प्रश्न पडला असेल तेव्हा ती कथा जमलेली नसेल. दिवाळी १९८९ च्या 'मौजे'मधे 'दर्पण' ही कथा येते आहे. ती कथा तू वाचून बघ म्हणजे माझे म्हणणे तुला कळेल.

मी : भारतीय परंपरेतील सणवार, उत्सव, व्रतं, कर्मकांड, कीर्तनपरंपरा, संगीत आणि नाटक याच्या आसपास घडलेले अनुभवच तू नेहमी कथेत साकारते. या व्यतिरिक्त जरा बाहेर खिडकी उघडून कां बघत नाही? की बाहेरच्या स्रोतामुळे मनातली वादळी गुंतागुंतीची विश्लेषणं लिहिता येणार नाही असं वाटतं?

आशा : कीर्तन, किंवा संगीत, नाटक, माहेरी असणारी माणसं, नोकरचाकर, वाडा यातील माणसं, त्यांचे अनुभव–हे माझ्या मर्यादित परिघात मला दिसले. त्यामुळे त्या माणसांबद्दल मी ताकदीने लिहू शकले. आता पाहुणा हीच कथा घे. इथे अनुभव रक्तात भिनला नाही तर नुसताच चाटून गेला. त्यामुळे ते लेखन निवेदनाच्या पातळीवर गेले. त्यामुळे ही माझी मर्यादा आहे असं मी समजते. भारत सासणेच्या 'उंट' या कथेतला किंवा 'डफ' यातला अनुभव तसे बाहेरचे असूनही त्यांनी ताकदीने लिहिले. असे बाहेरचे अनुभव माझ्या परिघाबाहेरचे आहेत.

आशा बगे

[मुलाखत]



खास युगवाणीकरिता
सुलभा हेर्लेकर
यांनी घेतलेली मुलाखत

अनुक्रमणिका

मी : तुझ्या कथेच्या विकासाच्या दृष्टीने 'अत्तर' हा संग्रह मला महत्त्वाचा वाटतो. 'मारव्या 'तल्या कथांपासूनच सत्यकथेशी तुझा संबंध होता. तरी 'अत्तर'पासून तो दृढ झाला. तू असं म्हणायचीस की 'राम पटवर्धन हे उत्कृष्ट संपादक आहेत. त्यांनी पत्र पाठवून माझ्याकडून पुन: पुन: निरनिराळ्या पद्धतीने कथा लिहून घेतली. त्यांच्या समाधानापर्यंत ! तू ते आनंदाने केलेही. पण सर्वच लेखकांना स्वत:चे लिखाण बदलून लिहिणे आवडत नाही. तू ते केवळ 'सत्यकथा' आहे म्हणून तडजोड केलीस की काही वेगळा अनुभव तुला मिळाला ?

आशा : अनुभवाचा जिथे गाभाच बदलत होता, तिथे आमचे वाद होत. पण पटवर्धनांनी दिलेल्या सूचनेचा किंवा कथेतील मजकूर बदलविण्याचा मी मनापासून विचारही केला. कथेचे पुर्नलेखन केले. उदा. 'रुक्मिणी' हीच कथा घेऊ. ही जेव्हा सत्यकथेत दिली तेव्हा लग्न झालेली रेणू मी आधी उभी केली होती. आणि नंतर फ्लॅशबॅक पद्धतीने ती कथा लिहिली होती. परंतु राम पटवर्धनांनी कळवलं की "अनुभवाचं एक समृद्ध मोहळ तुमच्या हाती गवसलं आहे तर तुम्ही

कथा हा प्रकार मोठ्या प्रतिभेची गोष्ट आहे असं मला वाटत नाही तर परिश्रमाची वाटते ! एखादा प्रतिभेचा अंश व त्यावर पुढची इमारत असंच वाटतं.

त्याला नीट आकार द्या." लग्न झालेली रेणू एकदम वाचकांसमोर उभी केली तर ती त्यांच्या-पर्यंत पोहचणारच नाही. तिला सुसंगतच क्रमवार लिहून मोठी करायला हव. 'आणि मग त्या कथेचे मी पुनर्लेखन केले. कथा हा प्रकार मोठ्या प्रतिभेची गोष्ट आहे असं मला वाटत नाही तर परिश्रमाची वाटते ! एखादा प्रतिभेचा अंश व त्यावर पुढची इमारत' असंच वाटतं. पुनर्लेखनात आधी विस्कळीत झालेली कथा किंवा मोहानी लिहिलेले अनावश्यक भाग आप-ल्याला स्वच्छ दिसतात. त्यामुळे कथा नितळ होते.

मी : 'अत्तर'मधल्या तुझ्या कथातील नायिका, उदा. 'बंदिशाळा'मधील मनू, 'निवडुंग'मधील गायत्री 'झोपाळचावर अभंग कातर'मधील पद्मा 'किंवा 'रुक्मिणी'मधली रेणू या ज्या नायिका आहेत त्या परंपरेच्या बंदीशाळेत कोंडून ठेवलेल्या, किंचितपणे थोडा उठाव करणाऱ्या पण कोंडलेल्याच अशा वाटतात, स्त्री मुक्तीच्या संदर्भात तुला याच नायिकांना पुढचा मार्गही दाखवता आला असता. पण तू ते करीत नाही. तर अविनाश सहस्रबुद्धेंनी ललित (सप्टेंबर ८९) मध्ये म्हटल्याप्रमाणे "परंपरागत प्रश्नाजवळ थांबतेस." मला वाटतं तुझी लेखणी त्यांच्या मुक्तीचे संयमित स्वातंत्र्य पेलू शकत असतानाही तू ते स्वीकारले नाही. तुलाही परंपरागत रूढीबंधनात रहाणारी स्त्रीच भावते कां ? की तुझ्या लेखनाच्या या बाबतीत काही कल्पनाच निराळ्या आहेत ?

आशा : या ज्या नायिका आहेत उदा. 'बंदिशाळे'तली अनू, आणि या तीन पिढ्यातल्या स्त्रिया यांचं सोसणं एकच कसं ? ही चीड त्यांच्यातून व्यक्त झाली आहे. माझ्या अनुभवाची मागणीही तीच होती. त्यामुळे तिथे मला स्त्रीमुक्ती अभिप्रेत नव्हती. त्या दृष्टीने मी कथेकडे पाहिलेही नाही. पण 'पूजा'मधली नायिका–तिचा विचार केला तर ती स्त्री मुक्तीकडे झुकलेली वाटते. तिचं वागणं, तिची आत्मनिर्भरता हे सारं तिकडे झुकलेलं असतानाही शेवटी त्या पूजा करणाऱ्या मुलाला एकटीच जाऊन ट्रीट करते, यात तिची आत्मनिर्भरता दिसते. पण कथेचा हा विषय नाही. फक्त स्त्रीच्या सोसण्याची चीड व्यक्त करणे हेच फक्त गृहीत धरलं होतं,

मी : खरं तर हा प्रश्न आधीच विचारायला हवा तो आता विचारते. कथा तुला सुचते म्हणजे तेव्हा तू टिपणं लिहून ठेवतेस की पात्र उतरवतेस, 'थीम' सुचते म्हणजे नेमकं काय होतं ? तुझी लेखनाची प्रक्रिया जाणून घेण्याची इच्छा आहे.

आशा : कथा सुचते तेव्हा नुसता एकटा अनुभव किंवा एकटी व्यक्ती असं नसतं. तर त्या बीजभूत अनुभवाला दुसरा प्रवाह मिळावा लागतो. 'पूजा' या कथेतला बाळकृष्ण हा पुजारी असतो. मला 'मानसिक पूजा हीच खरी पूजा' हे पूजेच्या कृतीपेक्षा मांडायचं होतं. पुजाऱ्याला आज जगात कुठला मान आहे ? कुणी विचारीत नसताना आमच घरं त्याला पोसतंय. म्हणजे हा अनुभव तसा एकेरी नाहीच. बाईचं, बाळकृष्णाचं व्यक्तिमत्व मिळून जे बनतं तो अनुभव. तूच 'मारव्या' वर लिहिताना म्हटलं होतंस की हे रसायन साधलं की तो अनुभव अनेकपदरी होतो ! तसंच लिहिताना माझं होत. एकाच अनुभवापोटी कथा लिहावी असे मला वाटत नाही तर त्यात अनेक अंगांनीच विचार व्हावा असं वाटतं म्हणून लेखनप्रक्रिया ही गोष्ट काही एकाच मापात तोलण्याची नसून अनेक गोष्टींचं ते मिश्रण असतं.

मी : तुझ्या कथातील नायिका या पारंपरिक आहेत हे खरं असलं तरी तू 'झुंबर' या कादंबरीत जी नायिका दाखवली आहेस, वसुमती – ती डॉ. अधिकारी – तिचे पती, आजारी असतानाही डॉ. राघवशी दुसरं लग्न करते असं दाखवलं आहेस. म्हणजे नवरा आजारी असताना तिच्यावर प्रेम करणाऱ्या डॉ. राघवशी ती लग्न करते. तुझ्या पारंपरिकतेला छेद देणारे आहे तेव्हा तुला असा शेवट कां करावासा वाटला ?

एकाच अनुभवापोटी कथा लिहावी असे मला वाटत नाही तर त्यात अनेक अंगानीच विचार व्हावा असं वाटतं म्हणून लेखनप्रक्रिया ही गोष्ट काही एकाच मापात तोलण्याची नसून अनेक गोष्टींचं ते मिश्रण असते.

आशा : 'झुंबर' मधें डॉ. अधिकारी हे डॉ. वसुमतीचे गुरू, पती सर्वच असतात. पण हा माणूस आपला प्रियकर होऊ शकत नाही. हे तिला जाणवतं. एक लखलखतं झुंबर माथ्यावर असतं तेव्हा त्या तेजोमयी प्रकाशात इतर काहीच दिसू नये तसं तिला वाटतं. म्हणून डॉ. अधिकारी आजारी असतानाही डॉ. राघवशी तिचं लग्न होणं म्हणजेच स्वतःला शरण जाऊन ती वास्तवाचा स्वीकार करते. स्वतःतलं सामान्यपण तिला कळून येतं. माझ्या मनात जे होतं ते नीट कादंबरीत उमटलं नसल्याने वाचताना प्रश्न पडत असेल असं वाटतं. इथेही मला परंपरेला दोष द्यायचा नव्हता. अनुभवाचे प्रश्न समोर नंतर उभे राहतात. थोडीशी गुंतागुंतच माझ्या कथा–कादंबरीत वावरत असते असं वाटतं.

मी : तुझ्या लिखाणासंबंधीच्या काही मूल्यनिष्ठा आहेत का ? आवडते कथालेखक–त्यांच्या कथांचा तुझ्यावर काही परिणाम झालाय का ? तू आज आघाडीची कथालेखिका आहेस. एक नव्हे तर पाच पुरस्कारांची धनी आहेस. तेव्हा या पुरस्कारांविषयी तुझे मत काय ?

आशा : माझ्या मूल्यनिष्ठा वगैरे नाहीत. लेखन हीच निष्ठा. पु. भा. भावे, शरच्चंद्र चिरमुले, भारत सासणे, विजया राजाध्यक्ष, श्री. ना. पेंडसे, गौरी देशपांडे, सानिया, रोहिणी कुळकर्णी, विद्याधर पुंडलिक, जातेगावकर, राजेंद्र बनहट्टी, सुनीती आफळे इत्यादींच्या कथा विशेष आवडतात. आणखीही बरेच लेखक सांगता येतील. पुरस्कार मिळाल्याने मुख्य म्हणजे आपण

व आपले पुस्तक वाचकांपर्यंत पोहचतं. हा आनंद असतोच पण मनासारखं लिहून होणं हा त्याहून मोठा आनंद असतो.

मी : व्यक्तिगत लेखकाचा विचार करता कथा व कादंबरी हे वाङ्मयप्रकार तसे एकमेकांना पूरकच आहेत. अलीकडे दीर्घकथेमुळे कादंबरी व कथा यात धूसर रेषा निर्माण झाली आहे. याबद्दल तुझे काय मत आहे ?

आशा : लघुत्तम कथेमधे एकच कुठला तरी संस्कार असतो. दीर्घकथेमधे जो एकच संस्कार अनुभवाच्या अंगाने होतो, तो अनेक पदरानी, अनेक स्तरानी जातो. जीवनही आता एकरेषी राहिलं नाही. त्यामुळे ती कथा आता दीर्घकथेच्या वाटेनी जाणार आहे. संस्काराचा एक ठसा अनेक अंगानी कादंबरीच्या विस्तृत कॅनव्हासवर असतो, माझ्या मते दीर्घकथा व कादंबरी यात बरेच अंतर असते. काळाचा एक पट्टा घेतला तर कादंबरी दोन्ही टोकाकडे जाते. तो पट्टा संपतच नाही. दीर्घकथेत अनेक अंगानी, अनेक पातळीवर संस्कार असतो. असा फरक मी माझ्या समजुतीप्रमाणे करते. अर्थात इतरांचे अनेक विचार असू शकतात. कथांमधे ' लघुकथा ' लिहिणे कठीण आहे, मला स्वतःला कथा हा प्रकार कधीच दुय्यम वाटला नाही. या तिन्ही प्रकारात ' लघुकथा ' सर्वात हृद्य वाटते. त्यात अनेक व्यवधानं पाळावी लागतात. कठीण पण उदात्त प्रकार वाटतो.

मी : अलीकडे तुझ्यावर, ' त्याच त्या मानसिक वर्तुळात, विश्वात, कथा फिरतेय ' अशा आक्षेपाची, कुणकुण आहे. मला वाटतं माझ्या आकलनानुसार, तुझ्या १९८८ च्या दिवाळी अंकातील कथांनी मात्र ही पातळी बदलली आहे. अज्ञात, श्रीवास्तवचे आत्मचरित्र, भूमिका, (लघू-कादंबरी) इत्यादी कथांमधून तुझी ही भूमिका एकदम बदलली आहे. पुरुषप्रधान म्हणण्या-इतपत संपूर्ण कथेत पुरुषाच्या मानसिकतेचे पीळ उलगडण्याचा एक सुरेल प्रयत्न तू केला आहे. तर तुला ह्या कथेच्या नवीन वळणावर जाणे कसे सुचले ? तू जाणीवपूर्वक मार्ग बदलला का ? की ही बीजं तुला खुणावीतच होती ? याबद्दल जरा सविस्तर सांग.

आशा : मुद्दाम अशी कथा बदलायची म्हणून मी हे लिहिलेलं नाही. तर ' अज्ञात 'मधले चार मुलींचे वडीलच समोर उभे राहिले. ' श्रीवास्तवचे आत्मचरित्र ' मधे तो लेखक आत्मचरित्र लिहावयाला येतो तेव्हा मित्राची बायको ' तुम्ही आत्मचरित्रच का लिहिता ?' हा मूलभूत प्रश्न विचारते. आणि मग त्या गरीब मुलाचं लेखनिक म्हणून येणं, जगणं, व आपल्या मनोऱ्यात बसून लिहिलेलं कोरीव लिखाण', काहीसं विसंगत वाटलं व त्यातूनच त्या लेखकाचा जन्म झाला. गर्भसंभव होताना मुलगा की मुलगी हे जसं माहीत नसतं तसच जो अनुभव मागणी करेल त्याच अनुभवाशी मी प्रामाणिकपणे लेखन करते. त्यामुळे मुद्दाम वळण बदललं नाही. आणि या सगळ्यातून ' माणूस ' बघण्याच्या संदर्भात तो अनुभव तर दूर जात नाही नं ही भीती वाटते. अनुभवाच्या अर्थाकडे माझं लक्ष जातं पण रूपाकडे, आकाराकडे जात नाही. त्यावरची पकड ढिली पडते. हे दोष जायला काळच जावा लागेल असं वाटतं.

मी : आशा, घरच्यांचे सहकार्य तुला आहेच. तरीपण लिहिण्यात काही अडथळे आले तर तुला नेमकं काय वाटतं ? स्त्री म्हणून मर्यादा पडतात कां ? स्त्री म्हणून काही अनुभवांना तू मुकली आहेस असं वाटतं का ?

आशा : जमिनीवर पाऊस पडतो तेव्हा तो सर्वदूर पडतो पण जमिनीचा काही भाग पुरेसा भिजत नाही. कुठे झाडाची फांदी तर इमारत आड येते. अनुभव घेतानाही हे अडथळे येतात. त्यामुळे बाहेर जरी गेले तरी अमृता प्रीतमच्या अनुभवासारखी मी काही मांडू शकणार नाही. माणसाबद्दल लिहिणं हे अनप्रेडिक्टेबल आहे. काही मर्यादा अपरिहार्यच आहेत त्या मी स्वीकारल्या आहेत. ■

जीएंचे बालसाहित्य : स्वतंत्र आणि अनुवादित

: वीणा मुळे

एक अलौकिक प्रतिभेचा, हृदयसंवाद करता येण्याजोगा कथाकार म्हणून जेव्हा आपण जीएंचा गौरव करतो तेव्हा प्रौढांचे प्रौढ कथाकार जीएच आपल्याला प्रामुख्याने अभिप्रेत असतात. आणि ते स्वाभाविकही आहे. कारण कथेच्या क्षेत्रात जीएंनी पहिले पाऊल टाकले ते मोठ्यांसाठी कथा लिहून आणि मग 'निळासावळा' या पहिल्या कथासंग्रहापासून ते 'पिंगळावेळ' पर्यंतच्या आठ संग्रहात जीए लिहीत राहिले ते मोठ्यांसाठीच. त्या कथाविश्वात अधूनमधून लहान मुलेही आलीत. उदाहरणार्थ, 'रात्र झाली गोकुळी 'मधला कृष्णा, 'वळी 'मधली 'अमाशी', 'मुखवटा 'मधली बेवारशी मुले आणि पांगळी मंगला, 'राक्षस 'मधली गुणी, 'स्लीला' मधली लीला वगैरे. परंतु ती जीएंच्या कथेतल्या इतर मोठ्या माणसांसारखी आपल्या लहान तुरुंगात बसून आपापली शिक्षा भोगणारी, भोवती लपून बसलेल्या क्रौर्याची शिकार झालेली अशी आहेत. प्रौढांच्या जीवनाचाच एक भाग असलेले, त्यांच्या इच्छांचा, रागालोभाचा विषय झालेले किंवा त्यांनीच घडवलेले हे बालजीव जीएंनी ताकदीने आणि उत्कटतेने रंगवले असले तरी त्यांचे स्वतःचे एक वेगळे जग असू शकते या शक्यतेची दखल जीएंनी आपल्या प्रौढ-कथांमध्ये घेतलेली नाही. ही उणीव जीएंनी आपल्या आयुष्याच्या आणि साहित्यसेवेच्या शेवटच्या दशकात भरून काढली. या काळात लहान मुले आणि त्यांचे भावविश्व हा जीएंच्या चिंतनाचा प्रमुख विषय असावा हे 'अमृतफळे' (१९८०); 'ओंजळधारा' (१९८१), 'लॉर्ड ऑफ द फ्लाईज' (१९८७) या अनुवादित आणि 'मुग्धाची रंगीत गोष्ट' (१९८६) आणि 'बखर बिम्मची' (१९८६) या स्वतंत्र पुस्तकांवरून लक्षात येईल.

'भूमिकां 'चे टोप घालण्याचे जीएंना मर्ढेकरांप्रमाणेच वावडे असल्यामुळे त्यांच्या इतर पुस्तकांप्रमाणेच या पुस्तकांनाही प्रस्तावना नाहीत. पण ही पुस्तके, 'अमृतफळे' आणि 'ओंजळ धारा 'च्या अर्पणपत्रिका आणि 'जीए : एक पोर्ट्रेट' या पुस्तकात सुभाष अवचट यांनी उद्धृत केलेले जीएंच्या पत्रांतील उतारे यावरून जीएंची मुलांकडे व बालवाङ्मयाकडे बघण्याची दृष्टी लक्षात यावी.

इथे 'बालवाङ्मम' या शब्दाने बालांसाठी लिहिलेले साहित्य या अर्थाबरोबरच बालांविषयीचे साहित्य हा अर्थही अभिप्रेत आहे.

जीएंच्या बालवाङ्मयविषयक चिंतनाला चालना मिळाली ती त्यांच्या मुग्धा आणि मनिषा या दोन भाच्यांमुळे. वास्तविक आपल्याला बालवाङ्मय लिहिण्याची 'गिफ्ट' तर सोडाच 'टॅलेंट' पण नाही याची जीएंना खात्री होती. सुभाष अवचटांना लिहिलेल्या पत्रांत आपले हे आत्मपरीक्षण जीएंनी नोंदवलेले आहे. पण भाच्यांचा गोष्ट ऐकण्याचा बालहट्ट पुरवण्यासाठी अशा गोष्टींचा शोध घेण्यावाचून जीएंना पर्यायच राहिला नसावा. रोज नवीन गोष्ट सांगण्याच्या जबाबदारीमुळे जीएंनी थोड्या वेळात कमी कष्टात नाविन्याची बकासुरी भूक भागवण्याचा मार्ग म्हणून भाषांतराचा मार्ग चोखाळला असावा. 'ॲपल्स ऑफ इम्मॉरटॅलिटी' या लिऑन सुर्मेलिअनच्या लोककथात्मक कथासंग्रहाचे भाषांतर जीएंनी केले असावे ते या कारणामुळे. 'अमृतफळे' या नावाने त्यातील काही कथा जीएंनी प्रकाशित केल्या आणि 'प्रिय मुग्धा, ही खेळणी तुझ्यासाठी' म्हणून मुग्धाबरोबरच आपल्या इतर बालवाचकांच्या स्वाधीन केल्या. अर्पणपत्रिकेवरून या कथांकडे निव्वळ खेळणी-करमणुकीचे एक साधन-म्हणूनच जीए बघत असावेत हे लक्षात येते.

याचे कारण कथेच्या प्रकृतीत आणि हाताळणीतच आहे. सर्व कथा कल्पित आणि चमत्कृतिपूर्ण आहेत त्यात राजे, राण्या, सुंदर राजकन्या, पराक्रमी राजपुत्र, मायावी राक्षस-चेटकिणी; अजस्र पक्षी. सात डोक्यांची भीषण जनावरे, खदखदून हसणारे मासे यांची गर्दी आहे. यातल्या प्राण्यांना बोलता येते; माणसांना रूपे पालटता येतात. इतकेच काय यांतल्या रुमाल, फण्या, काठ्या, पिशव्या यासारख्या क्षुल्लक वस्तूंमध्येही अद्भुत शक्ती आहे. सोन्यारुप्याला या कथांत वाण नाही. यातल्या भव्य महालांच्या विटा सोन्या-चांदीच्या आहेत. इथली भांडी, तवके, पिंजरे सोन्याचेच आहेत. इतकेच नव्हे तर इथली अमृतफळे सोनेरी आणि राजपुत्राचे केसही सोनेरीच आहेत. या सोनेरी वैभवाच्या आणि वैपुल्याच्या जगात कोळी, शिकारी, विणकर, शेतकरी यांना आणि त्यांच्या मुलांना प्रवेश मिळतो; पण तो केवळ चातुर्याच्या आणि सद्-गुणांच्या जोरावर. येथे सुष्टांचा जय होतो आणि दुष्टांचा पराभव होतो. यातले संघर्ष स्थूल आहेत आणि बहुदा कशाच्यातरी प्राप्तीसाठी किंवा शोधासाठी केलेले आहेत. शेवट बहुतेक सुखान्त आहेत. आणि कथा संपली की तीन फळे पडतात. एक फळ सांगणाऱ्यासाठी, एक ऐकणाऱ्यासाठी आणि तिसरे तिचा मान ठेवणाऱ्यासाठी.

सारांश, सर्वसामान्य बालसाहित्यात आढळणारे, मुलांना भुरळ घालणारे स्वप्नरंजनात्मक वातावरण आणि चमत्कार या कथांतही भरपूर आहे. जीएंनी म्हटल्याप्रमाणे मुलांचे मनोरंजन करणारी खेळणीच आहेत ती. परंतु यातलीच 'मासा हसला त्याची गोष्ट' ही चातुर्यकथा कथा असली तरी एक प्रौढ नीतिकथाही आहे. स्त्री-पुरुष संबंधातील, विशेषत: पतीपत्नी संबंधातील निष्ठा आणि त्यातून निर्माण झालेली व्यभिचाराची कल्पना या कथेत अनुस्यूत आहे.

कथेतील राजा एक सुरेख वेगळ्या रंगाचा मासा राणीला भेट म्हणून पाठवतो. राणी विचारते "हा मासा नर आहे की मादी? कदाचित तो नरही असेल. जनानखान्यात परपुरुषाला प्रवेश असतो का? आणि नर मासा खाण्याची कल्पना-देखील मला करवत नाही."

राणीचे हे बोलणे ऐकून मासा मोठ्याने हसतो. राजाला नवल वाटते. तेव्हा राणीचे पातिव्रत्यदर्शक बोलणे आणि माशाचे हसणे यामागचे कारण एक चतुर मुलगा उलगडून दाखवतो. राणीचा गौप्यस्फोट करताना राणीच्या चाळीस सख्यांचे भर दरबारात वस्त्रहरण करवून ते तरुण पुरुष असल्याचे सिद्ध करणे यात मुलाची चतुराई आणि राणीच्या ढोंगाचे दर्शन असले तरी सर्वसामान्यपणे मुलांना न आकळणारा एक नीति-विचार त्यात आहे.

कै. वा. गो. आपटे यांचा आदर्श डोळ्या-समोर ठेऊन खरे म्हणजे जीएंना ही वगळता आली असती. आपट्यांनी कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या अरेबियन नाईटस्‌मधील सुरस आणि चित्ताकर्षक कथाभाषांतरातून निवडक कथांचा संक्षेप करून १९११ साली 'चित्तरंजन' या नावाने दोन भागात प्रकाशित करताना आपल्या निवडीतून आपली भूमिका स्पष्ट केली होती. प्रस्तावनेत त्यांनी ती स्पष्ट नमूदही केली आहे. "त्यातल्या कित्येक गोष्टी स्त्रीजातीची निष्कारण नालस्ती करणाऱ्या आणि मुलांच्या ऐकण्यात, पाहण्यात येऊ नयेत अशा आहेत. अशा गोष्टी सोडून देऊन व ज्यात नैतिक किंवा व्यावहारिक बोध साठवला आहे, किंवा ज्या अंगचे धाडस, जिज्ञासा, सत्या-भिमान इत्यादी गुणांस विकसित करणाऱ्या आहेत, तेवढ्याच घेऊन अगदी सोप्या शब्दांनी मुलांच्या भाषेत व थोडक्यात चटकदार रीतीने सांगितल्या आहेत."

"मुलांना सांगताना लोककथांचा किंवा चमत्कृतिपूर्ण गोष्टींचा विचार कसा झाला पाहिजे हे या अवतरणातून व्यक्त झाले आहे. पण जीएंनी मुलांना इतके 'बाल' मानणेच नाकारले आहे. जगाची, जगरहाटीची, तेथील नीति-नियमांची त्यांनाही ओळख असली पाहिजे असा जणू त्यांचा दृष्टिकोन आहे. म्हणूनच ही कथा वगळण्याचे त्यांनी टाळले आहे. इतकेच नव्हे तर मृत्यू हा फक्त खलनिर्दालनाशीच संबंधित असल्याचे दाखवण्याचा बालवाङ्मयाचा आणखी

एक सर्वसामान्य संकेतही इथे धाग्यावर वसवलेला आहे. 'मरण नको असलेल्या मुलाची गोष्ट' हा त्याचा पुरावा.

हे खरे की प्रयत्नपूर्वक अमरत्व मिळवणाऱ्या या मुलाला आपल्याला मृत्यू येईल हे ठाऊक असूनही आपल्याजवळची अमृतफळे वाटताना दाखवून त्याचे औदार्यच मनावर ठसवण्याचा या कथेत प्रयत्न आहे; तरी देखील 'माणसे म्हातारी होतात, मरतात व मग मातीत पुरली जातात', 'जेथे जन्म आहे त्या ठिकाणी मरण असणारच; दोन्ही गोष्टी परमेश्वराच्याच हाती असतात' हे मृत्यूविषयक सत्य त्यात फार स्पष्टोक्तीने सांगितले गेले आहे. तरीही ही कथा जीएंना संग्रहात ठेवावीशी वाटली आहे; याचे कारण मुलांसाठी लिहिल्या जाणाऱ्या साहित्यामध्ये ज्या प्रकारचे कल्पित स्वप्नरंजन असते तेच जीएंना मान्य नाही. त्यांनी लिहिले आहे, "मुलांमध्ये fantacy असते पण ती Stevenson वगैरे इंग्रजी पुस्तके वाचून येत नाही. त्यांचे आयुष्य कुठेतरी fantacy व actuality (reality) यांच्या सीमेवर वाढत असते. आणि बालवाङ्मय म्हणजे कधी serious असता कामा नये हे मत तर मला विक्षिप्त वाटते."

विक्षिप्त वाटणाऱ्या मतांची पर्वा करणाऱ्यांपैकी जीए नव्हते. म्हणून त्यांनी वर उल्लेखलेल्या कथा संग्रहात राहू दिल्यात; एवढेच नव्हे तर आपल्या पुढच्या आधारित कथांच्या संग्रहात–'ओंजळधारा'त–अधिक गंभीर कथांचा समावेश केला. आता त्या 'खेळण्या'सारख्या राहिल्या नव्हत्या. हा संग्रह 'प्रिय मनीषा'ला अर्पण करताना जीएंनी लिहिले "नंतर कधी तरी एका मंतरलेल्या क्षणी कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे भव्य भाषांतर तुझ्या हाती पडावे ही माझी त्यांच्याविषयीची कृतज्ञता आणि तुझ्याविषयीची सदिच्छा."–किती बोलकी अर्पणपत्रिका आहे ही! अरेबियन नाइटस् जीवनाला सर्व बाजूंनी सामोरे जाणारे, जीवनाचे अनेकानेक पैलू दाखवणारे आणि जीवनाची समज समृद्ध करणारे आहे. ते कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी मराठीत संपूर्ण भाषांतरित केले आहे. अर्पण पत्रिकेत त्या 'भव्य भाषांतराची' तरफदारी करताना जीएंनी आपटयांनी निवडूनपाखडून तयार केलेल्या बालबोध बालसाहित्याबद्दलची नापसंतीच जणू व्यक्त केली आहे.

आपल्या भाचीने संपूर्ण अरेबियन नाइटस् वाचावे ही सदिच्छा जीए प्रगट करतात तेव्हा त्या वाचनातून जीवनाचे सर्वांगीण दर्शन तिला-पर्यायाने मुलांनाही–व्हावे ही त्यांची भावना आहे हे उघड आहे. ते वाचन करण्याचा 'मंतरलेला क्षण' अजून यायचा असेल; पण तो यावा ही जीएंची इच्छा होती. कदाचित त्या क्षणाची पूर्वतयारी करणाऱ्या कथा लिहाव्या असेही जीएंना वाटले असावे. म्हणूनच भाषांतराऐवजी कथाबीज तेवढे घेऊन त्यांनी या कथा स्वतंत्रपणे लिहिल्या असाव्यात.

'ओंजळधारा'तल्याही अनेक कथा 'अमृतफळे'शी नाते सांगणाऱ्या म्हणजे कल्पित आणि चमत्कृतिपूर्ण आहेत; तरीही त्या वाचताना जीएंच्या अगोदरच्या प्रौढ कथांची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. 'आरसा–पुराण' ही विनोदी कथा सोडली तर बहुतेक कथा प्रतिकात्मक आहेत. नियतीचे किंवा दैवाचे श्रेष्ठत्व दाखवणाऱ्या आहेत. जीएंचे जीवनविषयक भाष्य देखील यात मोकळेपणाने प्रगटले आहे.

उदाहरणार्थ, "तीन सोनेरी केस'मध्ये तरंगला निरोप देताना म्हातारी म्हणते, "योगायोगाने असे संबंध येतात व कधीतरी ते अटळपणे संपून जातात."

किंवा 'अखेरचे घर' मध्ये राजपुत्र आपल्या घोडयाला म्हणतो, "पण कधीतरी आयुष्यात अशी एक हाक ऐकू येते की त्या वेळी सारी बंधने तोडून तिकडे जावे लागते...ती हाक ऐकू आली की माणूस माणसापासून तुटतो, या जगातून परागंदा होतो, पण कुणास ठाऊक, त्याच क्षणी तो माणूस म्हणूनही जगत असेल. ती हाक मला ऐकू आली हे माझे नशीब होते. त्याचप्रमाणे ते माझे भाग्यही होते. पण ती हाक मी निवडली नव्हती. तिच्यावर माझी कसलीच सत्ता नव्हती. ती ऐकू आली तेव्हा पावले वळवून तिच्या दिशेने जाणे एवढेच मला शक्य होते."

किंवा, याच कथेत अंतःकरणाची हाक ऐकून अमरदेशाहून आपल्या आईवडिलांना भेटायला आलेल्या राजपुत्राची मृत्यूची घटना सांगून जीए लिहितात "राजपुत्राला शेवटच्या क्षणी काय वाटले असेल ? त्याने केले ते बरोबर की चूक होते ? आता परत अमरदेशी जाता येणार नाही, उरी बाळगलेले स्वप्न आता कायमचे नष्ट झाले, म्हणून त्याला दुःख झाले असेल. अगर मातीतून निर्माण झालेल्या शरीराला अखेर ओढ मातीचीच; जन्माला मृत्यूखेरीज, तारुण्याला वार्धक्याखेरीज पूर्ती नाही, हे ज्ञान त्याला झाल्याने मनःशांती मिळाली असेल.

"अगर निदान मातीत तरी आईबापांची पुन्हा भेट होईल म्हणून त्याला आनंदही वाटला असेल.

"माणसाच्या अगदी शेवटच्या, अत्यंत एकाकी पण पूर्णपणे केवळ स्वतःच्याच अशा क्षणी त्याला काय वाटते, हे त्या वेळी तो माणूस व परमेश्वर आणि तो माणूस संपल्यावर केवळ परमेश्वर यांनाच माहीत असते. त्यामुळे न्याय देण्याचा अधिकारही परमेश्वरालाच असतो."

वरील उताऱ्यांवरून जीएंनी आपल्या बालवाचकांना किती प्रौढ कल्पिले किंवा अपेक्षिले आहे याची कल्पना यावी. खरे म्हणजे 'ओंजळधारा' वाचत असताना जीएंना नक्की कोणत्या वयाच्या मुलांना गोष्ट सांगायची आहे हा प्रश्न सतत पडतो. एकेकदा तर असेही वाटते की प्रौढांचे मनोरंजन करण्यासाठी किंवा आपल्या प्रौढ रूपककथांचा एक वेगळा आविष्कार म्हणून तर जीएंनी या कथा लिहिल्या नसाव्यात ? बालवाङ्मयात दिसतो तसा मोठा टाईप, चित्रं हा केवळ एक चकवा तर नाही ? एक खरे की, 'ओंजळधारा'तल्या आधारित कथा त्यातील जीवनभाष्यामुळे बालवाचकांना समजायला अवघड आहेत.

जीएंनाही हे जाणवले असले पाहिजे. म्हणून थोडे अधिक हलकेफुलके लिहिण्याचा प्रयत्न त्यांनी केला. जीए लिहितात : "मुग्धा–मनिषांसाठी मी सात आठ fragments लिहिले, ते देखील गंमत म्हणून. काही वेळा काय होते–तर रंगाचा नुसता एक फटकारा आकर्षक वाटतो. त्याला आकार, अर्थ वगैरे काही नसते. तसले मी काहीतरी केवळ त्यांच्यासाठी लिहिले इतकेच."– जीएंनी केवळ गंमतीखातर मारलेल्या फटकाऱ्यातून साकार झालेल्या कलाकृती म्हणजे 'मुग्धाची रंगीत गोष्ट', आणि 'बखर बिम्मची'मधील कथा.

या कथा वाचत असताना एक गोष्ट चट्‌कन जाणवते. जीएंनी राजाराण्यांच्या कथेतील दूरस्थ अद्‌भुत यात कटाक्षाने दूर ठेवले आहे. जीए राजाराणी-राजपुत्र–राजकन्या यांना कंटाळले तर नसावे ? 'बखर बिम्म'ची मधील 'किल्ली' या कथेतील एक संवाद यादृष्टीने लक्षणीय आहे. संवाद सिंहासनासंबंधी आहे. आजोबा सांगतात. "मोठ मोठे राजे आणि सम्राट त्यावर बसतात. मागे सिंहाचे डोळे आहेत ना, त्यांच्यातून रात्री चांदणं पडतं, व त्याला चंदनाचा वास असतो. हा मुकूट घालून मोठे राजे सिंहासनावर बसतात."

"पण सिंहासनावर बसून ते करतात तरी काय ?" बिम्मने उत्सुकतेने विचारले.

"ते करतबिरत काही नाही. फार तर भुवया उंच करतात, इतरांना करडे हुकूम सोडतात. बरे, ते आरामात तरी असतात म्हणतोस की काय ? नाव नको. त्यांना दोन राण्या असतात. एक आवडती, एक नावडती. किंवा तीन मुलगे असतात. त्यात धाकटा तेवढा चांगला असतो. उरलेले दोघे दुष्ट असतात."– हे ऐकून बिम्मचा विरस होणं, सिंहासनाचा त्याला एकदम कंटाळा येणे स्वाभाविक आहे. बिम्मची प्रतिक्रिया ही अशा कथांच्या श्रोत्यांची–वाचकांचीच तर प्रतिक्रिया नव्हे ? जीएंनी ती लक्षात घेऊन आपल्या श्रोत्यांना आता अगदी जवळचे अद्‌भुत दाखवायचे ठरवले असावे. म्हणूनच 'अमृतफळे' आणि 'ओंजळधारा'मधील कथांपेक्षा 'मुग्धाची रंगीत गोष्ट' आणि 'बिम्मच्या कथा' फार वेगळ्या वाटतात.

'मुग्धाची रंगीत गोष्ट' ही मुग्धाची स्वप्नकहाणी आहे. कथेत मुग्धा एका पिवळ्या लांब पानाला धरून विमानासारखे उडत एका फुललेल्या रानात उतरते. तिथे वृक्षवेलींच्या, पशुपक्ष्यांच्या राज्यात तिला गमतीदार अनुभव येतात. राच-

आवळयाचे झाड तिला आवळ तोडता यावेत म्हणून ठेंगणे होते; कांकणे किणकिणल्यासारखे बोलणारी गुंजांची वेल तिला गुंजा देते; तिच्या-ठी काटयांना थोडा वेळ आत पाठवणारी करवंदीची जाळी करवंदांना रंगीत गोटया बनवते तर खरखरीत घोगऱ्या आवाजात बोलणारा कोहळा तिला ज्ञानाचे धडे देतो. इथल्या पशू-पक्ष्यांनाही त्यांच्या वैशिष्टयांमुळे व्यक्तिमत्व प्राप्त झाले आहे. ते अनेक आहेत. नमुनेदार आहेत. त्यात आपले सारे घर पाठीवर घेऊन सावकाश सरकणारी चिडखोर गोगलगाय आहे; काळया रंगामुळे लोक कावळा समजतात म्हणून रडवेला झालेला भारद्वाज आहे; एवढा मोठा सूर्य पण त्याचा माझ्यावर विश्वास आहे असे सांगणारा रंगीत सरदारासारखा ऐटबाज तुर्रेबाज कोंबडा आहे. आपल्या वाढदिवसाची साधी आठवणदेखील कुणी ठेवली नाही म्हणून रुसलेले हरीण आहे; चिमणीचे दात लागलेल्या पेरूला आम्ही स्पर्श-देखील करणार नाही असे ताठयाने म्हणणारा पोपट आहे; पिवळया मातीत अंग घुसळून आणि काळया मिशा रंगवून पोलीस होण्याचे स्वप्न पाहणारे बदक आहे; आपले अंधारे बिळ उजळ-ण्याचा मुलांचा हट्ट पुरवण्यासाठी रंगीत करवंदी गोटया मागणारे मुंगूस आहे; पंख हलवून टाळया वाजवणारी लबाड मतलबी कबुतरे आहेत; डोळयांखाली गुंजा मिळताच हरखलेले बुलबुल आहेत; मेणाचे घर करणाऱ्या किती चिमण्या गोष्टीत असतात असे विचारणाऱ्या चिमण्या आहेत; आणि आपल्याला डोळे किती हे वारंवार विसरणारा मोरही आहे.

मुग्धा यांपैकी प्रत्येकाला काहीतरी देते. कुणाला रंग, कुणाला गोटया, कुणाला गुंजा तर कुणाला दाणे. मोबदल्यात मुग्धाला मिळते समा-धान, आनंद आणि तिच्या घराची वाट. मुग्धा घरी पोहचते तेव्हा तिची आई तिला हलवून जागे करत असते. मुग्धा घरी आली असते ती पुन्हा येण्याची कबुली देऊन. पण तिला परत तिथे जाता येत नाही. ती का जात नाही याचे स्पष्टी-करण जीएंनी सुरेख चिंतनाने दिले आहे. ते मुळातूनच वाचण्यासारखे आहे. पण त्याचा सारांश असा : बालपण संपते; मोठेपणाच्या चिखलात पाय रुततात; स्वैर हिंडणारे मन बांधले जाते. मग मोठयांच्या छोटयांनाच फक्त तिथे जाता येतें; कारण स्वैर कल्पनाविलास त्यांनाच करणे शक्य असते. एकूण बालपण संपण्याची व्याकुळता, त्यापोटी उपजणारे तत्त्वज्ञान आणि त्यातून शोधलेले सांत्वन असे या चिंतनाचे स्वरूप आहे.

हे चिंतन सोडले तर जीएंनी बालमन रिझवण्याचा अत्यंत कसोशीने प्रयत्न केला आहे हे जाणवते. जीएंमधला चित्रकार, निसर्गनिरीक्षक, कवी, भाषा व साहित्य यांचा जाणकार, या सर्वांनी त्यांना उत्कृष्ट साथ दिली आहे; आणि बालसाहित्याचे भूषण ठरावे अशी एक कथा मुग्धाच्या रंगीत गोष्टीच्या रूपाने साकारली आहे.

जीएंची ही कथा स्वतंत्र आहे असे म्हटले जाते आणि एका अर्थी ते खरे असले तरी ही कथा लिहितांना जीएंसमोर लुई कॅरॉलच्या 'ॲलिस इन वंडरलँड' या सुप्रसिद्ध बालकादं-बरीचा आदर्श होता हे सहज लक्षात येते. मुग्धा-च्या गोष्टीचा आकृतिबंध आणि निवेदनशैली 'ॲलीस इन वंडरलँड'च्या आकृतिबंधाशी आणि निवेदनशैलीशी मिळतीजुळती आहे. ॲलीसच्या कथेप्रमाणेच मुग्धाची कथा ही स्वप्नकहाणी आहे. ॲलिस आपल्या मोठया बहिणीशेजारी बसलेली असते. बहिणीच्या पुस्तकात तिला वाचण्याजोगे काही दिसत नाही. चित्र आणि संवाद नसले तर पुस्तकाचा काय उपयोग हे तिचे मत. म्हणून उठून हारासाठी फुले गोळा करावी की काय असा विचार ती करत असतानाच तिचे डोळे जडावू लागतात; आणि मग एका सशापाठोपाठ ती स्वप्नराज्यात शिरते.

मुग्धा चित्र काढायला बसली असते; पण तिचे मन त्यात रमत नाही. ती खुर्चीवर मागे रेलते आणि तिचे डोळे हळूहळू जड होऊ लागतात. तेवढयात वाऱ्याच्या झुळकीबरोबर एक पिवळे लांब पान तरंगत येते आणि त्याच्या देठाला धरून मुग्धा खिडकीच्या गजातून अलगद बाहेर पडते. ॲलिस प्राण्यांच्या नवल नगरीत पोहचते. मुग्धा वृक्षवेलींच्या आणि पशूपक्ष्यांच्या प्रदेशात शिरते. त्यातला दोघींचा फेरफटका संपतो तो स्वप्न-

समाप्तीने. दोघींनाही कोणी तरी हलवून जागे करीत असते–ॲलिसला बहीण तर मुग्धाला आई. ॲलिस तिला आलेल्या एक अनुभवाने क्षुब्ध झालेली असताना जागी होते तर मुग्धा घरी परतल्याच्या आनंदात हसत. कथेच्या शेवटी ॲलिसच्या अनुभवासंबंधी तिच्या बहिणीचे चिंतन तर मुग्धाच्या कथेत–कथाकाराचे चिंतन–तप-शीलाचे असे काही फरक सोडले तर कथेचा आकृतिबंध एकच आहे हे लक्षात यावे. निवेदन तंत्रही जीएंनी लुई कॅरॉलचेच घेतले आहे. ॲलिसला आलेल्या अनुभवांचे त्रयस्थपणे वर्णन; त्या अनुभवांसंबंधी आणि साहचर्याने आठवणाऱ्या घटनावस्तूंबाबत ॲलीसचे स्वतःचे चिंतन, आणि त्या चिंतनावर किंवा ॲलीसच्या कृतीवर पुन्हा कथाकाराचे स्पष्टीकरण असे हे तंत्र आहे. जीएंनी ते कसे स्वीकारले आहे हे पुढील उदाहरणावरून लक्षात येईल :

"त्यावर करवंदीने एक निःश्वास सोडला व म्हटले. 'तू मला फार आवडलीस म्हणून केवळ तुझ्यासाठीच काही करवंदांना रंगीत गोट्या व्हायला सांगते मी बापडी. त्या काचेच्या गोट्या असतीलच, पण तुला तशी इच्छा झालीच, तर ती करवंदेदेखील होतील पुन्हा !' त्यावर लगेच तिची एक फांदी काचेच्या रंगीत गोट्यांनी भरून गेली आणि झगमग चमकू लागली. कोणत्या नि किती गोट्या खुडून घ्याव्यात हेच मुग्धाला समजेना. तिने सहाच गोट्या घेतल्या. (घटनेचे त्रयस्थपणे वर्णन) कारण तेवढ्यानेच तिचा एक खिसा भरून गेला (मुग्धाच्या कृतीमागच्या कारणाचे कथाकाराने केलेले स्पष्टीकरण) ' बघा तरी, आताच माझा फ्रॉक बाजाराच्या पिशवी-सारखा झाला आहे'; ती हसून म्हणाली. (त्रयस्थपणे वर्णन) तिला वाटले प्रत्येक फ्रॉकला शंभर खिसे असावेत, नव्हे खिसे घेऊनच त्याचा फ्रॉक करावा." (मुग्धाचे चिंतन)

या तंत्राचा एक फायदा असा की घडणारे सगळे ही पात्राच्या कल्पक मनाची निर्मिती आहे, तिच्या विशिष्ट स्वभाववैशिष्ट्यांमुळे हे सगळे घडले आहे, कल्पनेचा स्वैर विलास असला तरी कल्पनेचा धागा कुठेतरी वास्तवाशी घट्ट बांधला गेला आहे याची वाचकाला खात्री पटते. हा अनुभव सुखद असतो. प्रौढ वाचकाला तर लहान मुलांचे मनोव्यापार बघायला मिळाल्याचाही आनंद मिळतो. जीएंना यासाठीच या निवेदनतंत्र आकर्षण वाटले असावे. आपली कथा फक्त मुलांपुरतीच राहू नये, ती मोठ्यांनाही वाचावीशी वाटावी असेही जीएंना वाटले असावे.

ते लिहितात : "मुलांकरिता लिहिलेल्या पुस्त-कांची एक गंमत असते. ते खरोखरच श्रेष्ठ असेल तर मुलांपेक्षा इतरच त्याचे वाचन करतात. Alice in wonderland चे सौंदर्य समजतं ते नंतरच. म्हणूनच मला Mac Donald चे एक वाक्य अतिशय आवडते. (तो स्वतः Phantasies, Fairy stories लिहित असे) : Not for Children but for the Children of all ages."—जीएंची 'मुग्धाची रंगीत गोष्ट' बरीचशी या प्रकारात बसणारी आहे.

ही कथा प्रथम 'गुलमोहर'च्या दिवाळी १९८४ च्या अंकात प्रकाशित झाली. जीएंच्या या स्वतंत्र बालसाहित्यकृतीने अनेकांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला. जीए लिहितात : 'बरे का अवचट, तुम्ही मुग्धाची कथा प्रसिद्ध करून एक गंमत करून ठेवली आहे. त्याबाबत मला बरीचशी पत्रे आली आहेत. त्यात इतर कोणत्या भावना आहेत याबद्दल विविधता असली तरी कमालीचे आश्चर्य ही भावना मात्र समान आहे. गळयात कोठे रुद्राक्ष घालून एका दूरच्या देवळात मी धुनी टाकून बसलो आहे आणि गांजा घेतल्यामुळे डोळे लाल आहेत अशीच त्या सगळयांची कायम समजूत होती. काही अंशी ती खोटी नाही. तसला एक वैरागी खरोखरच माझ्या मनात कायम वस्ती करून आहे. पण हा लुच्चा माणूस हळूच एक चॉकलेट खाताना दिसल्याप्रमाणे या सगळयाच माणसांना आश्चर्य वाटले आहे. त्यामुळे सध्या मी सापडलो आहे त्यापेक्षा पकडला गेलो आहे; अशा अवस्थेत आहे."

पुढे दोन वर्षांनी पुस्तकरूपाने ही कथा प्रकाशित करताना जीएंनी ती वाढवली. पकडले गेलो तरी आब राहावा या दृष्टीने तर ही कथा त्यांनी वाढवली नाही ? कारण सुधारित आवृत्तीत

शेवटचा चिंतनाचा भागही मोठा झाला आहे. जीए म्हणतात, "खरे म्हणजे ती वाढवली नाही, मूळ स्वरूपात ठेवली आहे." जीएंच्या म्हणण्यावर आपण विश्वास ठेवायलाच हवा; परंतु त्याचबरोबर पुस्तकरूपाने प्रकाशित झालेल्या या विस्तारित कथेचा मनावर होणारा परिणाम नोंदवलाच पाहिजे : अगोदरच्या सबंध कथेचा परिणाम या चिंतनाने पुसला जातो. मन उदास, अंतर्मुख होते. – प्रौढ–कथासदृश अनुभव देणारे जीएंचे चिंतन स्वतंत्रपणे मौलिक आहे यात शंका नाही; पण जिथे ते येते तेथे ते जड, रसभंग करणारे वाटल्याशिवाय रहात नाही.

मुग्धाची गोष्ट वाचल्यावर येणारा अनुभवच 'बखर बिम्मची' वाचतानाही येतो. बिम्म हा जीएंचा मानसपुत्र. अजून शाळेत जाऊ व लागलेले हे पोर मोठे तल्लख आणि कल्पक आहे. त्याचे चळवळे मन सतत काहीतरी नवीन शोधत असते, नवीनाची कल्पना करत असते. कधी त्याला रूळ इंजिन व्हावेसे वाटते, कधी आंब्याचे झाड, तर कधी छत्री. कधी तो पतंगावर बसून उडतो तर कधी काल्पनिक राहूल हत्तीच्या पाठीवर बसून बाजाराची सैर करतो. कधी तो ढगांना सांगून पाऊस पाठवतो तर कधी प्राणीमात्रांच्या सावल्या काढून घेतो. कधी तो पत्र लिहितो तर कधी चित्र काढतो. कल्पनेने त्याने पक्षी, हत्ती सजीव केलेले असतात तसेच आजोबाही केलेले असतात. या काल्पनिक पक्ष्यावरोबर हत्तीवरोबर, आजोबांबरोबर त्याला बोलता येते; नवीन माहिती मिळवता येते. बिम्मला जीएंनी असे घडवले आहे. त्याच्या गोष्टीत त्याची आई, आणि मोठी बहीण बब्बीही पुन्हापुन्हा येतात. आईला बिम्मचे अतिशय कौतुक. बब्बीलाही बिम्मचे कौतुक वाटते पण त्याला चिडवण्यात, त्याच्या चुका काढण्यातही तिला मौज वाटते. बिम्मचा देखील या दोघींवर फार जीव. त्यांच्या सान्निध्यात बिम्मच्या कल्पकतेला नवीन धुमारे फुटतात.

बिम्मच्या बाललीला वाचताना जीएंच्या असामान्य कल्पकतेची पुन्हा नव्याने प्रचीती येते. मात्र जीए जी भाषा वापरतात ती बिम्मच्या वयाच्या लहान मुलांना सहज कळण्यासारखी नाही. उदाहरणार्थ पुढील एकदोन नमुने बघावे.

"त्याच क्षणी स्वरांच्या जरकाड्या झाल्याप्रमाणे तीन अत्यंत सुरेल व रेखीव असे शिट्टीचे आवाज ऐकू आले आणि सगळीकडे सोनेरी प्रकाश पसरला." ("नीनम" पृ. २७)

"दरवाजा बंद होताच एखाद्या निळ्या सरोवराचा बांध फुटल्याप्रमाणे आत स्वच्छ, रेशमी निळा प्रकाश पसरला, आणि पारिजातकाची शंभर झाडे एकदमच फुलल्याप्रमाणे नाजूक वास पसरला." ("किल्ली" पृ. ४०)

–प्रौढांना आल्हाद देणारी जीएंची भाषाशैली मुलांना कठीण वाटतेच; पण त्यांच्या कथांमधील गूढार्थ त्यांना समजत नाही आणि कथांचे शेवट त्यांना अगम्यच राहतात. उदाहरण म्हणून 'सावल्या' ही गोष्ट घेऊ या : बिम्मला बाहेरून भटकून परत येताना वाटेत सापडेल ती वस्तू उचलून आणायची सवय असते. असेच तो कुत्र्याचे एक पिल्लू उचलून आणतो. आईला त्या पिल्लाचा घरातला वावर नकोसा होतो म्हणून ती त्याला गिरणीजवळ सोडते आणि तिच्या देखतच नामू ते उचलून नेतो. आई बिम्मला सांगते मी त्याला आगगाडीत बसवून दिल्लीला पाठवले आहे. त्यानंतर बिम्म तिला सावल्यांच्या घड्या करताना दिसतो. त्या सावल्यात वासरू, टांग्याचा घोडा, तारेवरच्या चार चिमण्या यांच्याबरोबरच कुत्र्याच्या पिल्लाचीही सावली असते. कुत्रे उचलताना सावली उचलायची राहल्यामुळे ती तशीच मागे राहिलेली असते आणि बिम्मने ती उचलून आणली असते. मग थोड्या वेळाने सावल्यांचे धनी आपापल्या सावल्या मागून नेतात. बिम्मजवळ उरते ती फक्त पिल्लाची सावली. थोड्या वेळाने आई गिरणीत जाते तिथे नामू भेटतो. ती घरी परतते, तेव्हा तिचा चेहरा उतरलेला असतो. ती बब्बीला पिल्लाची सावली त्याची त्याला परत करून यायला सांगते आणि बिम्मला जवळ ओढून म्हणते, "हे बघ बिम्म, आता यापुढे, कध्धी कध्धी कुणाची सावली काढून आणायची नाही, कळलं ?" मग ती त्याला आवेगाने मिठी मारते, आणि तिचे डोळे ओले होतात,–ही कथा–सावलीचा अर्थ, संपते त्यावेळच्या आईच्या

वागण्याच्या अर्थासकट मुलांना कळेल असे म्हणणे म्हणजे मुलांच्या आकलनाबाबत अवास्तव कल्पना करणे आहे,

खुद्द जीए या कथांबाबत लिहितात : " बिम्म नावाच्या पोराविषयी मी सात आठ कथा लिहिल्या आहेत. कोणत्याही व अतिशय सदय निकषानेही त्यांना बालवाङ्मय म्हणता येणार नाही. (त्यातील काहींना फार तर बालिश म्हणता येईल.)"–जीएंनी आपल्या कथांसंबंधी केलेल्या या परखड समीक्षणाच्या विरोधी मत मांडण्याचे धाडस बहुदा कुठलाच समीक्षक करणार नाही.

एकूण, जीएंनी मुलांसाठी लिहिण्याचा प्रयत्न केला. काही प्रमाणांत तो साधला तरी बऱ्याच ठिकाणी फसला. मात्र लहान मुले, त्यांचे भावविश्व आणि बालवाङ्मय हा विषय त्यांच्या मनात घोळत राहिला असावा. हा विषय प्रभावीपणे वाचकांसमोर आणायला हवा असेही त्यांना वाटत राहिले असावे. बालवाङ्मयात Treasure hunt, adventures, pirates सोबत मारामारी, असल्या गोष्टी आल्याच पाहिजेत असे नाही, असे त्यांचे मत होते. ते आपल्या स्वतंत्र बालसाहित्यातून त्यांना समर्थपणे प्रगट करता आले नाही हे खरे; परंतु मुले प्रत्यक्षात कशी असतात याचे समर्थपणाने चित्रण करणारी पण मुलांसाठी नसलेली एक कादंबरी हाती आल्यावर भाषांतराद्वारे ती वाचकांपर्यंत पोहचवणे त्यांना शक्य होते; आणि ती पोहचलीही.

लेखकाच्या साहित्यावरून आपण त्याच्या विचारांचा, जीवनदृष्टीचा वेध घेतो; पण भाषांतर करताना, भाषांतरासाठी एखादी साहित्यकृती निवडताना भाषांतरकाराचीही काही भूमिका, दृष्टी असू शकते हे मानायला आपण तयार नसतो. भाषांतर हा पेशा असणाऱ्या भाषांतरकाराच्याबाबतीत एकवेळ धंदेवाईक, व्यापारी दृष्टीच प्रबळ असेल; पण जीएंसारखा सृजनशील प्रतिभा असणारा लेखक भाषांतर करायला का प्रवृत्त झाला हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

भाषांतरकाराचे, लेखकाच्या शोधात असलेले पात्र असे वर्णन केले जाते. तो पहिल्यांदा दुसऱ्यातला लेखक शोधतो आणि नंतर स्वतःतला. भाषांतरकार जेव्हा एखाद्या साहित्यकृतीचे भाषांतर करतो तेव्हा तो स्वतःलाच अभिव्यक्त करत असतो. ' लॉर्ड ऑफ द फ्लाइज 'मधून जीए असेच स्वतःला अभिव्यक्त करीत आहेत.

' लॉर्ड ऑफ द फ्लाइज ' ही विल्यम गोल्डिंगची गाजलेली, लेखकाला नोबेल पारितोषिक मिळवून देणारी कादंबरी. तीत बालंटाइनच्या 'दि कोरल आयलंड ' (१८५८) या कादंबरीचे व्यंग दाखवले आहे. बेटावर हरवलेली मुले कशी धैर्याने आणि समजुतदारपणे दिवस काढतात हे दाखवत असताना निळे स्वच्छ पाणी, सोनेरी वाळू, पिकलेली, रसरशीत, सहज हाताला येणारी फळे, निष्पाप गोड खेळ, नाटके, खोट्या खोट्या लढाया, गोड गोड गाणी आणि मग सगळं विसरून गळ्यात गळा घालून चांदण्यात गोड स्वप्न पहात घेतलेली गुलाबी झोप असे स्वप्नरंजन 'कोरल आयलंड 'मध्ये केले आहे. पण हे वास्तव नव्हे. वास्तवाचे दर्शन घडते ' लॉर्ड ऑफ दी फ्लाइज ' मध्ये.

एका विमान–अपघातात काही शाळकरी मुले एका निर्जन प्रवाळद्वीपावर येऊन पोहचतात. दोन दिवस सगळी एकमेकांशी जुळवून घेऊन समजुतदारपणाने राहतात. पण हळूहळू सत्ताकांक्षा, प्राणभय, त्यापोटी उपजलेले क्रौर्य या प्रवृत्ती त्यांचा ताबा घेतात. त्यांच्यात गट निर्माण होतात. एकमेकांवर कुरघोडी करण्याचा ते प्रयत्न करतात. एरवी भोळीभाबडी, निष्पाप वाटणारी मुले आपापल्या गटात राहून दुसऱ्या गटाविरुद्ध कट करतात, कारस्थाने रचतात, हिंसक बनतात. एकही प्रौढ माणूस नसलेल्या त्या बेटावर ती मोठ्यांनाही लाजवील इतक्या पद्धतशीरपणे सत्तेचे आणि गटबाजीचे राजकारण खेळतात. हे त्यांना कोणी शिकवले ? माणूसपण विसरून ही मुले हिंस्र पशूंसारखी कशी बनलीत ?

कादंबरीकाराने याचे उत्तर दिले आहे. 'लॉर्ड ऑफ द फ्लाईज "चा वाच्यार्थ माश्यांचा स्वामी. बायबलमध्ये देवाचा शत्रू बीलझीबब याचा माश्यांचा स्वामी म्हणून उल्लेख करण्यात आला आहे. बीलझीबब देवाचा शत्रू–या कादंबरीत एका

लहान मुलाला एका डुकराच्या मुंडक्यात दिसतो. हे मुंडके शिकारी मुलांच्या गटाने जंगलीला खुश करण्यासाठी अर्पण केलेले असते. माश्यांचा स्वामी त्या मुलाला म्हणतो, "जंगली म्हणजे शिकार करून ठार मारता येईल असं एक जनावर आहे असं मानणंच किती वेडगळपणाचं आहे. मी म्हणजे खरोखर तूच स्वत: आहे. मी तुझाच एक भाग आहे. आणि तो देखील कसा? तर वरून लादलेला नव्हे तर तुझ्या रक्तामांसाबरोबरच वाढलेला असा भाग आहे. घडावसं वाटतं ते घडत नाही ते माझ्यामुळेच. मी आहे म्हणून तर कुणाचं काहीच चालत नाही." बीलझीबबच्या बोलण्याचे पुरेपूर प्रत्यंतर संबंध कादंबरीभर येते. मुले असे का वागली याचे उत्तर मिळते.

लहान मुलांच्या निरागसतेची चित्र बालसाहित्यात रेखाटलेली आपण नेहमीच बघतो. पण सत्ताकांक्षा आणि क्रौर्य या बाबतीत ती मुळीच कमी नसतात हे या कादंबरीत लेखकाने फार प्रभावीपणे दाखवले आहे. ही कादंबरी लहान मुलांविषयी आहे; पण लहान मुलांसाठी नाही. लेखकाने आपल्या कादंबरीच्या अर्पणपत्रिकेच्या जागी 'For my Mother and Father' असे म्हणून त्या कादंबरीचे वाचक कोण असावेत हे सुचवले आहे. जीएंनी देखील आपल्या भाषांतरित पुस्तकात ते शब्द अगदी जसेच्या तसे कायम ठेवले आहेत. मुलांच्या आईवडिलांनी मोठ्यांनी— मुलांना समजून घ्यायला हवे, त्यांचे वास्तव रूप जाणून घ्यायला हवे, अशी कादंबरीकाराप्रमाणेच भाषांतरकाराचीही इच्छा आहे. कारण लहान मुलांना समजून घेताघेताच आपण स्वत:लाही समजून घेणार आहोत. बाल श्रीकृष्णाने आपल्या बालपणात विश्वदर्शन घडवले होते तसे या कादंबरीत रेखाटलेल्या बालविश्वात आपल्याला विश्वरूपाचे दर्शन होते. जीएंना आपल्या वाचकांना ते घडवायचे होते.

आतापर्यंत आपण जीएंच्या स्वतंत्र आणि अनुवादित बालवाङ्मयाचा—बालांसाठी व बालविषयक वाङ्मयाचा विचार केला. तो केल्यानंतर दोन गोष्टी लक्षात येतात. एक, जीएंचे बालवाङ्मय हे बालांसाठी प्रौढवाङ्मय आहे आणि प्रौढांसाठी ते बालवाङ्मय म्हणजे बालविषयक वाङ्मय आहे. दुसरी, बालवाङ्मय जीएंचा वेगळया प्रकारचा आविष्कार असला तरी साहित्यातून जीवनाचा शोध घेण्याच्या त्यांच्या अखंड प्रयत्नांचाच तो एक भाग आहे. ■

१०२, गजानन सहनिवास
टिकेकर रस्ता, धनतोली,
नागपूर १२

युगवाणी
॥ लेखक मेळावा ॥

युगवाणी हे निव्वळ विदर्भ साहित्य संघाचे नियतकालिक मुखपत्र असण्यापुरते मर्यादित नसून लेखक, कवि, चित्रकार, पत्रकार, संशोधक, अभ्यासक, अध्यापक, विद्यार्थी, प्रकाशक, वाचक जे जे म्हणून मराठी भाषा, साहित्य, कला व संस्कृतीशी आस्थेने संबंधित आहेत अशा साऱ्यांचेच ते एक व्यासपीठ झालेले आहे. गेली पंचेचाळीस वर्षे अव्याहतपणे एवढ्या मोठ्या संख्येने प्रकाशित होणारे युगवाणी हे मराठीतील आपल्या स्वरूपाचे एकमेव नियतकालिक असल्याने ते केवळ विदर्भाचेच नव्हे तर समग्र मराठीतच एक आधुनिक सांस्कृतिक वैशिष्ट्य झालेले आहे.

जाहिरातदारांना देखील युगवाणीचा निश्त अंक हे त्यांचेकरिता जाहिरातींचे एक महत्त्वाचे माध्यम वाटत असून समाजातील ज्या महत्त्वाच्या व्यक्ती व वर्गापर्यंत युगवाणीद्वारे पोहचता येणे शक्य आहे त्याला युगवाणीसारखा इतर पर्याय नसल्याचे देखील पटवून देण्यात नव्या कार्यकारिणीतील मंडळी यशस्वी होत असल्याचे गेल्या अंकातील जाहिरातींच्या संख्येवरून लक्षात यावे. विदर्भभर पसरलेल्या विदर्भ साहित्य संघाच्या शाखांचे सभासद हे युगवाणीचे वाचक तर आहेतच शिवाय युगवाणीला या वाचनमूल्याव्यतिरिक्त असलेले सांस्कृतिक, शैक्षणिक, संशोधन व अध्ययन-अध्यापन संबंधिचे तसेच दीर्घकालीन असलेले संदर्भमूल्य हे युगवाणीचे खास वैशिष्ट्य. वाङ्मयातील ज्या ज्या साऱ्याच प्रवाहातून वाङ्मय वहाते आहे, त्या साऱ्याच प्रवाह-उपप्रवाहांमधले वाङ्मय तेवढे हाती लागावे यासाठी धडपडणाऱ्यांकरिता युगवाणी हा आधार आहे.

मात्र युगवाणीची ही सारी वैशिष्ट्ये आकाराला आणण्यात खरा महत्त्वाचा वाटा आहे तो युगवाणीतून लेखन करणाऱ्या मराठीतील थोर संशोधक, लेखक, अभ्यासक, प्रज्ञावंत, प्रतिभावंत नामवंत, प्रसिद्ध, परिचित, अपरिचित व नव, नवोदित अशा साऱ्याच वाङ्मयीन प्रवाह-उपप्रवाह असलेल्या वा त्या पलीकडे राहू इच्छिणाऱ्या लेखकांचा, अनुवादकांचा व संपादकांचा व संपादकीय तसेच प्रबंधकीय सहकार्य करणाऱ्यांचा. युगवाणी नियतपणे साकार करणाऱ्या या सहभाग असलेल्यांचा एक मेळावा लवकरच आयोजित करण्याचा युगवाणीचा मानस आहे

युगवाणीच्या अस्तित्वाच्या इतिहासातील हे एक अभूतपूर्व व अशा प्रकारचे पहिलेच आयोजन असेल. मात्र हा मेळावा म्हणजे केवळ साहित्य संमेलन असू नये, असणार नाही. युगवाणी व युगवाणीचा लेखक, सहकारी व संबंधित परिवार यांच्या परस्पर जिव्हाळ्याचे प्रश्न, तसेच एकमेकांच्या स्वतंत्र अग्रक्रमांचे प्रश्न, मराठी लेखन, लेखक, प्रकाशन, वितरणव्यवहार, युगवाणीसारख्या नियतकालिकांच्या संबंधातील व त्यांच्या लेखकांच्या व लेखनाच्या संबंधातील बदलल्या संस्कृतीच्या पार्श्वभूमीवरील नवी आव्हाने, सर्व संबंधितांच्या ती पेलण्याबाबतच्या सूचना व सल्ला, मार्गदर्शन व उपाययोजना यांचा समावेश असलेला हा मेळावा असेल.

या मेळाव्यात वर उल्लेखिलेल्या सर्व संबंधितांचा सहभाग अपेक्षितच आहे. मात्र युगवाणी या करता आवश्यक आर्थिक बाजूची जुळवाजुळव कशी करता येईल याही विचाराने ग्रस्त आहेच. या मेळाव्याच्या आयोजनाचा कोणताही आराखडा निश्चित करण्यापूर्वी या मेळाव्याच्या आयोजनपूर्व अवस्थेपासूनच सर्व संबंधितांचा सहभाग युगवाणीस प्राप्त व्हावा व असा सहभाग प्रदान करणाऱ्यांचा वतीने आयोजित होणारा मेळावा असे त्याचे स्वरूप असावे असाही एक विचार आहे.

त्या दृष्टीने अशा मेळाव्याच्या आयोजन, नियोजन, व्यवस्थापन, कार्यक्रम विषयांची संभाव्यता, आराखडा व त्याची जुळवाजुळव करण्याच उपाय व साधने, त्याकरिता अपेक्षित आर्थिक व अन्य सेवाभावी वृत्तीचे आयोजन सहकार्य या संबंधातील सूचना, अपेक्षा, सल्ला, मार्गदर्शन, सहकार्य व देऊ इच्छित असलेल्या सहभागाचे स्वरूप या बाबत सर्व संबंधितांनी तसेच संबंधित होऊ इच्छिणाऱ्यांनी देखील कळवावे अशी युगवाणीची आपणास, संबंधित म्हणून विनंती आहे.

उचित प्रतिसाद देण्यास आपणास आनंदच होईल अशी खात्री वाटते कृपया कळवावे !

संपर्क : संपादक
युगवाणी / विदर्भ साहित्य संघ
झाशी राणी चौक
नागपूर–440 012

'ज्ञानेश्वरी', 'ज्ञानदेवी', अथवा 'भावार्थ-दीपिका' अशा विविध नावांनी ओळखली जाणारी मराठी भाषेतील गीताटीका खिस्ती शकाच्या तेराव्या शतकात श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी लिहिली, याबद्दल आता कोणालाही संदेह राहिलेला नाही. ही गीताटीका काही अंशी स्वतंत्र असली तरी, तिच्यावर ज्ञानेश्वरांच्या पूर्वकालीन ग्रंथकारांचा प्रभाव पडणे अपरिहार्य होते. व खुद्द ज्ञानेश्वरांनीही आपल्या टीकेत आपल्या पूर्वसूरींचे हे ऋण मान्य केले आहे. याबद्दलची त्यांची पुढे दिलेली ओवी प्रसिद्धच आहे :

" तैसा व्यासाचा मागोवा घेतु ।
भाष्यकारांते वाट पुसतु ।
अयोग्यही मी न पवतु ।
कें जाईन ॥" ज्ञानेश्वरी अ. १८–१७२२

ज्ञानेश्वर जेव्हा 'भाष्यकारांते वाट पुसतु' असे म्हणतात; तेव्हा त्यांच्यासमोर भाष्यकार म्हणून एकच व्यक्ती होती की अनेक भाष्यकारांचे मार्गदर्शन त्यांनी घेतले, हा एक वादग्रस्त प्रश्न आहे. 'भाष्यकारांते' हे एकवचन की अनेकवचन यावद्दल मतैक्य नाही. त्याचप्रमाणे ते अनेकवचनी रूप मानले तर, ते आदरार्थी अनेकवचन मानावे की नाही, हा वाद आहेच. शिवाय ते आदरार्थी अनेकवचन मानले नाही, तर ज्ञानेश्वरांना 'भाष्यकार' शब्दाने कोणकोणत्या व्यक्ती विवक्षित होत्या, हा प्रश्न उरतोच. अशा रीतीने ज्ञानेश्वरांसमोरील भाष्यकार म्हणजे कोण, हा जटिल प्रश्न होऊन राहिला आहे.

'भाष्यकार' म्हणजे नेमके कोण याचा स्पष्ट निर्देश ज्ञानेश्वरांनी कोठेही केलेला नाही. त्यामुळे आपणाला इतर पुराव्यांवरच भिस्त ठेवणे भाग पडते. यापैकी पहिला पुरावा पुढे येतो तो ज्ञानेश्वरांचे आद्य चरित्रकार जे नामदेव महाराज; त्यांनी रचलेल्या 'आदी'च्या अभंगांचा. संत नामदेवमहाराजांनी आपल्या आदीच्या अभंगांत ज्ञानेश्वरादी भावंडे पैठणक्षेत्री असताना अध्यात्मग्रंथांचा अभ्यास करून वेदांतावर व्याख्यान करीत असत, असा उल्लेख केलेला आहे. या अध्यात्मग्रंथांत 'गीतासंबोधिनी' नावाचा ग्रंथ त्यांच्याजवळ होता, असेही नामदेव महाराज म्हणतात. पाहा :

" अध्यात्मग्रंथ पाहती पैठणी ।
गीतासंबोधिनी जवळी असे ॥
भोगावती स्नान कालिका दरुषण ।
वेदांत व्याख्यान परिमिती ॥
धन्य हा सोपान धन्य ज्ञानदेव ।
धन्य निवृत्तिराय ब्रह्मरूप ॥
सांगती पुराण रात्रीं हरिकीर्तन ।
पैठणींचे जन वेधियेले ॥"

— नामदेवगाथा–महाराष्ट्र शासकीय मत १९७०
८९७.८ ते ११. पृ. ३३३–३३४.

येथे नामदेवांनी निर्देशिलेली 'गीतासंबोधिनी' ही भगवद्गीतेवरील एखादी प्राचीन टीका असली पाहिजे हे स्पष्टच आहे; पण आज मात्र 'गीतासंबोधिनी' नावाची एखादी गीता वा गीतेवरील व्याख्यानग्रंथ उपलब्ध नाही. आज गीतेवर 'सुबोधिनी' नावाची टीका उपलब्ध आहे; पण ही 'सुबोधिनी टीका' म्हणजे नामदेवांनी उल्लेखिलेली 'गीतासंबोधिनी' नव्हे, कारण या 'सुबोधिनीटीके'चा लेखक श्रीधर हा ज्ञानेश्वरानंतरचा म्हणजे खिस्ती शकाच्या चौदाव्या शतकातील आहे. त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरांनी स्वतः गीतेवर लिहिलेल्या टीकेलाही 'गीतासंबोधिनी' हे नाव असणे शक्य नाही; कारण एकतर ज्ञानेश्वरांनी वा अन्य कोणीही या टीकेला 'संबोधिनी' असे म्हटलेले नाही. आणि शिवाय खुद्द नामदेवसुद्धा त्या टीकेला 'संबोधिनी' न म्हणा 'ज्ञानदेवी' वा 'ज्ञानेश्वरी' या नावानी ओळखतात. पाहा :

" गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरीं ।
ब्रह्मानंदलहरी प्रगट केली ॥"

— नामदेव गाथा–९–२–२.

" नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी ।
एक तरी ओंवी अनुभवावी ॥"

— नामदेवगाथा – ९–२–६.

'गीतासंबोधिनी'चे निश्चित स्वरूप आज आपणासमोर आले असते तर कदाचित ज्ञानेश्वरांना भाष्यकार या शब्दाने कोण अभिप्रेत होते, हे

श्रीज्ञानेश्वरांसमोरील भाष्यकार

: रा. पां. निपाणीकर

ठरविता आले असते; पण ते आज तसे यंत्र नसल्यामुळे आज आपणास केवळ तर्कावरच भिस्त ठेवून राहावे लागत आहे.

अशा रीतीने ज्ञानेश्वरांसमोरील भाष्यकार म्हणजे नेमके कोण, हा एक वादग्रस्त प्रश्न बनून राहिलेला आहे. डॉ. शं. दा. पेंडसे व इतर बरेच विद्वान ज्ञानेश्वरांपुढील भाष्यकार म्हणजे शंकराचार्यच याबद्दल निःशंक आहेत; तर पं. पांडुरंग शर्मा यांच्या मते ज्ञानेश्वरांसमोर गीतेवरील शांकरभाष्याबरोबरच रामानुजभाष्यही होते व म्हणून भाष्यकार म्हणजे केवळ शंकराचार्यच नव्हेत, तर रामानुजाचार्यही त्यात येतात. पं. खुपेरकरशास्त्री यांच्या मते ज्ञानेश्वर हे नाथ संप्रदायी अर्थात काश्मीरी शैवमताचे अनुयायी असल्याने गीतेचा अर्थ करीत असता त्यांनी आपल्या संप्रदायाच्याच ग्रंथांचे आणि ग्रंथकारांचेच अनुसरण केले असले पाहिजे. त्यांच्या मते शैवसंप्रदायाचा मूळ ग्रंथ असणाऱ्या 'शिवसूत्रां'चे प्रथम दर्शन ज्याला घडले, त्या वसुगुप्ताचार्यांनी गीतेवर 'वासनी' नावाची एक टीका लिहिली होती पण ती आज उपलब्ध नसली तरी ज्ञानेश्वरांना ती उपलब्ध असावी व तीच ज्ञानेश्वरांसमोर असली पाहिजे. एकूण पं. खुपेरकरशास्त्रींच्या मते ज्ञानेश्वरांसमोरील भाष्यकार म्हणजे हे वसुगुप्ताचार्यच होत.

महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या 'श्रीज्ञानेश्वर नवदर्शन' नामक ग्रंथात श्री. वि. मो. केळकर यांनी 'ज्ञानेश्वर व शंकराचार्य' या शीर्षकाचा एक लेख लिहून ज्ञानेश्वरांपुढील भाष्यकार म्हणजे शंकराचार्यच या मताला पुष्टी दिली आहे. त्यांनी आपल्या या लेखात गीतेवरील अनेक भाष्यकारांचा व आचार्यांचा नामनिर्देश केला आहे व त्या सर्वांचा कालही दिला आहे. व शेवटी शंकराचार्यांखेरीज इतर भाष्यकारांचा निरास केला आहे. या विषयावरील आतापर्यंतच्या सर्व चर्चेमध्ये एक गोष्ट स्पष्ट झाली आहे व ती म्हणजे द्वैतवेदांतप्रवर्तक मध्वाचार्यांचा प्रभाव ज्ञानेश्वरांवर पडणे शक्य नाही. वास्तविक कालदृष्टया विचार केला तर मध्वाचार्य हे ज्ञानेश्वरांचे पूर्ववर्ती आचार्य नसले तरी उत्तरकालीनही नाहीत. ते दोघेही समकालीन होते. ज्ञानेश्वरांचा काल इ. स. १२७१ ते १२२३ तर मध्वाचार्यांचा काल इ. स. १२३८ ते १३१७ असा आहे. त्या दृष्टीने मध्वाचार्य हे ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठ समकालीन ठरतात. पण तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने मध्वाचार्य व ज्ञानेश्वर या दोघांत जमीन अस्मानाचे जे अंतर आहे, त्यामुळेच ज्ञानेश्वरांपुढील भाष्यकारांत मध्वाचार्यांचाही समावेश होत असेल किंवा होऊ शकेल, अशी शंकासुद्धा कोणाला आलेली दिसत नाही. मध्वाचार्य हे द्वैतवादी तर ज्ञानेश्वर हे अद्वैतवादी. त्यामुळे अद्वैतवादी ज्ञानेश्वर भगवद्गीतेच्या आपल्या विवेचनात द्वैतवादी मध्वचार्यांचा आधार घेणे शक्य नाही, किंवा मध्वाचार्यांचा प्रभाव ज्ञानेश्वरांवर पडणे शक्य नाही, असे कोणाला वाटले, तर त्यात आश्चर्य नाही.

ज्ञानेश्वर व मध्वाचार्य हे केवळ समकालीनच नव्हते तर प्रादेशिक दृष्टयाही निकटचे होते. ज्ञानेश्वर महाराष्ट्रात झाले, तर मध्वाचार्य महाराष्ट्राला लागूनच असलेल्या कर्नाटकात झाले. ज्ञानेश्वरांचा संचार प्रामुख्याने गोदातीरावर झाला हे त्यांच्या चरित्रावरून दिसून येते. ज्ञानेश्वरचरित्रात येणारी त्र्यंबकेश्वर, पैठण इत्यादी ठिकाणे तर गोदावरीच्या तीरावर आहेतच; पण ज्ञानेश्वरी लेखनाचे ठिकाण जे नेवासे, ते वास्तविक प्रवरा नदीच्या काठी असूनसुद्धा ज्ञानेश्वरांनी मात्र प्रवरा नदीचा उल्लेख न करता गोदावरीच्या 'दक्षिण तीरावर' ('ऐसे युगी वरि कळी।

आणि महाराष्ट्र मंडळी । श्रीगोदावरीच्या कुळीं । दक्षिणिली ॥' ज्ञानेश्वरी अ. १८. ओवी १७८१) असा उल्लेख केला आहे. मध्वाचार्यांचे कार्यसुद्धा जरी प्रामुख्याने कर्नाटकात झालेले असले, तरी त्यांनीही गोदातीरावर संचार केल्याचा उल्लेख त्यांच्या चरित्रात मिळतो. मध्वाचार्यांनंतर त्यांच्या पीठावर आलेले त्यांचे शिष्य पद्मनाभतीर्थ हे गोदातीरवासी असल्याचा उल्लेख मध्वविजयात मिळतो. (पाहा : 'आकृष्टोऽस्य गुणैर्व्याप्तोर्यो गोदाया उपाययौ । स पद्मनाभतीर्थाख्यः शिष्योऽन्योऽभूत् सुचेतसः ॥'– मध्वविजय १५ १२०) त्याचप्रमाणे बदरिकाश्रमाकडे जात असता त्यांना महाराष्ट्रातूनच जावे लागले होते आणि यावेळी यादवकुलातील ईश्वरदेव नावाच्या राजाची व त्यांची भेट झाल्याचाही उल्लेख मिळतो. (पाहा : 'क्वचिदीश्वरदेवमेष भूपं खननं पान्थजनैर्विधापयन्तम् । स्वमपि प्रतिचोदयन्तमूचे क्रियया नोऽकुशलान् प्रबोधयेति ॥'– मध्वविजय १०.४) हा राजा ईश्वरदेव म्हणजे यादवकुलातील राजा महादेव होय, कारण ईश्वर आणि महादेव हे समानार्थक शब्द आहेत. या यादव राजाची कारकीर्द इ. स. १२६० ते इ. स. १२७१ पर्यंत होती. या सर्व गोष्टींचा विचार केल्यास मध्वाचार्यांसारख्या एका स्वतंत्र मतप्रवर्तक आचार्यांचे नाव व ग्रंथ त्यांचे कनिष्ठ समकालीन असणाऱ्या ज्ञानेश्वरापर्यंत पोचलेच नव्हते असे म्हणणे धाडसाचे ठरेल.

मध्वाचार्यांचे द्वैतमत ज्ञानेश्वरांना माहीत होते. याचा स्पष्ट पुरावाही खुद्द ज्ञानेश्वरीतच मिळतो. ज्ञानेश्वरीच्या प्रारंभीच्या गणेशवर्णनात पुढे दिलेली ओवी येते :

'प्रमेयप्रवाल सुप्रभ । द्वैताद्वैत तेचि कुंभ । सरिसे एकवटत इभ– । मस्तकावरी ॥' १.१७. या ओवीतील द्वैत हे मध्वाचार्यांचेच द्वैतमत असले पाहिजे, हे उघड आहे, कारण एक तर अद्वैताबरोबर द्वैताचा उल्लेख म्हणजे तो द्वैत-वेदांताचाच मानला पाहिजे. शिवाय 'तर्कु' (वैशेषिक), 'नीतिभेदु' (न्याय), 'सत्कारवादु' (सांख्य), 'धर्मप्रतिष्ठा' (पूर्वमीमांसा) या-सारखी इतर दर्शनेही द्वैती असली तरी, ती वेदांत-दर्शनात समाविष्ट होत नाहीत. वेदांतदर्शनातील द्वैतवादी दर्शन एकट्या मध्वाचार्यांचेच आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरांना मध्वाचार्य; त्यांचा द्वैतवेदांत व त्यांची गीतेवरील व्याख्याने माहीत असणे संभवनीयच नव्हे तर निश्चित मानले पाहिजे.

आता प्रश्न एवढाच की, ज्ञानेश्वर अद्वैती, तर मध्वाचार्य द्वैती, त्यामुळे त्यांच्या मनात इतका विरोध असूनसुद्धा ज्ञानेश्वरांनी आपल्या गीता-व्याख्यानात मध्वाचार्यांच्या भाष्यग्रंथाचा उपयोग करणे कितपत शक्य आहे ? ज्ञानेश्वर व मध्वाचार्य यांच्या सिद्धांतात इतका फरक असूनसुद्धा; मध्वाचार्यांचे भाष्यग्रंथ व ज्ञानेश्वरी यात काही साम्यस्थळे आढळतात व त्यामुळे ज्ञानेश्वरांपुढील भाष्यकारांत मध्वाचार्यांचाही समावेश करणे योग्य ठरेल, असे वाटते.

मध्वाचार्यांनी गीतेवर दोन व्याख्यानग्रंथ लिहिले आहेत– एक गीताभाष्य व दुसरे गीता-तात्पर्य. ज्ञानेश्वरीतील काही ठिकाणी या दोहों-पैकी एखाद्या ग्रंथाची छाप पडलेली दिसते. उदाहरणार्थ भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील 'आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत् । तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे स शान्तिमाप्नोति न कामकामी ॥' या सत्तराव्या श्लोकावर ज्ञानेश्वरांनी पुढील ओव्या लिहिल्या आहेत :

"जऱ्हीं सरिता ओघ समस्त ।
परिपूर्ण होउनि मिळत ।
तऱ्हीं अधिकु नव्हे ईषत् । मर्यादा न संडी ॥
ना तरि ग्रीष्मकाळीं सरिता ।
शोषौनि जांती सर्वथा ।
परि न्यून नव्हे पार्था । समुद्र जैसा ॥
तैसा प्राप्ति ऋद्धिसिद्धी ।
तेया क्षोभु नाही बुद्धी ।
आणि न परता न बाधी । अधृति तयाते ॥"

भगवद्गीतेतील मूळ श्लोकात नद्यांचा स्पष्ट उल्लेख नाही; पण ज्ञानेश्वरांनी मात्र 'सरिता' हा शब्द दोनदा वापरून स्पष्टपणे नद्यांचा उल्लेख केला आहे, गीतेतील या श्लोकावरील माध्व-भाष्यातही 'सरित्' या शब्दाने नद्यांचा स्पष्ट उल्लेख केलेला आढळतो. याखेरीज आणखीही काही शब्द आणि कल्पनाही ज्ञानेश्वरी आणि मध्वाचार्यांचे गीताभाष्य व गीतातात्पर्य यामध्ये

समान आढळतात. भगवद्गीतेतील दुसऱ्या अध्यायाच्या 'आपूर्यमाणम्' इत्यादी वर उल्लेखिलेल्या सत्तराव्या श्लोकावरील मध्वाचार्यांचे गीताभाष्य व गीतातात्पर्य यांचे उतारे पुढे दिले आहेत :

माध्वगीता भाष्य :

"तेन विषयानुभवप्रकारमाह–आपूर्यमाण मिति। यो विषयैरापूर्यमाणोऽप्यचलप्रतिष्ठो भवति, नोत्सेकं प्राप्नोति, न च प्रयत्नं करोति, न चाभावे शुष्यति। न हि समुद्रः सरित्प्रवेशननिमित्तौ वृद्धिशोषौ बहुतरौ प्राप्नोति प्रयत्नं वा करोति।"

माध्वगीतातात्पर्य :

"भुञ्जानोऽपि हि यः कामान् मर्यादां न तरेत् क्वचित्।
समुद्रवद्धर्ममयीं नासौ कामी स उच्यते॥"

ज्ञानेश्वरीतील 'मर्यादा न संडी' व माध्वगीतातात्पर्यातील 'मर्यादां न तरेत् क्वचित्', ज्ञानेश्वरीतील 'शोषौनि जाती सर्वथा' व माध्वगीताभाष्यातील 'न चाभावे शुष्यति', ज्ञानेश्वरीतील 'तेया क्षोभु नाही बुद्धी' व माध्वगीताभाष्यातील 'नोत्सेकं प्राप्नोति' यांतील साम्य लक्षणीय आहे. या संदर्भात आणखी एका गोष्टीचाही आवर्जून उल्लेख केला पाहिजे. ज्ञानेश्वरांच्या आधी होऊन गेलेल्या शंकराचार्य व रामानुजाचार्य या दोघांनीही भगवद्गीतेतील वर दिलेल्या श्लोकावर भाष्य लिहिताना त्यात कोठेही नद्यांचा स्पष्टपणे उल्लेख केलेला नाही. तो केवळ ज्ञानेश्वर व मध्वाचार्य यांनीच केलेला आहे. रामानुजाचार्यांनी 'नादेया आप' असे म्हणून नद्यांचा अप्रत्यक्ष उल्लेख केला; पण 'सरित्' शब्द मात्र वापरला नाही.

मध्वाचार्यांनी आपल्या गीताभाष्याच्या प्रारंभी गीतेचे 'तत्र च वासुदेवार्जुनसंवादरूपा सर्वमहाभारतार्थसंग्रहा भारतपारिजातमधुभूता' असे मोठे काव्यमय वर्णन केले आहे, तर ज्ञानेश्वर १.५० मध्ये 'आता भारतकमळपरागु। गीताख्यु प्रसंगु। जो संवादिला श्रीरंगु। अर्जुनेसी॥' असे गीतेचे वर्णन करतात. मध्वाचार्य गीतेला महाभारतरूपी पारिजाताचा मध म्हणतात, तर ज्ञानेश्वर तिला महाभारतरूपी कमलातील पराग असे म्हणतात. हेही साम्य लक्षणीय आहे.

शंकराचार्य वा रामानुजाचार्य यांनी गीतेवरील आपल्या भाष्यग्रंथातून श्रीमद्भागवतपुराणाचा कोठेही आधार घेतलेला नाही. उलट मध्वाचार्यांनी मात्र भागवतपुराणातील अवतरणे जागोजाग दिलेली आढळतात. ज्ञानेश्वरांनी आपल्या गीताव्याख्यानात ठिकठिकाणी भागवतपुराणातील अनेक कथांचा मात्र उल्लेख केलेला आढळतो. उदाहरणार्थ– सांदीपनी ('मृत गुरुपुत्र आणिला'–ज्ञा. ३.१६३), सुदामा (मी सुदामयाचिया सोडी गांठी। पव्हृया लागीं॥' ज्ञा. ९.३९४), गजेंद्रमोक्ष ('पाहे पां सावजें हातिरू धरिलें' ज्ञा. ९.४४२), नरसिंहावतार ('माझे नृसिंहत्व लेणें' ज्ञा. ९.४५०); कंसवध व शिशुपालवध (ज्ञा. ९.४६६) नारद, ध्रुव, अक्रूर; शुक गोपी (ज्ञा. ९.४६८–६९), गंगावतरण (ज्ञा. १०.२५६), कृष्णजन्म व पूतनावध (ज्ञा. १०.२८८), गोवर्धनोद्धरण (ज्ञा. १०.२८९); कालियामर्दन व वत्सहरण (ज्ञा. १०.२९०), हिरण्याक्षकथा (ज्ञा. ११.६१). अजामिळकथा (ज्ञा. ११.१०४), वामनावतार (ज्ञा. ११.१०६); मृत्तिकाभक्षण (ज्ञा. ११.१८२), मार्कंडेयकथा (ज्ञा. ११.१८७) इत्यादी. अशा रीतीने मध्वाचार्य व ज्ञानेश्वर या दोघांनीही आपल्या गीता व्याख्यानात भागवतपुराणावर भर दिलेला दिसतो, की जी गोष्ट शंकराचार्य व रामानुजाचार्य यांच्या गीताभाष्यात अभावानेच आढळते.

या सर्व मुद्यांचा साकल्याने विचार केल्यास असे दिसून येईल की 'भाष्यकार' शब्दाने ज्ञानेश्वरांना केवळ शंकराचार्य, रामानुजाचार्य वा वसुगुप्तासारखे शैव आचार्यच नव्हेत, तर मध्वाचार्यांसारखे द्वैती व वैष्णव आचार्यही अभिप्रेत असावेत. अशा रीतीने ज्ञानेश्वरांनी आपले गीताव्याख्यान शंकराचार्य, रामानुचार्य वा वसुगुप्ताचार्य यासारख्या पूर्ववर्ती भाष्यकारांनाच 'वाट पुसत' केले असे नसून आपल्या समकालीन पण विरोधी सिद्धांत मांडणाऱ्या मध्वाचार्यांनाही पुढे ठेवून केले असे सिद्ध होते. यातून ज्ञानेश्वरांचा उदार दृष्टिकोणच दिसून येतो. ■

१४५, अरुण, शिवाजी चौकाजवळ
अरुण–इस्लामपूर
(जि. सांगली) ४१५४०९

कवी | आणि | कविता

: प्रा. ना. ल. वैद्य

कवी : श्रीपाद गंगाधर कावळे
सेवानिवृत्त अधिकारी (ए. जी. कार्यालय)
पत्ता : २९९, शंकरनगर, नागपूर.

प्रकाशित	अस्मिता
साहित्य :	अवस्था
(कवितासंग्रह)	कवी आणि कविता

कवी

पश्चिम महाराष्ट्रातील साहित्यिकांच्या सावलीखाली विदर्भाचे साहित्य वाढलेले नाही. त्या साहित्यिकांच्या परिणाम होऊन त्याची भ्रष्ट नकल विदर्भातील साहित्यिकांनी केलेली दिसत नाही. जिथे एखाद्या साहित्यिकाने अशी नकल करायचा प्रयत्न केला तिथे तो फारच फिका पडला आहे. नागपूरचे नवोदित कवी श्रीयुत श्रीपाद गंगाधर कावळे यांचे तीन काव्यसंग्रह या दृष्टीने उल्लेखनीय आहेत.

श्री. कावळे यांचे आतापर्यंत तीन काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. पहिला "अस्मिता" (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अनुदानाने) १९७९ ह्या सुमारास प्रकाशित झाला. दुसरा "अवस्था" १९८१ साली व तिसरा "कवी आणि कविता" हा १९८६ साली.

कावळयांच्या तिन्ही काव्यसंग्रहातून त्यांची परिपक्वता कशी वाढत आहे याचे दिग्दर्शन होते आणि ज्या ढोवळ चुका त्यांचेकडून प्रथम प्रथम घडल्या, त्या उत्तरोत्तर कमी होत गेल्या याचेही मनोज्ञ प्रत्यंतर येते.

तीनही संग्रह मिळून कावळयांच्या एकंदर १३१ कविता आहेत. पहिल्या "अस्मिता"मधे ३८, दुसऱ्या "अवस्था"मधे ७२, आणि तिसऱ्या "कवी आणि कविता" यात २१ कवींना अर्घ्यप्रदान केले आहेत.

निसर्ग आणि मानव यातील संबंध, प्रतिक्रिया, निदान कवीमनाच्या प्रतिक्रिया हा मुख्य बिंदू त्यांच्या काव्यात आहे हे निश्चित. दुसऱ्या काव्यसंग्रहास ('अवस्था') सामाजिक जाणीव अधिक स्पष्टतेने दृग्गोचर झालेली दिसते. अपरिपक्व विचारांमुळे पुष्कळ ठिकाणी कल्पनांतही असंबद्धता आढळते. प्राथमिक अवस्थेतील काव्यातून दुर्बोधता आढळते; कारण मनात कल्पनांचा उडालेला गोंधळ, त्याक्षणी सुचलेले काही काव्यमय शब्द व त्यांना उपयोगात आणण्याची कवीची दांडगी हौस त्यामुळे अनावश्यकता, उथळपणा व अर्थशून्यता हे दोष आढळतात.

तरी कवीच्या मनातील कल्पनांचा गोंधळ आता नष्ट होवून प्रतिमा स्पष्ट होते, विचारात परिपक्वता येणे, शब्दांत सामर्थ्य येणे व त्यात अर्थगर्भता असणेही येथे आहे.

तिसरा, काव्यसंग्रह "कवी आणि कविता." यातील कविता पहिल्या दोन संग्रहांपेक्षा जरा निराळया आहेत – 'निराळया' या अर्थाने की मराठी, हिंदी, पंजाबी, पर्शियन, इंग्रजी भाषेतील एकंदर २१ कवींना त्यांनी "अर्घ्यप्रदान" केले आहेत. स्वतंत्र विषयांवर कविता नाहीत, या अर्थाने 'निराळया.' कवीच्या काव्याचे मर्म कशात आहे, त्याच्या काव्याचा आत्मा कोणता हे आपल्या प्रतिभेच्या जोरावर जाणून घेऊन, तितक्याच

उत्कटत्वाने रसिकांपुढे मांडणे हे अतिशय अवघड कार्य आहे ! ते कावळचांनी केले आहे.

कावळचांच्या प्रतिभेची बाल्यावस्था, किशोरावस्था व युवावस्था या तीनही संग्रहातून दिसून येतात. कावळे म्हणजे विदर्भातील एक झपाटलेला कवी, याची साक्ष हे काव्यसंग्रह वाचून पटते.

कविता :

१. बालकवी

गर्द रान सावळे सभोती
निर्झर वेडा आजहि हिंडत
काठावरल्या तरुलतांना
बालकवीच्या गोष्टी सांगत;

अजून श्रावणसरी शोधती
औदुंबर तो तुझा तटावर
दिशान्त वारा तुला शोधतो
ऐल तिरावर, पैल तिरावर.

सौंदर्याचे किती उखाणे
तुवा गाईले डोळा पाझर
अर्ध स्फुट कलिकांचे हृद्गत
मौक्तिक दव अन् तृणावर

सहजभाव लयबद्ध अविष्कृत
तू प्रेमाचे शेत पेरले
सुगम सरल कवितेच्या ओळी
शब्द नव्हे, प्राजक्त सांडलें.

शब्दा शब्दातुन आजही
तुझ्या स्मृतींचा सौरभ गळतो
तुझ्या कवितेतून अजुनहि
निसर्ग इथले गाणे गातो.

२. ना कफन तुजसी मिळाले

कोण तू, प्रतिभा विलक्षण, की जशी सौदामिनी
भेदूनी आकाश जी या धरेवर थांवली
काळजावर कोरली तू सुचित्रे वेदनांची
शब्द ना स्फुलिंग जे, विद्युताची ती झळाळी

मार्दवी सौंदर्य जे त्या कळचाही लाजल्या
संगिताचे सूरही थांवले वाद्यावरी
नाज नखरा ती अदा इष्क आणि उल्फते
वारुणीचे लाल पेले नाचती मंचावरी.

अप्सरा स्वर्गातल्या रंगल्या नृत्यात येथे
ते गझल लज्जत खुमारी ते विदेही रंगले
वेदनांचा डोह तो बुडवुडे पृष्ठांवरी
चांदण्या सौंदर्यशाली, तू व्यथांना झाकले.

जाणता होता खुदाचा तो खुदा दारावरी
विदूत सिंधू तू अनूतील सौंदर्य होते पाहिले
तो खुदाही थांवला मैफली धुंडाळल्या
देव दूतांनी दिले संदेश तू सांगितले

ही अजब दुनिया निराळी ढंग वेढंगा निराळा
लोक इथले बेकदर, जीक्र ना येथे कुणा
जादुगारी या इथे, डाव येथे मांडती
मारल्या जाती फरिस्ते काय सांगावे कुणा.

वाकला ना तू कधी, त्या कमानी वाकल्या
जाहला ना तू कधी राजदरबारी खिलौना
बंद होती मज्जीदीची दालने तू थांवला ना
तू परतला, ना अजीजी, ना खुदाची याचना

तू शहा जख्मेवतन मागुती फौजा व्यथांच्या
दिल्वरांना तू दिले आयुष्य हे फेसाळले
ढवळला कल्पान्त तू पार दर्या जाहला
तू इजाजत घेतली, ना कफन तुजसी मिळाले

३. आम्ही

भाग्यरेखा कोरतो भालावरी आम्ही स्वहस्ते
चंदनानी कां कधी गंध मागावा कुणाला
ओंजळी अमुच्या रित्या सौगंध आम्ही वाटतो
आमचे सारे ऋतु हंगाम अमुचा वेगळा.

दैवते सारीच येथे धावती घ्याया विसावा
रान हे गंधावले मधुकंस येथे सांडला
तळपत्या अग्निशलाका घेऊनी हातात आम्ही
देवदूतांच्या कथा सांगतो आम्ही जगाला.

वाकली ना ही धनुष्ये, आयुधे पाठीवरी
सज्ज आम्ही झुंज द्याया, साथ प्रज्ञेची अम्हाला
बंध ना वेबंद आम्ही, मुक्तमार्गिचे प्रवासी
थांबवू कोणी शकेना, या भडकत्या वादळाला.

नाते

सुईत दोरा ओवता येऊ नये
तसे तुला कुठल्या आठवणीत
गुंफता येत नाही...
पिंजऱ्यातल्या पोपटाचा कंठशोष
हळूहळू विरत जावा तसे लयफुलांचे
गाणे कविताही नाकारीत जाते
एकेक पान पिवळे पडत गळताना,
माणसांचे नाते दूरावत जाते
ऐलतीरावरचे पैलतीरी न्यायला
नुसते 'असणे' सुद्धा तर पुरणार असते...

संवाद

काही श्वास तुला द्यायचे राहूनच गेलेत्
एक निष्ठेचा, एक प्रेमाचा, एक त्यागाचा...
तुझ्या माजघरात बसून केलेले स्नेहल संवाद
तू, सिमेंटच्या भिंती फोडाव्या तसे
कोसळवलेस...कमीतकमी तुझ्या
काळ्याभोर अंगणातले सदाफुलीचे
बहरलेले झाड तरी नको होते तोडायला...

झूला

तुझे आभाळाचे देणे
माझी फुटली ओंजळ
कसे आठवावे आता
हे गाव स्वप्न वेल्हाळ...

आठवणींच्या झुंबरी
झुला झुलवून गेला
तुला कारे साजणा
चंद्र नाहीच दिसला ?

तुझे देशील का झाड
पाखरे लाघवी सारी
हिरव्या चाफ्याकरिता
मी होइ पानगळारी....

सुलभा हेर्लेकर
टिकेकर रोड,
धनतोली, नागपूर

वारे

काळावरी श्वास तुझा
तसी तुझी अक्षरे
दूर उडून गेलीत
अपरिचित पाखरे ।।

सांजेतून थरथरे
शब्दमधी कापरे
फाटलेल्या वस्त्राशी
काय बोलतील वारे ?

दमेकरी

संदर्भासाठी काढलेल्या टिपणांच्या पानांसारखा
मी माणसांना टाचण्या लावून
बाजूला ठेवत गेलो
बऱ्याच दिवसांनी सवड लाभली तेव्हा–
मी काढली चळत, टाचणी लावलेल्या
माणसांची
टाचलेली टाचणी गंजून गेली होती
आयुष्या सारखी
टाचलेल्या माणसांच्या संदर्भाखाली
मी तळटीपा टाकल्या ठळकपणे
तळहातांवरील हस्तरेषांसारख्या
आणि मग घाम टिपून घेतला
मानेवरील, खांद्यावरील, चेहऱ्यावरील
कोऱ्या करकरीत टर्किश नॅपकिनने
डोळ्यांवरचा चष्मा काढून
सिगारेट पेटवली
–आणि सिगारेटच्या धुरानं गुदमरून
ती टाचलेली माणसं खोकू लागली
दमेकऱ्यासारखी.

निनावीपण

आयुष्याच्या किल्ल्याचे
पडझड झालेले बुरूज
...तसा हा रंडका किल्ला
एकही लढाई न लढला गेलेला
...उगाचच लटकलेली
विवण्णपणाची वटवाघुळे...
अंधार कोठड्यात.
एकांताच्या पाण्यावर
मनाचा शेवाळी तरंग
निपचीत पडून
उपसा न केलेला
विहीरीसारखा.
...पाण्यात प्रतिबिंब
दिसणार नाही हे ठाऊक,
असतांनाही डोकावून
पाह्यलं आत... सहजच
गंजलेल्या तोफांनी
सहजपणाची भूतावळ
मागे लागलेली;
गांधील माशांसारखी.
आता कुठं पळायचं
हे सगळं निनावीपण घेऊन ?
येत्या काही पळातच
काळोखाचे रान माजेल
या भक्कम दगडी पायऱ्यांवर
कीड लागलेलं झाड
घेऊन आता उठायलाच हवंय
गावाकडे जाण्यासाठी...

मधुकर धाकराव
माटगाव / ४२३१०१ / ता. चांदवड /
जि. नाशिक

अनुक्रमणिका

परमसत्य

शहराच्या रस्त्यांवर घोडे धावत असतात
संध्याकाळ आपला बाजार
अंथरत असते तेव्हा
उत्तररात्रीपर्यंत घोड्यांचं साम्राज्य आबादीत
ठेवणारा बाजार, रस्ते प्रचंड
ओसाड पडले तरी...
मेंदूत स्फोटणाऱ्या वर्तमानपत्राच्या हेडलाईन्स
आतडे गलवलून टाकणाऱ्या गावाकडच्या
बातम्या
नितीमत्ता, निष्ठा, प्रामाणिकपणा
वगैरेंचा चुथडा
करून टाकणारे प्र:ंग
उन्मत्त घोड्यांच्या कृष्णलिला, चाणाक्यलिला
पाहिल्या म्हणजे आधीचे सारे फुटणे, तनतनणे
बेचैन होणे वगैरे संदर्भहीन होऊन जाते
डोक्याच्या कवटीतून मेंदूला बाजूला काढून
ठेवण्याची किमया
साधली नाही म्हणून पदोपदी ठेचाळणे
आणि रस्त्यांवरून
उन्मत्तपणे धावत येणाऱ्या घोड्यांच्या
टाचेखाली
चिरडून जखमाळणे.
घोड्यांचा जथ्था बारमध्ये शिरला म्हणजे
चिरंतन स्वत्वाचे निनाद बाहेर पडत असतात
आणि दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्राच्या
त्या हेडलाईन्स बनतात,
बारच्या पायऱ्यांवरून
झिम्मा खेळत परततांना
अधिकच एकटे वाटावे असे रस्ते रिते होतात
रस्ते ही संस्कृतीची आवश्यक व परिपूर्ण गरज
आणि बेहोश घोडे, झिंगलेले घोडे,
खूनशी घोडे,
उन्मत्त घोडे म्हणजेच खरीखुरी संस्कृती !
नाहीतरी फुटपाथवर
संस्कती थोडीच असते... !
...तेव्हा संदर्भहीन संध्याकाळ
अर्थहीन बाजार...फक्त घोडे
तेवढे परमसत्य !

अवशेष

सोबती पुढे पुढे निघून गेले
त्यांच्या खांद्यावरचे जहाल झेंडे
दिसेनासे झाले.
झेंडे नेटाने सांभाळतांना खांद्यावर
पडलेल्या खट्ट्यांचा त्यांना विसर न पडो
म्हणजे मिळविले !
समोर एक हिरवागार सुंदर प्रदेश आहे
हे त्यांना ठावूक होते म्हणून त्यांनी
खांद्यावर झेंडे घेतले
असे प्रथमदर्शनी वाटलेच नव्हते
प्रदेश टप्प्यात येतो आहे,
तेवढी तयारी करण्यास
झेंड्यांनी खूपच मदत केली
असे कट्यात आल्यावर
डोळ्यातला अंगार, जीभेवरचा ज्वालामुखी
मुठीतला आवेश, हृदयातले निळ्या
आकाशाचे स्वप्न
खांद्यावरच्या झेंड्यात माळेसारखे ओवले
आणि 'पहाडाला धडक देतो आहे,
सावध रहा' अशी गर्जना करून
असंख्य स्वप्न उध्वस्तांचा काफिला सोबत
घेवून ते निघाले...
सोबत करताना हे काही खरं नाही
अस जाणवत असताना सुद्धा
सोबतीचे वचन पाळले...
त्यांनी वचन दिलेच होते कोणाला ?
मग पाळण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता !
पुढे गेल्याने त्या परिघात सापडल्याने
लिलाव होत असेल स्वत्वाचा
तयार स्वप्नांचा... तर येथेच थांबणे बरे !
स्वीकारलेल्या झेंड्याचे अवषेश तरी
होणार नाहीत.

धर्मराज निमसरकर
कोरडे बिल्डिंग/आळंदी रोड,/कळस,
पुणे ४११ ०१५

काव्यसोहळा '89

व

काव्य लेखन / आस्वादन मार्गदर्शन शिबीर

विदर्भ साहित्य संघाची सांस्कृतिक समिती व युगवाणी यांचे वतीने एका द्विदिवसीय काव्यसोहळ्याचे आयोजन करण्यात यावयाचे असून या उपक्रमाचा एक भाग म्हणून काव्यलेखन / आस्वादन मार्गदर्शन शिबिर देखील आयोजित करण्यात यावयाचे आहे.

या द्विदिवसीय काव्यसोहळ्यात गेल्या शतकातील मराठी कवी, कवितालेखन, काव्य-समीक्षा, काव्यप्रवाह, कविताप्रकाशन, वितरण, काव्यस्वाद, कवितेचा वाचक व त्याचे अस्तित्व, कवितेचे अध्ययन–अध्यापन, कविसंमेलनांचे प्रयोजन व कवितावाचन–गायन यांचे कवितेवरील परिणाम, कवीचे व कवितेचे सामाजिक राजकीय, सांस्कृतिक नातेसंबंध, सांस्कृतिकतेच्या संदर्भातील कवितेचे स्थान, भूमिका व वास्तव, समाजातील विविध संस्थांची कवितेकडे बघण्याची दृष्टी व त्याची कारणमीमांसा, मराठी कवितेचे भारतीय व जागतिक कवितेच्या संबंधातील स्थान, यापैकी अथवा तत्सम, आनुषंगिक विषयांवरील नामवंतांचे निबंधवाचन व त्या त्या निबंधावरील नंतरची चर्चा, परिसंवाद, गटचर्चा नामवंतांची व नवोदितांची काव्यवाचने, कविसंमेलने, कवितांची पोस्टर्स, कवितासंग्रहांचे प्रदर्शन, काव्ययात्रा याचा समावेश असेल.

काव्यलेखन / आस्वादन मार्गदर्शन शिबिर

याच उपक्रमाचा भाग म्हणून मराठीत अमाप लिहिल्या जाणाऱ्या कवितेच्या नवलेखकास व काव्यविषयक उत्सुकता असणाऱ्यांना देखील काव्यलेखकीय व्यक्तिमत्वासंबंधीने व तसेच कवितेची भाषाशैली, काव्यलेखन, काव्यआकलन व काव्यस्वाद या संबंधाने आवश्यक ते मार्गदर्शन उपलब्ध करवून देणाऱ्या अभ्यासक्रमाचा समावेश असलेल्या व तज्ञांचे मार्गदर्शन असलेल्या शिबिराचेही आयोजन करण्यात यावयाचे आहे.

या उपक्रमातील सहभाग निःशुल्क असून हा उपक्रम केवळ युगवाणीच्या त्रैवार्षिक वर्गणीदारांकरिता आयोजित करण्यात येत आहे. युगवाणीचे त्रैवार्षिक वर्गणीदार असणे एवढीच अट या सोहळ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांना पूर्ण करावी लागेल. ती पूर्ण करण्यात त्यांना आनंदच वाटेल अशी खात्री आहे.

युगवाणीची वार्षिक वर्गणी ३५ रु. असून त्रैवार्षिक वर्गणी मात्र रु. ९० असेल.

या उपक्रमाकरिता त्रैवार्षिक वर्गणीदार म्हणून सहभाग नोंदविणाऱ्यांना त्यामुळे वर्गणीत रु. १५ ची भरघोस सूट प्राप्त होईल, आपला सहभाग नोंदवू इच्छिणाऱ्यांनी कृपया युगवाणीची त्रैवार्षिक वर्गणी विदर्भ साहित्य संघाकडे पाठवून या उपक्रमातील त्यांच्या सहभागार्थ आपले नाव व पत्ता, आवड, इतर व्यक्तिगत माहिती, प्रकाशित लेखनाची माहिती व युगवाणीची त्रैवार्षिक वर्गणी भरल्याची पावती क्र. व तारीख ही माहिती प्रबंध संपादक, युगवाणी, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, नागपूर, १२ या पत्त्यावर पाठवावी.

आपला असा सहभाग नोंदविणाऱ्यांना या उपक्रमाच्या तारखा व सविस्तर कार्यक्रम याबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात यावयाचे आहे.

: परिचय : नव्या ज्ञानशाखेचा :

कथावस्तुचे मनोभाषा वैज्ञानिक परीक्षण

प्रा. धनंजय जोग

मनोभाषाविज्ञान हा विषय, मराठी समीक्षेच्या संबंधात तरी नवीनच आहे. मनोभाषाविज्ञानाच्या निकषांवर कादंबरी किंवा कथेचे मूल्यमापन करणारी समीक्षा मराठीत आजवर तरी वाचनात आलेली नाही. भाषाविज्ञानाच्या अनेक शाखांमधे या शाखेची भर १९६८ साली पडली. अमेरिकेतील समाजविज्ञान संशोधन परिषदेने एका आंतरराष्ट्रीय परिषदेकरिता तीन भाषाशास्त्री व तीन मानसशास्त्रज्ञ बोलाविले होते. त्यांच्या विचारविमर्शातून मनोभाषाविज्ञान ही एक नवी ज्ञानशाखा निर्माण झाली. या शाखेचा व नुकत्याच वाचनात आलेल्या व्लादिमीर नॅबोकॉव्हच्या 'लोलिता' ह्या जगप्रसिद्ध कादंबरीचे मनोभाषावैज्ञानिक परीक्षण ह्या दोहोंचा परिचय थोडक्यात करून देणे हा या लेखाचा उद्देश.

मनोभाषाविज्ञान हे भाषेच्या मानसशास्त्रीय व्यापाराचा व भाषेचा व्यक्ती व समूह ह्यांच्या संबंधावर होणारा परिणाम ह्यांचा अभ्यास करते. विचारांच्या आदानप्रदानाला प्रोत्साहन, विचारांचे साधन म्हणून कल्पनांचा उपयोग, भाषेचा भावना व संवेदनांच्या अभिव्यक्तीचे एक माध्यम म्हणून अभ्यास, व ज्यामुळे मानवी जीवन समृद्ध होईल अशा साहित्याची निर्मिती करणे ही मनोभाषा विज्ञानाची प्रमुख कार्ये होत.

'लोलिता' ही एक जगप्रसिद्ध कादंबरी. अनेकांनी ती वाचली असणार व त्यामुळे मनोभाषाविज्ञानाच्या नवीन निकषांवर तिचे पुनरावलोकन नक्कीच मनोरंजक ठरेल. ज्या वाचकांचा कादंबरीशी परिचय नाही त्या वाचकांसाठी थोडक्यात कादंबरीचा कथाविषय असा :

'लोलिता' ही नऊ ते चौदा वर्षे वयाच्या तरुण मुलींबद्दल किंवा समवयस्क पण तशीच मानसिक अस्वस्थता अनुभवत असलेल्या, इतर मुलींबद्दल प्रगट शारीरिक आकर्षण असणाऱ्या एका इसमाची कहाणी आहे. अशा मुलींना तो 'बालपरी' (nymphet) म्हणतो. वरवर पाहता तरी हे पुस्तक हम्बर्ट नावाच्या एका माणसाचा कबुलीजबाब असल्याचे दर्शविते. मुख्यत्वेकरून ते डोलोरस हेस नावाच्या एका अमेरिकन बालपरीशी असलेल्या त्याच्या संबंधाचे चित्रण आहे. तो तिला 'लोलिता' म्हणतो लोलिताची आई, श्रीमती हेझ ही एक विधवा. लोलिताशी निकट संपर्क यावा या व केवळ याच हेतूने हम्बर्ट तिच्या आईशी विवाह करतो. काही काळानंतर जेव्हा श्रीमती हेझचा

आपघाती मृत्यू होतो त्यानंतर हम्बर्ट हा आपल्या सावत्र मुलीला, लोलिताला, घेवून अमेरिकाभर एका मोटेलमधून दुसऱ्या मोटेलमधे मुक्काम करीत हिंडत असतो. सरतेशेवटी लोलिता ही हम्बर्ट-सारख्याच अप्राप्य ध्येयाचे वेड लागलेल्या, (Nympholept) त्याच्यासारखेच लहान मुलींबद्दल लैंगीक आकर्षण असलेल्या Clare Qulity नावाच्या एका माणसाबरोबर पळून जाते. अनेक वर्षे उलटल्यानंतर तिची हम्बर्टशी पुन्हा भेट होते. तिला Clare Quiltv ने सोडून दिलेले असते. त्यानंतर लोलिताचा विवाह एका सामान्य माणसाशी झालेला असतो आणि लवकरच ती त्याच्या मुलाची आई होणार असते. हम्बर्ट हा लोलिताकडून Clare Quilty चे नाव व पत्ता काढून घेतो, त्याला शोधून काढतो व ठार करतो.

स्वत:च्या सामान्य जाणीवेपेक्षा वेगळया, असामान्य जाणीवेत आपला सहभाग होतो आहे अशी भावना वाचकाच्या मनात निर्माण करणे हे एक कठीण काम आहे. शिवाय लोलितामधील हम्बर्टची जाणीव ही कुठल्याही सामान्य कादंबरीत आढळणाऱ्या जाणीवेपेक्षा कितीतरी उच्च स्तरावरची व अधिक विविधता असलेली आहे. हम्बर्टचे मन हे एका तऱ्हेवाईक छंदाच्या वर्चस्वाखाली वावरणारे निसरडे, उपरोधिक व आत्मनिरिक्षक मन आहे. ह्या मनात स्पंदित होणाऱ्या मुलखावेगळया संवेदनांची जाणीव, छापील शब्द ह्या साधनाचा अतिशय युक्तीपूर्वक उपयोग करून, लेखक आपल्या अनुभवास आणून देतो.

त्याच्या आयुष्यातील अधिकतर काळ त्याला पछाडणारी लालसा हीच हम्बर्टच्या लेखनातील प्रमुख प्रेरणा होय. आणि ह्या आत्मचरित्रात्मक ग्रंथात ही प्रेरणा भाषेला शक्ती प्रदान करण्याचे कार्य करते. या शक्तीचे खरे दर्शन घडते ते रूपकांच्या निवडीत. टेलीफोनमधून परत मिळणाऱ्या नाण्यांबद्दल त्याला " अचानक नाण्यांचे स्खलन होते." व "नाणी झटक्याने परत मिळतात" असे जाणवते. घड्याळयाच्या गजराचे वाजणे हे " घड्याळाचे स्तनाग्र दाबून थांबविता येते." तयार कपड्याच्या दुकानातला कारकून कपड्यांचे रंग सांगतो ते " स्वप्न–गुलाबी, गोठलेल्या पाण्या-सारखे, शिस्नासारखे जांभळे " ह्या शब्दात.

कादंबरीतील रूपके ही एका सर्वसाधारण जाणीवेतून समर्पक असतात. (उदा. टेलीफोनमधून नाण्यांचा वर्षाव) आणि ती नायकाच्या किंवा त्या पात्राच्या दृष्टीकोनाबद्दल काहीही सांगत नाहीत. हम्बर्टच्या विश्वातील वस्तू व घटनांवरून निर्माण होणाऱ्या आठवणी ह्या एका विशिष्ट मनोभूमिके-तून निवडल्या जातात व आपल्यालाही त्याच मनोभूमिकेत घेवून जाण्याचे कार्य करतात.

हम्बर्टची लालसा शब्दांवरही आपला प्रभाव पाडते. शब्दाच्या नानाविध अर्थछटांमधून नेमका त्याला हवा तो आणि स्वत:च्या उद्देशाच्या अधिकाधिक जवळ पोहोचणारा अर्थ तो शोधून काढतो उदा. हम्बर्ट एकदा लोलिताला शाळेतल्या एका नाटकात पुरुषांसोबत काम करू देण्यास राजी नसतो आणि तो तिला सांगतो की परवानगी केवळ एकाच अटीवर मिळू शकेल.

" If the male parts are taken by female parts "

तो सरळपणे

" If the male parts are taken by females " असे म्हणत नाही, जरी शिक्षिकेला बहुतेक तसेच ऐकू येते. ' पार्टस् ' ह्या शब्दाच्या शेवटच्या अनावश्यक वापरामुळे ' पार्टस् ' ह्या शब्दाच्या ' भूमिका ' ह्या अर्थाशिवाय ' Private parts ' या अर्थाची वाचकाला आठवण होते. व हम्बर्टला नेमके काय सुचवायचे आहे हेही स्पष्ट होते, नॅबोकोव्हच्या, उद्देशाला भाषेचा असा उपयोग अगदी पूरक आहे. पारंपारिक भाषेप्रमाणे पूर्ण झालेल्या वाक्यात ' पार्टस् ' ह्या शब्दाची भर अनपेक्षित आहे व त्यातून हम्बर्टच्या लालसेचा उपरेपणा व नाक खुपसण्याची व भाषेवर आपला प्रभाव पाडण्याची प्रवृत्ती दिसून येते. शिक्षिकेच्याही लक्षात न आल्यामुळे त्या विचाराचे खाजगी स्वरूपही कायम राहते. ह्या भागातील भाषा बरीच विनोदी आहे. आपल्या

buried alive " अशा शब्दात त्या परिवर्तनाबद्दलचे दु:ख हम्बर्ट व्यक्त करतो. हम्बर्टच्या उन्मादाचे कारण हे त्याला त्या परिवर्तनाची व त्याचसोबत त्याला वाटणारे आकर्षण नष्ट होण्याची भीती हेही असते. (एकदा तर अशा बालपरींचा पुरवठा सतत होत रहावा यासाठी लोलिताच्या सहाय्याने अशा अनेक बालपरींना जन्माला घालण्याचा देखील तो विचार करतो.) पण जेव्हा लोलिताचे रूपांतर होऊन ती डॉली होते तेव्हाच हम्बर्टमधे त्याहूनही मोठे रूपांतर घडून आलेले असते. " and I looked and looked at her and knew as I clearly as I know I am to die that I loved her more than anything I had ever seen or imagined on earth or hoped for any where else."

हम्बर्ट कसा आहे हे लोलिता कशी आहे ह्यावर अवलंबून असते; त्याचा अधमपणा हा लोलिताच्या दयाळूपणाचा उपसिद्धांत आहे. त्याच्या प्रेमाचे खतपाणी मिळून लोलिता जेव्हा पूर्ण स्त्रीत्वाला पोहोचते त्यावेळी हम्बर्ट मात्र पश्चातापदग्ध असतो. Clare quilty हा एक हम्बर्ट-सारखाच बालपरींच्या दर्शनाने वेडा होणारा माणूस. हम्बर्टप्रमाणेच तोही फ्रेंच वाक्प्रचारांचा उपयोग करतो. शब्दांशी खेळ करतो आणि स्वत:च्या दुःखाचे सुद्धा अवाजवी प्रदर्शन करतो असे वाटण्यास भरपूर वाव आहे की त्याचा खून करून हम्बर्ट हा स्वत:च्या मानसिक वाढीत निर्माण झालेल्या अवरोधालाच किंवा स्वत:च्या बाताडया स्वभावालाच ठार करत असतो. एकप्रकारे ती त्याची आत्महत्याच असते.

लोलिताच्या वाचनात वाचकाचा सहभाग क्रियाशील असतो; कादंबरी वाचताना त्याला अतिशय जागरूक रहावे लागते कारण अनेक प्रकारचे संदर्भ, अनेक रूपके, अनपेक्षित शब्दांचा वापर व पात्रांच्या नावात होणारी रूपांतरे ह्या गोष्टी अन्यथा त्याच्या लक्षातच येणार नाहीत. गमतीची गोष्ट ही की इतक्या गुंतागुंतीच्या भाषेची उकल केल्यानंतरही वाचकाला हम्बर्टच्या स्पष्ट, आत्म-वर्णनपर विधानांतून झालेल्या बोधापलिकडे काहीही जास्तीचे ज्ञान प्राप्त होत नाही. कारण हम्बर्ट आडवळणाने जे काही सुचवितो तेच स्पष्टपणेही सांगतो. सूक्ष्म अवगाहन शक्ती असलेल्या मनाचे दर्शन घडविण्याचे हे एक उत्तम तंत्र आहे. सुप्त मनातील बारीकसारीक, गोष्टींचा मागोवा घेण्यासाठी त्याच्या आडवळणी बोलण्याकडे लक्ष द्यावे तेव्हा असे दिसून येते की त्याच्या आत्म-निवेदनामधे व सुप्त मनातून प्रेरित झालेल्या आडवळणी विधानांमधे एकवाक्यता आहे. असं वाटतं की ह्या व्यक्तीला सुप्त मन नावाची चीजच नाही.

लोलिता ही खरोखरीच एक धक्का देणारी कादंबरी आहे. असं समजलं जातं की हा धक्का वाचकाला कादंबरीच्या विषयामुळे—लहान मुलींबद्दलचे शारीरिक आकर्षण व अगम्यगमन किंवा व्यभिचार—ह्यामुळे बसतो. विषय नक्कीच नवा व वेगळा आहे. परंतु विसाव्या शतकातील वाचकांनी त्याहूनही जास्त धक्कादायक विषय व कितीतरी जास्त भडक वर्णने स्वीकारली आहेत. वाचकाला जाणविणारा धक्का हा विषयामुळे नसून आधुनिक मानसशास्त्रीय कादंबरीच्या परंपरेला पूर्णपणे झुगारून देण्यामुळे असावा. हम्बर्टला होणारा त्रास हा न आवडणाऱ्या गोष्टी स्वीकारण्याच्या अनिच्छेतून निर्माण होत नाही. त्याचे स्वत:बद्दलचे आकलन पूर्ण व अचूक आहे. पण त्याच्या ह्या मानसिक डोलाचा परिणाम आपल्याला नेहमी जसा सांगितला जातो तसा होत नाही. जरी हम्बर्टला स्वत:बद्दल पूर्ण समज व जाणीव असली तरीही आपण जसे आहोत तसे कां आहोत ह्याचे त्याला आकलन होत नाही. तो स्वत:ला जसाच्या तसा स्वीकारायलाही तयार नाही, पण तो बदलूही शकत नाही. खरं पाहता, रोगनिवारक सूक्ष्म दृष्टीचा महापूरही आला तरीही हम्बर्टला त्याचा काहीही उपयोग नाही. आपल्या वेदनेचे कलेत रूपांतर करून समाधान मानण्याखेरीज त्याच्याजवळ दुसरा उपाय नाही. त्यासंदर्भात ही कादंबरी मानसशास्त्रीय युगाच्या तत्वांनाच आव्हान देते. ■

लक्ष्मीनगर, नागपूर ४४० ०१०

प्रा. रा. श्री. जोग पारितोषिक १९८९

परीक्षण-मंडळाचा अहवाल

प्रा. रा. श्री. जोग स्मारक समितीने एप्रिल १९८८ मध्ये १९८७ व १९८८ या कालावधीमधील ग्रंथांचा विचार करून १९८९ च्या पारितोषिकासाठी निवड करण्यासाठी पुढील परीक्षण-मंडळ नेमले.

१. प्रा. डॉ. अशोक रा. केळकर (निमंत्रक)

२. प्रा. डॉ. व. दि. कुलकर्णी ३. प्रा. डॉ. विलास खोले

मंडळाची बैठक दि. ४-७-१९८९ रोजी पुणे येथे झाली. त्या आधी काही अनौपचारिक चर्चा झाल्या. १९८७ व १९८८ मधल्या पुस्तकांची सुची केल्यावर पुढील पुस्तकांची विशेष गंभीरपणे विचार करण्यासाठी निवड केली.

(क) आकलन-मूल्यमापन : अरुणा ढेरे, काळोखाचे कवडसे (१९८७) उषा जोशी, समर्थ साहित्यातील आकृतिबंध (१९८८) रा. भा. पाटणकर, कथाकार शांताराम (१९८८) उमा दादेगावकर, बॅरिस्टर : तीन रूपे (१९८८)

(ख) : सैद्धांतिक-मीमांसा : भालचंद्र नेमाडे, साहित्याची भाषा (१९८७) शरद पाटील, अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र (१९८८)

(ग) रसग्रहण : ज्ञानेश्वर नाडकर्णी, अश्वत्थाची सळसळ (१९८८)

(घ) वाङ्मयविद्या : द. वि. कुळकर्णी, एकनाथी भागवताचा अभ्यास (१९८७)

(ङ) संमिश्र : चंद्रकांत पाटील, आणि म्हणूनच (१९८८)

यातून पुढील पुस्तके अंतिम निवडीत विचारात घेण्यात आली.

द. वि. कुळकर्णी एकनाथी भागवताचा अभ्यास

रा. भा. पाटणकर कथाकार शांताराम

उमा दादेगावकर बॅरिस्टर तीन रूपे

साधक बाधक चर्चेनंतर परीक्षक-मंडळ पुढील पुस्तकाची १९८९ च्या प्रा. रा. श्री. जोग पारितोषिकासाठी निवड करीत आहे.

रा. भा. पाटणकर कथाकार शांताराम या पुस्तकाची निवड करताना परीक्षक-मंडळाने त्याचे पुढील विशेष प्रामुख्याने लक्षात घेतले आहेत.

शांतारामांच्या वाचक प्रिय, ठराविक कथा बाजूला ठेवून त्यांच्या कथांकडे पूर्वग्रहनिरपेक्ष दृष्टीने पाहिल्यानंतर त्यांच्या कथातील खऱ्या सामर्थ्याचे तर आकलन होतेच, पण त्याचबरोबर शांतारामांना समकालीन असणाऱ्या अनेक प्रसिद्ध कथाकारांच्या पुनर्मूल्यमापनाची दिशाही स्पष्ट होते. गंभीरपणाने कथा या रचनाप्रकाराकडे पाहिले. असता त्या रचनाप्रकाराची क्षमता आणि शांतारामाच्या कथांतून व्यक्त होणारी मर्मदृष्टी पाटणकरांनी अभ्यासपूर्ण रीतीने मांडली आहे. व्यापक जीवनानुभव, त्याला लाभणारे साहित्यरूप याविषयीची पाटणकरांची भूमिका आणि प्रगल्भ चिंतन यांचा प्रत्यय 'कथाकार शांताराम' मधून येत राहातो. सातत्याने ग्रंथरूप समीक्षा लिहीत राहाणाऱ्या निष्ठावंत समीक्षकाची मौलिकता या पुस्तकात प्रतीत होते.

प्रा. डॉ. अशोक केळकर प्रा. डॉ. प. कुळकर्णी प्रा. डॉ. विलास खोले

: संशोधन :

विदर्भातील दोन मध्ययुगीन शिलालेख


: श्रीपाद केशव चितळे

प्राचीन इतिहास संशोधनात शिलालेखाचे (Epigraph) महत्त्व अनन्यसाधारण असते. अर्थातच त्याच्या अस्सलपणाची खात्री सर्व कसोटचा लावून करून घ्यावी लागते. विदर्भाची प्राचीनता थेट वैदिक कालापर्यंत मागे नेता आलेली आहे. इतका हा भुखंड प्राचीन आहे ! अनेक स्थित्यन्तरातून प्रवास करत करत, आजचा आपला विदर्भ आपल्या कुशीत दडलेल्या अनेक पुरावशेषांना बोलका करण्यास उत्सुक आहे. आजच्या गतिमान, धावपळीच्या व कारखानदारीच्या युगात जमिनीचे प्रचंड पट्टेच्यापट्टे प्रगतीच्या नवसूर्योदयात उघडे होत आहेत. साहजिकच पुरावशेष भूकवचावर डोकावू लागले आहेत. पुरावशेष, शिलालेख. नाणी, मृद्भांडी (प्राचीन), शिल्प मणी; अलंकार, लोह उपकरणे अशा अनेक स्वरूपात आढळतात, व ह्या सर्व अवशेषांना कुशल पुरातत्त्वशास्त्री एका धाग्यात ओवून प्राचीन इतिहासाच्या माळेची जुळवाजुळव करीत असतो.

अशाच दोन नव्यानेच आढळलेल्या शिलालेखांची चर्चा ह्या लेखात केली आहे. शिलालेखांपैकी एक रामटेकचा आहे तर दुसरा वरुडचा शिलालेख आहे. रामटेक हे नागपूर जिल्ह्यातील तहसिलीचे ठिकाण असून उत्तरेस २८ मैलावर आहे. गावालगतच्या टेकडीवर श्रीरामचंद्राचे देवालय असून भगवान श्रीरामचंद्र दक्षिण प्रवासात येथे टेकले म्हणून हीस रामटेक म्हणतात असा प्रवाद आहे, तर इतर तज्ज्ञ रामटेकडीचेच रामटेक झाले, असे सांगतात. तीर्थस्थान म्हणून रामटेकची ख्याती आज निदान दीड हजार वर्षांइतकी जुनी आहे.

१९८२ साली महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाने रामटेकडीस्थित कालीदास स्मारकाजवळील केवल नृसिंह मंदिरावरील सफेदीची पुटे स्वच्छ करून मंदिरातील सभामंडपाच्या डाव्या बाजूच्या भिंतीवर सुमारे १५ ओळींचा ब्राह्मी लिपीतील इ. स. च्या ४ थ्या शतकातील लेख प्रकाशात आणला. नागपूरच्या स्थानिक वर्तमानपत्रात (तरुण भारत, दिनांक ९ जून १९८२) वरील प्रकल्पाची सचित्र माहिती "अजिंठा हे रामटेक शिल्पाचे अनुकरण–पुरातत्त्व विभागाला मिळालेला ताजा पुरावा" ह्या मथळ्याखाली प्रसिद्ध केली. पण ह्या संपूर्ण बातमीत कुठेही दरवाजाच्या उभय बाजूंना मध्यमयुगीन शिलालेखही असल्याचे निदर्शनास आणलेले दिसले नाही. तथापी ह्या संपूर्ण समन्वेषणाचे (Exploration) श्रेय महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व विभागाला द्यायला हवे.

प्रस्तुत शिलालेख केवल नृसिंह मंदिराच्या गर्भगृहाच्या द्वाराच्या (या ठिकाणी २ नृसिंह मंदिरे आहेत. आपले मंदिर कालीदास स्मारकाजवळील समजावे) उभय बाजूंना



जमिनीच्या तळापासून ३ फुट ८ इंचावर कोरलेला असून अभ्यासासाठी आपण प्रवेश-द्वाराची उजवी बाजू व डावी बाजू असे लक्षात ठेवू. उजव्या बाजूचा शिलालेख ६ ओळींचा असून डाव्या बाजूचा ५ ओळींचा आहे. या लेखाची लिपी इ. स. सनाच्या १२ व्या–१३ व्या शतकातील नागरी आहे. र हे अक्षर यादवकालीन या प्रमाणे दिसते, विसर्ग, अनुस्वार स्पष्ट दिसतात. वरील लेखाबद्दल अद्याप कुठेही माहिती प्रसिद्ध न झाल्याने तज्ज्ञांच्या निदर्शनास मजसारख्या अज्ञ पामराने हे आणावे एवढाच ह्या लेखाचा प्रपंच. लेखाची भाषा संस्कृत असून अशुद्ध स्वरुपाची वाटते. एकतर कोरक्या अशिक्षित असावा, किंवा लेख कथन करणाऱ्या अधिकाऱ्याने त्याकडे म्हणावे एवढे लक्ष दिले नसावे असे वाटते, अस्तू ! शिलालेखामध्ये (उजवीबाजू) ओळ क्र. ४ मध्ये "सिहण' असा शब्द आलेला असून डाव्या बाजूच्या ५ व्या ओळीत "राघव" असा उल्लेख आहे. शिवाय अक्षरवटीकेवरूनही ह्या शिलालेख यादव नृपतींच्या यादवराजा सिंहणाचा कालखंड अमडापूर शिलालेखाप्रमाणे शके ११३३ असा येतो.) कालखंडात मोडल्या जाऊ शकतो, असे आम्हास वाटते. छायाचित्रात शिलालेखाची हस्तप्रत दिलेली असून × हे चिन्ह शिलालेखाचा टवका उडाल्याचे दर्शविते. आता गंमत अशी की उजवी बाजू व डावी वाजू सलंग वाचायची का ? तर उत्तर असे आहे, नाही ! कारण डाव्याबाजूच्या तिसऱ्या ओळीत शेवटचे अक्षर "त्रि" असे असून लगेच पुढील ओळीत विक्रम शब्द आहे. म्हणजे पहिले उजवी बाजू पूर्ण वाचायची व तद्नंतर डावी बाजू. किंबहुना असेही वाटते की उभय बाजूचे कोरकेही (उत्कीर्णक) भिन्न असावे कारण हस्ताक्षरात फरक आहे.

शिलालेखाचा अर्थ मात्र स्पष्ट लागत नाही. शिलालेखात कुठेही कालोल्लेख नसला तरी त्रिविक्रम नावाच्या माणसाचे नाव तीनवेळा आलेले आहे. हा त्रिविक्रम नेमका कोण ? ह्याचा उलगडाही एकदम होत नाही. आपल्या विदर्भात त्रिविक्रम नावाचा एक संस्कृत कवी इ. स. च्या दहाव्या शतकाच्या आरंभी होऊन गेला असे म्हणता येते. (पहा : संशोधन मुक्तावली, डॉ. मिराशी, सर ४, पृष्ठ क्र. ९१) ह्याने नलचम्पूकाव्य रचले होते. पण आपल्या शिलालेखातील यादव नृपती सिंघणाचा काळ ह्याच्याशी जुळत नाही. तथापी कुण्या एका त्रिविक्रमभट्टाने नलचम्पू काव्याशिवाय मदालसाचम्पू हाही ग्रंथ लिहिला होता; पण उभय कवी हे भिन्न आहेत, असे डॉ. मिराशी म्हणतात तेच सयुक्तिक वाटते. प्रस्तुत लेख अनुष्टुभ छंदात असून अलंकारयुक्त आहे. व हा त्रिविक्रम स्वतःस साहित्य रत्नाकर (डावी बाजू ओळ क्र. ४) म्हणवितो. शिलालेखाचा अर्थ लावण्यासही संस्कृतज्ज्ञांना तारेवरची कसरत करावी लागते. पहिल्या ओळीतील "सरस्वता" ही सरस्वानची तृतिया विभक्ती आहे असे स्पष्ट दिसते. त्रिविक्रम म्हणजे विष्णूही होऊ शकतो. दृष्यार्थ असा– श्री विष्णूच्या पदापासून निर्माण

झालेली सरस्वती, शरीरातील उर्जस्विता व शरीरावरील अलंकाराने शोभणारी नृसिंहाच्या सह असणारी म्हणजे प्रत्यक्ष विष्णूपत्नी लक्ष्मी हीला माझे वंदन असो. शारंगदेव हेही श्री विष्णूचेच नाव (उजवी बाजू २ री ओळ) शिलालेखात कुणीतरी श्रेष्ठ साहित्यिक त्रिविक्रम यादव नृपती सिंहणाच्या कारकीर्दीत, राघव व त्याचा बंधू याच्या अधिपत्याखाली कुण्यातरी शक्तीदेवतेची (सरस्वती लक्ष्मी) हिची आराधना साग्रलंकार करून, पुण्यसंचयासाठी (नृपतीच्या) मनोभावे पूजा करतोय एवढेच आज म्हणता येईल. पण नेमका हा त्रिविक्रम (भट्ट) कोण ! इ. स. च्या ४ थ्या शतकातील वाकाटक नृपतींच्या नृसिंह मंदिरावर (द्वार) ८०० वर्षानंतर शिलालेख कोरण्याचे कारण काय ? सरस्वती-लक्ष्मी उभय भिन्न देवता एकाच पूजेत कशा ? आदी अनेक प्रश्नांची उत्तरे इतर तज्ज्ञांच्या अभ्यासांतीच शक्य आहे. माझे म्हणणे एका अज्ञ विद्यार्थ्याचे आहे. आपणापुढे ह्या शिलालेखास आणावे हा हेतू. इतर ठिकाणी नृसिंह ज्या हिरण्यकश्यपूनिर्दलन पद्धतीत दाखवितात तशी ही मूर्ती नव्हे, तर ही केवल नृसिंह (सौम्य) अशी आहे. व हे मंदिर तर भारतातील सर्वात प्राचीन मंदिर (इ. स. ४ थे शतक गुप्त वाकाटक कालखंड) ठरू शकेल. सबब संशोधनास अधिक वाव आहे.

वरूडचा शिलालेख

आतापर्यंत आपण रामटेक शिलालेखाची चर्चा केली. आता आपण विदर्भातीलच दुसऱ्या शिलालेखाकडे वळू. प्रस्तुत शिलालेख अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील (नवीन तालूका वरूड) वरूड या गावी केदारेश्वर शिव मंदिरात एका भिंतीत चिणून ठेवला आहे. ह्या शिलालेखावर पहिले संशोधन, विदर्भाचे सुप्रसिद्ध इतिहास तज्ज्ञ कै. डॉ. यशवंत खुशाल देशपांडे यांनी केले व स्थानिक मंदिर संस्थानद्वारा (१-५-५८) त्याची अल्पप्रमाणात प्रसिद्धिही झाली होती. वरुडचे सुप्रसिद्ध क्षयरोगतज्ज्ञ डॉ. हरिदास यांनी मला हे पूर्वसूरींचे संशोधन उपलब्ध करून दिले त्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

ओळ. क्र.

१. माधव नाम्नि युक्त तिथौ – – – – – – – – – – – –
२. – – – – – – – – – – – – ।। – – – – सरसी विरचय्य – – – –
३. – – – – – – ।। दीर्घा – – – – – – – – मूर्ति किर्ती स्तंभेन – – – –
४. – – – – – – – – – – – – ।। व्यरचय ततो ने – – – – –
५. लाभिरिवाभि समृद्धिमत् ।। – – – – – – – – – : – – – – –
६. वल्लीजाती करंबकेतकज या कर्पूरभालता : जगतामानंद सं
७. – – – – – – सद्यप्रकांगप्रभ ।। – – – – –
८. – – – – – – सिंहकेदारनृपते: प्रतिष्ठां गौरीशं प्रणत
९. – – – – – – कुंडमंडप विमानानी विज्ञानं । प्रभ
१०. – – – – – – केदारदासोनृप: ।। – – –
११. – – – – – – यदुदारमतिमहीप: ।। – – –
१२. केदार दासो – – – – मोंकारनाम्नो – – –
१३. जातानन्द: सरसहविषा – – – तर्पित शिव देवान् केदारो – – – दयनीय :

१४. स्थानेस्ततौ भूदेवा तत्व शिल्पीनायक – – – ॥ केदारसंमपूर्आ
१५. औदार्यकल्पद्रुमः ॥ – – – –मकरो द्विजारोवेदादिविद्याग्रः कृष्णकौशिक गोत्र.
१६. – – – स्पाटिक दर्पणायीत मनस्युन्नीयते बिंबित सदक्ष प्रकटै परमेश्वरः ॥
१७. विवेचन वेदांततर्कादिरहस्य ॥ केदारदासोपिहिनाप्रशस्ती विष्णू:
१८. – – – प्रतिस्थापने तत्स्मरारेः – – – सहस्रमोगदाने युवगणाम्
१९. – – – चिररक्षणीयः सकल नृपतिभिर्हम्र्मं – – –
२०. – – – शिरोपी सदृषेः तेनापि धर्मात्नमाति – – – प्रयं
२१. – – – ॥ विश्वदेवात्मजः शिल्पी महादेवो
२२. – – – एल्हदेव पंडितात्मजन कमलाकरेण


शिलालेखाची लांबी २७ इंच असून रुंदी १५ इंच आहे. अक्षरवाटीका, अक्षर कोरण्याची पद्धत व पृष्ठमात्रा ह्यावरून शिलालेख काहीसा अपूर्ण वाटतो. मात्र ७५ टक्के भाग वाचनीय असला तरी काही ठिकाणचे प्रस्तराचे टवके उडाल्याने वाचनास दुर्बोध झाला आहे. आपल्या लेखात कै. य. खु. म्हणतात की ह्या शिलालेखात श्री. शंकराची श्लोकयुक्त स्तुतिसुमने आहेत. पण मला मात्र केवळ स्तुतिसुमनेच नाही तर हा परिसर, (देवालय, कुंड, मंडप, विमान, वृक्षवल्लींनी युक्त उपवन, वास्तू) केदार-राजाने बांधवून घेतला असे दिसले. या शिलालेखात कुण्या एका केदार राजाचा उल्लेख ६ वेळा आलेला आहे. पण हा केदार राजा कोण ? यांचे पूर्वज, त्यांचे गोत्र, राजाच्या कुळाची माहिती मात्र कोणत्या तरी दुसऱ्या दगडावर कोरले असावे. तो दगड न सापडल्याने आज तरी हा राजा अज्ञातच राहिला (अर्थात पुराव्याअभावी) असे म्हणावे लागते. शिलालेख २२ ओळींचा असून भाषा शुद्ध संस्कृत आहे. यामध्ये केदार राजाने शिवाची प्रतिष्ठापना केली (मंदिराची) व किर्तीस्तंभ उभारला असे कोरले आहे. देवांचाही देव महादेव याच्या प्रासादास २ सरोवरांनी व लता वृक्षवल्लींनी (जाई, कदंबा, केवडा, केळी) सुशोभित केले असून स्फटिकासारख्या निर्मळ जलात ह्या प्रासादाचे प्रतिबिंब पाडुन त्यांच्या ठायी (शंकराच्या) मनामध्ये दृढ भक्ती ठेवून त्या ईश्वराचे स्मरण करण्यास योग्य असे निर्मळ वातावरण निर्माण केल्याचे दिसते. राजा स्वतःस औदार्याचा कल्पवृक्ष म्हणवितो व सर्व सेवकवर्गाला मदतीला घेऊन ही रमणीय वास्तू मी रचिली असे म्हणवितो. ह्या राजाने त्याचे शिल्पी, नायक, नर्तक यांना इनामे देववीली. एकाठिकाणी तो ओंकार विधूशेखराचीही स्थापना करविता झाला. हे चिररमणीय देवालय व त्याच्या आजुबाजूचा नितांत सुंदर परिसर माझ्यानंतर येणाऱ्या सर्व नृपतींनी संरक्षीत करावा, त्याचे रक्षण करावे अशी विनंति राजा आपल्या शिलालेखात करतो. एका ठिकाणी आपण ह्यासाठी हवी देवून यज्ञ केल्याचे तो सांगतो, त्यामध्ये ब्राम्हणासही तृप्त केले. असा हा स्मरारी– " शिव " (कामदेवाचा नाश करणारा) सर्व जगताचे रहस्य जाणणारा असून सर्व जगतास् आनंद देतो. हे मंदिर किंवा हा सुसज्ज, सुशोभित रमणीय परिसर (म्हणजेच कुंड, मंडप, विमान [सभामंडप, शिखर प्रदक्षिणापथ गाभारा]) विश्वदेवाचा पुत्र महादेव ह्या शिल्पीने निर्माण केला असावा असे दिसते. तर वेदविद्यापारंगत कौशिक गोत्री कृष्ण यांने ह्याचे पौरोहित्य केले असावे. मंदिरा-वरील हा शिलालेख एल्हदेव पंडिताचा मुलगा कमलाकर याने उत्कीर्ण केला असावा. असा हा केदार नृपती सर्व द्रव्य लावून ह्या सुंदर वास्तुकृतीचा कर्ता झाला असे ह्या शिलालेखात म्हटले आहे. या मध्ये चैत्र–वैशाख या महिन्यांची नावे मधु–माधव असे

दिले असून वसंत ऋतूंचा निदेश त्या मध्ये आहे. बहुधा ही तिथी वास्तू निर्माण तिथी असावी.

पण हा केदार नृपती कोण ? ह्याचा नेमका कालखंड कोणता ह्याचे उत्तर आज तरी देणे अशक्य आहे. मात्र लेखातील पृष्ठमात्रा (जसे । कशव = केशव, । काशिक = कौशिक पद्धतीवरून शिलालेख इ. स. दहाव्या शतकातील असावा, अर्थात विदर्भातील राष्ट्रकूट (इ. स. चे ९ वे १० वे शतक) नृपतीनंतरचे अनेक राजे आजही अज्ञातच आहे. कदाचित हा माळवा (धार) नृपती परमाराचा मांडलिक असावा. पण हा शिवोपासक होता हे मात्र निश्चित ! पण ज्याअर्थी त्याने शिवमंदिर बांधले त्याअर्थी ह्या स्थळाशी त्याचा घनिष्ठ संबंध असावा हे पक्के. आज देवळाच्या आजुबाजूस; खांब, मोठमोठे दगड, आमलक, भग्न मूर्ती, तुळया विखुरलेल्या दिसतात. मात्र हा केदार नावाचा कुणी एक शिवभक्त राजा आपल्या विदर्भात इ. स. १० व्या शतकात राज्य करीत होता हे मात्र निर्विवादपणे सिद्ध झाले. सबब संशोधनास अधिक वाव आहे. तज्ञांचे पाय इकडे वळावे ही इच्छा. ■

कोठी रोड, महाल, नागपूर ४४०००२

संदर्भ : (१) संशोधन मुक्तावली, सर ४ था कै. म. म. डॉ. वा. वि. मिराशी
(२) कै. य. खु. देशपांडे यांचा लेख
(३) दैनिक तरुण भारत [दिनांक ९ जून १९८२]
(४) डॉ. म. श्यं. सहस्रबुद्धे यांचेशी प्रत्यक्ष वार्तालाप.



विद्यापीठ विधीसभेत साहित्यसंस्थांच्या प्रतिनिधित्वाची तरतूद हवी !

आपआपल्या कार्यक्षेत्रातील उच्च शिक्षण आकारित, संस्कारित करण्यात साहित्य, भाषा, संस्कृती, कला इ. विध्नाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्थांना देखील सहभाग प्राप्त व्हावा याकरिता विद्यापीठ कायद्याच्या कलम २० अंतर्गत विद्यापीठाच्या विधी-सभांवर विदर्भ साहित्य संघासारख्या प्रादेशिक महत्त्वाच्या साहित्य, भाषा, संस्कृती व कलाव्यवहाराच्या प्रातिनिधिक संस्थांना प्रतिनिधित्व प्राप्त व्हावे अशी मागणी विदर्भ साहित्य संघाच्या १९८९-९२ या तीन वर्षाकरिता कार्यभार सांभाळल्यानंतरच्या झालेल्या कार्यकारिणी सभेत वि. सा. संघाच्या कार्यकारिणीने केली आहे.

या मागणीची विस्तृत प्रमाणावर दखल घेण्यात आली असून दै. लोकमत या वृत्तपत्राने त्यांच्या नागपूर, औरंगाबाद व जळगाव या तीनही आवृतीतून यासंबंधी अग्रलेख लिहून त्यात, " विद्यापीठावर या संस्थेचा प्रतिनिधी नसल्याने साहित्याशी संबंधित समस्यांचे विद्यापीठाच्या माध्यमातून होऊ शकणारे निराकरण होत नाही..." " महामंडळाच्या घटक संस्थांना प्रतिनिधी त्या त्या विद्यापीठाच्या कक्षेत येणाऱ्या महामंडळाच्या घटक संस्थांतून घेण्यात यावा त्यामुळे विद्यापीठाच्या माध्यमातून भाषा, कला व संस्कृती यांच्या अभ्युदयाचे, विकासाचे काम अधिक जोमदारपणे होऊ शकेल " असे मत व्यक्त केले आहे.

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारिणीचे सदस्य, युगवाणीचे संपादक श्री,. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी ही मागणी करणारा ठराव मांडलेला होता तर उपाध्यक्ष डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे या ठरावाचे समर्थक होते.

उच्च शिक्षण, विद्यापीठ व साहित्य संस्था यांच्या इतिहासात अशाप्रकारची ही मागणी प्रथमच करण्यात आली असून ती मान्य झाल्यास विद्यापीठांच्या विधी-सभेच्या यंत्रणेच्या रचनेत गुणात्मक बदल संभवणार असून विद्यापीठांच्या विधीसभा व आनुषंगिक उद्भवणाऱ्या रचनांवर साहित्य, भाषा, संस्कृती, कला व्यवहारांचे विशेषज्ञ असे संस्थात्मक प्रतिनिधित्व प्रथमच उपलब्ध होईल.

विद्यापीठाच्या विधीसभा व कार्यकारिणीने देखील स्वतःच असे प्रतिनिधित्वाची तरतूद करण्याची मागणी करणारे ठराव संमत करून हे प्रतिनिधित्व आपल्यात सामावून घ्यावे असाही सूर असून विद्यापीठांच्या काही कार्यकारिणी सदस्यांचीही त्यास अनुकूलता आहे. विद्यापीठ कायद्यात अशी तरतूद झाल्यास अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या सर्वच प्रादेशिक घटक संस्थांना त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्वच विद्यापीठांच्या विधीसभेवर प्रतिनिधित्व प्राप्त होऊन त्या त्या विभागातील उच्च शिक्षण साकारण्यातील आपला वाटा उचलता येण्याचा मार्ग उपलब्ध होईल.

चौफेर :

प्रा. ना. ल. वैद्य

सदरहू ग्रंथात छोटे मोठे मिळून (बहुतेक सगळेच १–२ पानी) १७१ लेख आले आहेत, व पृष्ठ संख्या केवळ २१३ आहे. इतक्या छोटचा जागेत महत्त्वाचा, ज्वलंत प्रश्न परिणामकारक रीतीने मांडणे सोपे कार्य नाही, त्याला कसलेली लेखणी व शीघ्र विचार लागतात. या दोन्ही गोष्टी माधव गडकऱ्यांकडे आहेत. 'चौफेर'-मधले छोटे छोटे निबंध म्हणजे काही विद्वत्तापूर्ण निबंध नाहीत. जो प्रसंग ज्याक्षणी महत्त्वाचा वाटतो, जो विचार मांडणे त्या क्षणी महत्त्वाचे असते. तो विचार, तो प्रसंग परिणामकारक रीतीने मांडणे हे या लघुनिबंधाचे कार्य, तेव्हा यातील प्रत्येक संवादापासून स्थायी रूप अपेक्षिणे म्हणजे लेखकावर अन्याय करण्यासारखे आहे. तरी सुद्धा यातील काही निबंधांना मौलिक रूप आहे. उदा. "छोटचा गंधर्वा "वरील लेख, "गीतरामायणाचा सोहळा", "बालकवींचे वेगळे दर्शन ", "कवि कुसुमाग्रजांकडे ", "दत्तू बांदेकर ", "वेडेकरांचे नाटक ", "टिळक–आगरकर ", "केशवराव कोठावळे ", "बेपर्वा राज्यकर्ते व बेछूट नोकरशाही ", "आगरकरांचे भवितव्य ", "इंदिरा गांधींनंतर हाजी मस्तान ", "धोम नदीच्या पात्रात ", "द्विधा मनस्थिती", "कान्होजी आंग्रे चौल ", "स्त्रियांमधील वाढती गुन्हेगारी " "असे एकेक शिक्षक ", इत्यादी लेखांना तात्पुरते महत्त्व नाही. याहून सुद्धा अधिकही असू शकतील. 'चौफेर 'मधील प्रासंगिक असते खरे, पण लेखकाची नजर " चौफेर " जायला पाहिजे. त्यातील महत्त्वाचे काय ते पटकन् टिपून घेतले, पाहिजे आणि तावडतोब वाचकांपर्यंत ते खुसखुशीत पद्धतीने पोचवायला पाहिजे. माधव गडकरी यात खरोखर निष्णात आहेत. अंतुले, भोसले, दादा–यशवंतराव, गावस्कर, बी. डी. ओ. वेळ काढा, सरपंचालाही वेळ नाही, लोकसभेत चाटवाला, खासदार चोर नाहीत, इ. इ. अशा किती निबंधांची नावे लिहावीत !

अशा या छोटेखानी निबंधात मार्मिकतेबरोबरच खमंग चुरचुरीतपणा यायला पाहिजे, तो गडकऱ्यांच्या लेखणीत भरपूर आहे. "खासदार चोर नाहीत." हा फार खास खुसखुशीत विनोदाचा लेख आहे. खुषवंतशिगांनी ६ ऑगस्ट १९८३ रोजी संसद सदस्यांना चोरांचा समूह म्हटले त्यावद्दल राज्यसभेत त्यांच्या विरुद्ध हक्कभंगच आणण्यात आला. सुदैवाने राज्यसभेचे चेअरमन हिदायतउल्ला होते. त्यांनी तो प्रस्ताव फेटाळून लावला व म्हटले, "खासदार चोर असतील तर तुम्ही खासदार असल्यामुळे चोरच ठरता." ही सगळी चर्चाच मनोरंजक आहे व ती मूळातूनच वाचली पाहिजे. (पृ. १४६–१४७).

दत्तू बांदेकर यांच्यावरील लेखही सुरेख उतरला आहे. दत्तू बांदेकर हे नाव आजच्या पिढीला ठाऊकही नसेल, पण गडकऱ्यांनंतर अद्वितीय प्रतिभेचा विनोदी लेखक कोणी झाला असेल तर तो दत्तू बांदेकर. त्याच्यापुढे अत्रे, चिं. वि. जोशी, बुवा एवढेच नव्हे तर पुलसुद्धा फिके पडतात.

अश्लील न लिहिताही साप्ताहिक उत्कृष्ट चालू शकते हे दाखविण्यासाठी पुण्याहून फडक्यांनी 'झंकार' साप्ताहिक काढले. त्यात विनोदी लेखक श्यामराव ओक लिहीत असत. फडक्यांचे 'झंकार' बुडीतच जायला लागले, त्यावर दत्तू बांदेकरने जी मासलेवाईक कविता लिहिली ती गडकऱ्यांनी उद्धृत केली आहे.

दत्तू बांदेकर अकालीच मृत्यु पावले आणि महाराष्ट्रातील उपरोधिक, क्षणक्षणीत पण हवाहवासा वाटणारा विनोद नाहीसा झाला. यासंबंधी गडकरी फार मार्मिक वाक्य लिहून गेले "विसरलेल्या माणसाची ही गोष्ट." (पृ. १४२)

जुन्या पिढीतील पत्रकार मालतीबाई तेंडुलकर यांच्यावरील लेख, म्हणजे बेछूट नोकरशाही सचोटीने, प्रामाणिकपणे कामे करणाऱ्या माणसाला कसे चिरडून टाकते याचा उत्कृष्ट नमुना आहे.

माधव गडकऱ्यांना नाटक, संगीत यांचाही षोक आहे. छोटचा गंधर्वावरील लेख फार सरस

उतरला आहे. 'गीतरामायण 'चा २५ वा रौप्य महोत्सवी सोहळा पाहायला गडकरी पुण्यास गेले होते. समारंभाच्या आयोजकांना अनेक गोष्टींचे भान कसे नसते त्यामुळे समारंभाचा विचका कसा होतो हे गडकऱ्यांनी खोचदार लिहिले आहे.

" आगरकरांचे भवितव्य " हा लेख म्हणजे आजच्या निर्जीव शिक्षणाचे एक विदारक रूप दाखवितो.

" असे एकेक शिक्षक " या निबंधात तर आणखी भनायक दृश्य आहे. जव्हारमधे एका भागात १५ वर्षे शाळा चालली पण एकही साक्षर झाला नाही. भाई सावंत (महाराष्ट्र सरकारचे राज्यमंत्री) स्वत: सावंतवाडीत शिक्षकच होते. जिल्हा परिषदेत असताना ते एका शाळेजवळ उतरले. त्यांना पाहताच तेथील शिक्षका उडी मारून पळत सुटला, मुल खोखो हसू लागली. भाई सावंत म्हणाले, " मी तिथंच उभा राहिलो. थोडया वेळाने तो धावत गेलेला मास्तर एकाला घेऊन परत आला आणि म्हणाला, 'हा खरा मास्तर म्हणून मी याला घेऊन आलो. तो मला साठ रुपये देतो व मी त्याची नोकरी करतो." बांद्याजवळच्या शाळेत एका शिक्षकाची बदली झाली. तो तिथे रुजू झाला. एक दिवस सावंत तिथे गेले. गावकरी म्हणाले, " आज सहा महिने झाले शाळेला शिक्षक नाही."

अशी पुष्कळशी उदाहरणे (पृ. १५८-१५९) वर दिली आहेत. गडकरी रास्त शब्दात लिहितात, " शिक्षणाची दशा झाली आहे. पिढया गारद होत आहेत."

या सर्वाहून एक छोटासा लेख असा आहे जो वाचकाला दिङ्मूढ करतो, आणि चटका लावून जातो. त्या लेखाने नाव आहे " बालकवीचे वेगळे दर्शन." (पृ. ५७-५८) फुलामुलांचे कवी बालकवी, ज्या बालकवींना बा. सी. मर्ढेकरांनी त्यांच्या अप्रतिम काव्यसौंदर्यासाठी डोक्यावर उचलून घेतले होते, व आपल्या सौंदर्यशास्त्रावरील ग्रंथात बालकवींच्या काही कवितेचे सौंदर्य विश्लेषण करून माधव ज्यूलियन व अनंत काणेकर यांच्या कवितातील दोषस्थळे दाखविली होती, त्या

ग्रं थि की

बालकवीच्या पत्नीच्या, पार्वतीबाई यांच्याशी बालकवीचे वागणे कसे निर्दय, पशुतुल्य है वाचले म्हणजे काव्यजीवन व खाजगी जीवन यात किती दरी असते ते प्रत्ययाला येते! पार्वतीबाईचे १९८२ साली केवळ ८० पृष्ठांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले, ते वाचून मन अस्वस्थ होते. १९१८ साली बालकवींना अपघाती मृत्यू आला व १९८२ साली " मी आणि बालकवी " पुस्तक प्रसिद्ध झाले " हिरवे हिरवे गार गालिचे। हरित तृणाचे मखमालीचे " या अप्रतिम काव्यपंक्ती लिहिणारा कवी आपल्या बायकोला रोज काठीने, वाभळीच्या फोकाने, खोलीत तिला कोंडून व दाराला आतून कडी घालीन पशुसारखे मारीत असे! भरपूर मार दिल्यानंतर बालकवी जाताना बाहेरून कडी घालून जात! एकदा बालकवींना पायातील चपलांनी पार्वतीबाईना मारले. तो सर्व मार त्यांनी सहन केला. हात सुजले-बालकवीचा भाऊ अमृतराव सुद्धा तिला मारीत असे. एक दिवस काही चूक नसताना अमृतरावने पार्वतीबाईच्या (ज्येष्ठ भावाच्या पत्नीला) कमरेत लाथ मारली. बालकवींनी काहीच केले नाही. हे सारे वाचून कसेसेच वाटते.

" चौफेर " पुस्तकातील थोडी वानगी इथे दिली आहे. आपल्या चतुरस्र लेखणीने गडकऱ्यांनी मराठी साहित्यात एक आगळीच भर घातली आहे.

" चौफेर "
लेखक माधव गडकरी
प्रकाशक : श्री विद्या प्रकाशन,
पुणे, २५ सप्टें. १९८८
पृष्ठे २१७, मूल्य : साठ रुपये

रक्तध्रुव / वसन्त वाहोकर

'रक्तध्रुव' ही एक शोकांतिका आहे. ग्रामीण परिसरात–मुस्लिम समाजात घडलेली. ही गोष्ट आहे मायलेकीतली. परंपरा, धर्म, संस्कार ह्या परिघात रुतलेली सईदा आणि तिची पायाळू लेक सलमा. आयुष्यातली परवड आहे–नासधूस आहे. कष्ट दारिद्रय आहे, विकार वासना आहे, असे हे कथाबीज...वाचावेसे वाटते प्रवाही आहे. म्हणूनच लक्ष वेधून घेईल असे हे लेखन आहे. खूपसे हळुवार, खूपसे धक्के देणारे, आणि तरीही सलग असे मनात न उतरणारे, लेखकाचे एकूणच जीवनविषयक अनुभव व आकलन याविषयी साशंक, असे हे लेखन म्हणजे 'रक्तध्रुव' ही रविंद्र शोभणे ह्या लेखकाची कादंबरी.

सुलेमान–सईदा ह्या कष्टकरी मुसलमान जोडप्याची एकुलती–पायाळू जन्मास आलेली, रूपवती कन्या सलमा, आणि तिचे वयात येणे व तेवढ्याने संपूर्ण घराची वाताहत होणे–एवढ्या अल्पजीवी कथाबीजातून हे कथानक वाचकांसमोर उभे राहते, त्यात म्हातारा, धर्म–परंपरा व इमान यांच्याशी जखडून राहिलेला, दादूमियाँ आहे. बाकी याकूब, राशिद, शेरु, शात्री भय्या पवार एवढ्या मर्यादित म्हणजेच सुटसुटीत पात्रांमधून ही कथा वाचकांसमोर विस्तारत जाते, ती वाचावीशी वाटते, पण तरीही मनाची तगमग होत नाही...अस्वस्थ, सुन्न होऊन जावे असा गर्द अनुभव येत नाही, ही या लेखनाची मर्यादा.

'दुसऱ्यानं आपल्या स्वतःच्या आयुष्यातील सुखाचा एखादा तुकडा दातृत्वभावनेनं आपल्याला दान करावा, इतकं आपलं आयुष्य दुःखानं पोखरून निघालं आहे काय ?'

'सईदा आयुष्याच्या या पठारावर उभी राहून स्वतःच्या आयुष्याचं सिंहावलोकन करु लागली होती.'

हे एका उर्मीत लेखकानं लिहून टाकलं खरं पण नंतर नुसती वर्णनांमागून वर्णनं येत जातात. ती म्हणावी तेवढी पकड घेत नाहीत. भाषा सरळ साधी आहे, म्हणूनच ती अलंकारिक होण्याचा कल दिसतो. ही घरसोडही पाहिजे तसा परिणाम साधू शकत नाही.

सुलेमानच्या हातून याकूबचा खून होतो त्यानंतर खरी उलथापालथ सुरू होते...पण ती तशी वरवरचीच राहाते, शेरूच्या मनात भावजयी-विषयी अभिलाषा निर्माण होते...त्याची जाणीव होताच सईदा शेरुला एकदम तोडून टाकते.... प्रखर बोलते किंवा जोगीलाल बरोबर सतत समलिंगी प्रकारातून सुलेमान नपुंसक होतो... अशा सारखे अनेक प्रसंग मनावर, खूण उमटवून ठेवू शकत नाहीत...पटत नाहीत त्या सगळ्या ठिकाणी लेखकाची घाई अनावश्यक वाटते.

आहे त्या सामग्रीतच जरा अधिक कौशल्य व सचोटी वापरून हेच लेखन अधिक परिणामकारी करणे शक्य होते, ते लेखकाला का साधले नाही, हा प्रश्न उभा राहातो.

वातावरणातले...ऋतूमानातले बदल... त्यांच्या नोंदी, तपशीलांचे आलेख, संवादातली सहजता, सभोवतालची सहजस्थिती व तिचे भान, याविषयी लेखक जागरुक आहे. तेवढा संवेदनक्षमही आहे, तरीही ह्या सगळ्यांचा एक सलग, एकसंध परिणाम मात्र 'रक्तध्रुव' देत नाही... ह्याचे वाईट वाटते.

मेहता प्रकाशनाचे हे प्रकाशन. त्याला चंद्रमोहन कुलकर्णी ह्यांची सुसंगत मुखपृष्ट रंग-रचना लाभली, मुद्रणही स्वच्छ व रेखीव झाले... ह्या कादंबरीला उठाव देणाऱ्या तेवढ्यातल्या तेवढ्यात सहज बावी.

विदर्भातून नव्या लेखकांची एक पिढी आता महाराष्ट्राला खुणावत आहे...रविन्द्र शोभणे त्या पिढीत आहेत...त्यांचे अभिनंदन व ह्यानंतर त्यांच्या अधिक सशक्त, परिपक्व, अशा कसदार लेखनाची अपेक्षा. ■

रक्तध्रुव [कादंबरी]
लेखक : रविन्द्र शोभणे
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे
मूल्य ४० रुपये

॥ चर्चा ॥

वाङ्मयीन नियतकालिकांचे अस्तित्व

[संयोजक : दिनकर बेडेकर]

ए-मे-जून ८९ च्या युगवाणीतील थोडया वेगळया, वाङ्मयीन नियतकालिकांच्या अस्तित्वाच्याच प्रश्नाला हात घालणाऱ्या संपादकीयाचे वाङ्मयीन नियतकालिकांच्या जगात फार उत्साहाने स्वागत झाले. या संपादकीयातील या प्रश्नाच्या सर्वांगीण चर्चेने व त्यात सुचविलेल्या उपाय-योजनेने वाङ्मयीन नियतकालिकांच्या अस्तित्वाच्या व वाढीच्या संबंधाने सुरू झालेले हे विचारमंथन या प्रकारच्या नियतकालिकांच्या विकासार्थ आयोजित करण्यात यावयाच्या परिषदेपर्यंत चालावे असा मानस आहे. त्यातून या समस्येच्या विविध बाजू, त्यावरील उपाययोजना, सूचना समोर याव्यात व या विषयाशी संबंधित समस्या फक्त संपादकीय लेखनापुरत्या मर्यादित राहू नयेत तर त्या प्रत्यक्ष कृतीच्या पातळीपर्यंत पोहचवता याव्यात व या नियत-कालिकांच्या अस्तित्वाची कायम सुरक्षा साधणारी काही सोय व्हावी या हेतूनें हा उपक्रम म्हणून हाती घ्यावा असाही मानस आहे.

दिनकर बेडेकर यांनी त्या दृष्टीने युगवाणीतील ए-मे-जून ८९ च्या अंकातील संपादकीयाधारे तयार केलेली एक प्रश्नावली दैनिक वृत्तपत्राच्या संपादकांना पुरवून त्यांची त्यावर मते / उत्तरे मागविली. त्यातून वृत्तपत्रांची या समस्येकडे बघण्याची दृष्टी स्पष्ट व्हावी.

सोबतच विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांचे वाङ्मयीन नियतकालिकांच्या संबंधातील सद्यस्थितीवर असलेले भाष्य देखील टिपणे म्हणून प्रकाशित करीत आहोत. पुढील अंकात या समस्येसंबंधाने काही मान्यवर लेखकांच्या प्रतिक्रिया प्रकाशित करण्यात येतील.

नुकतीच जागतिक मराठी परिषद होऊन गेली. ह्या झगमगाटात मराठी वाङ्मयीन नियतकालिके व त्यांची आजची अवस्था ह्याबद्दलही कुठे काही बोलले लिहिले जाईल असे वाटले होते पण दुर्दैवाने तसे काही कुठे आढळले नाही. एकूण मराठी माणसाचे मराठी 'वेड' हे ठराविक मराठी साहित्य आणि साहित्यिक, मराठी नाटके, चित्रपट आणि भावगीते एवढयापुरतेच उचंबळून येते असे दिसते. अन्यथा नियतकालिकांचा असा विसर पडला नसता. कदाचित् पुढल्या जागतिक मराठी परिषदेपर्यंत मराठी वाङ्मयीन नियतकालिक ही दुर्मिळ, जतन करून ठेवण्यायोग्य आणि फक्त प्रदर्शनात मांडण्याची वस्तू होऊन जाईल आणि मगच त्याला अशा परिषदांमधून स्थान मिळेल की काय अशी शंका वाटावी अशीच ही स्थिती आहे. जागतिक मराठी परिषदेबद्दल इथे तिथे वाचताना हे सतत जाणवत राहिले.

'युगवाणी'च्या एप्रिल–मे–जून '८९ या अंकाचे संपादकीय या पार्श्वभूमीवर तर बरेचसे अस्वस्थ करणारे होते. दरम्यान 'हंस'सारखे साहित्यनिष्ठा आणि निर्मितीप्रक्रियेतील व्यावसायिकता ह्यांचा सुंदर समन्वय साधणारे नियतकालिक बंद केल्यानंतर त्याचे संपादक श्री. आनंद अंतरकर ह्यांची 'ललित'मधील मुलाखत वाचली आणि युगवाणीने पुढाकार घेऊन ह्या प्रश्नाचा संपादक, लेखक आणि वाचक ह्या तिन्ही घटकांचा सहभाग अपेक्षित असलेला एक उपक्रम हाती घेण्याचे ठरवले त्यात सहभागी व्हावेसे वाटले.

त्यातील अगदी पहिला प्रयत्न म्हणून नागपुरातील काही प्रमुख दैनिकांच्या संपादकांची त्यांना आमंत्रित करून एक चर्चा करण्याचा त्यांचे व त्यांचे ह्या विषयावरचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न 'युगवाणी'ने केला. दुर्दैवाने सर्वच निमंत्रित संपादक ह्या चर्चेला उपस्थितच राहू शकले नाहीत. लोकमतच्या संपादकांनी मात्र अग्रलेख लिहूनच हा प्रश्न व युगवाणीच्या संपादकांच्या सूचनांचे समर्थन त्यातून व्यक्त केले.

तोच धागा पकडून पुन्हा एकदा ते काम हाती घेतले आणि संपादकांना प्रत्यक्ष भेटून त्यांचे विचार नोंदवण्याची विनंती केली. चर्चेचा परीघ स्वतःपुरता स्पष्ट करून घेण्यासाठी काही प्रश्न मी स्वतःच उपस्थित केले होते. ते सोबत आहेतच.

ह्या प्रयत्नाचे स्वरूपही तसे मर्यादितच आहे. उपलब्ध वेळात श्री. लक्ष्मणराव जोशी, श्री. कमलाकर धारप आणि श्री. प्रभाकर पुराणिक यांचीच टिपणे तेवढी मी मिळवू शकलो. ह्या तिघांनी मात्र मुद्दाम सवड काढून आपले लेखन दिले, ज्यात त्यांनी त्यांच्या विशिष्ट भूमिकांमधून आपले विचार नोंदवले आहेत.

ह्यावरोबरच विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर ह्यांनाही ह्या विषयावर आपले विचार मांडण्याची विनंती केली होती. त्यांचे प्रखर, वास्तवदर्शी टिपणही इथे समाविष्ट केलेले आहे.

ह्यानंतर काही लेखकांचे आणि वाङ्‌मयीन नियतकालिकांच्या संपादन, प्रकाशन प्रक्रियेशी संबंधितांचे मनोगत जाणून घेण्याचा प्रयत्न आहे. मराठी साहित्यावर प्रेम करणारी ही सर्व मंडळी तत्परतेने सहकार्य करतील असा विश्वासही आहे. 'मायमराठी'ने संपादकीय पुनर्मुद्रित करण्याचे ठरवून आणि श्री. वामन तेलंग यांनी 'दै. तरुण भारत'मधील आपल्या सदरात टिपण लिहूनही उत्स्फूर्त प्रतिसाद दिलेलाच आहे.

खालील काही प्रश्नांवर पुढील चर्चा आधारलेली आहे

मराठीतील वाङ्‌मयीन नियतकालिकांविषयी : काही प्रश्न

१. वाङ्‌मयीन नियतकालिकाची आपली संकल्पना काय आहे ?

२. अशा प्रकारच्या नियतकालिकांची त्या भाषेच्या वाङ्‌मयव्यवहारात आवश्यकता नेमकी कशी असते ?

३. मराठी साहित्याच्या संदर्भात अशा नियतकालिकांचे स्थान आणि आपल्यामते त्यांनी केलेले वैशिष्ट्यपूर्ण कार्य.

४. आपल्याला उल्लेखनीय वाटतात अशा काही नियतकालिकांची नावे, संपादनरीती आणि गुणदोष.

५. मराठी वाङ्‌मयीन नियतकालिकांची सध्याची स्थिती.

६. ह्या परिस्थितीचे आपले विश्लेषण.

७. वाङ्‌मयीन नियतकालिकांप्रमाणेच साहित्य संस्थांची मुखपत्रे, त्यांची वर्तमान अवस्था.

८. ह्या सर्व परिस्थितीची कारणे सांस्कृतिक, सामाजिक की फक्त आर्थिक असावीत ?

९. आपल्यादृष्टीने ह्या परिस्थितीवर मात करणे शक्य आहे काय ? असल्यास कोणत्या उपायांनी ?

१०. वाङ्मयीन नियतकालिकांचे एकापाठोपाठ एक बंद होणे हे मराठी माणसाच्या वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक औदासिन्याचे आणि बधीरतेचे लक्षण आहे असे आपल्यास वाटते काय ?

११. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ + सरकार ह्यांनी एक स्थायी निधी उभारून अशा नियतकालिकांचे आर्थिक प्रश्न तरी सोडवावेत यावर आपली प्रतिक्रिया—

१२. मराठी माणूस आणि मराठी नियतकालिकांचे वाचन ह्यांचे प्रमाण काय असावे असे वाटते ? ह्याबाबतीत आपले निरीक्षण काय आहे ?

१३. ह्या सगळ्या व्यवहारात वृत्तपत्रांच्या रविवारीय आणि इतर पुरवण्या कोणती भूमिका घेतात ?

१४. वृत्तपत्रांनी ह्या प्रश्नाची दखल कशी घेतली आहे ?

१५. वरील सर्व मुद्यांव्यतिरिक्त आणखी काही महत्त्वाचे मुद्दे आपल्याला मांडावेसे वाटतात का ?

स्वतःच स्वयंपूर्ण होणे हाच योग्य मार्ग :

—श्री. लक्ष्मणराव जोशी
संपादक : दै. तरुण भारत, नागपूर

वाङ्मयीन नियतकालिकांच्या सद्यस्थितीकडे 'युगवाणी' च्या संपादकांनी अतिशय गंभीरपण लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असला व त्यांचे प्रतिपादन महत्त्वपूर्ण असले तरी मराठी भाषिकांची संख्या, त्यातील शिक्षितांचे प्रमाण, शिक्षितांमध्येही वाङ्मयात रुची असणारांची संख्या ध्यानात घेतली तर 'युगवाणी 'च्या संपादकांची प्रतिक्रिया गरजेपेक्षा अधिक तीव्र वाटते. एकंदरीत प्रसिद्धी माध्यमांच्या आज ज्या समस्या आहेत त्यापेक्षा वाङ्मयीन नियतकालिकांच्या समस्या खूप वेगळ्या आहेत असे नाही. तरीही दैनिक वृत्तपत्रांना वा त्यांच्या साप्ताहिकांना जाहिरातींचा जो आधार असतो तो वाङ्मयीन नियतकालिकांना नसल्यामुळे त्यांची अवस्था चिंताजनक बनली आहे.

वाङ्मयीन नियतकालिकांची समाजाला आवश्यकता आहे याबद्दल वाद असण्याचे कारण नाही. पण वाङ्मयातील विविध प्रवाहांचे साक्षेपी मूल्यमापन, समीक्षा, त्या प्रवाहांचे प्रकटीकरण, प्रयोगीकरण हे भाग त्यात येणार व त्यात जाणकारांनाच रुची असणार हे उघड आहे.

वाङ्मयीन नियतकालिके चालविणारांचे दोन प्रकार असू शकतात. एका प्रकाराची वाङ्मयीन चळवळीत स्थान प्राप्त करण्यासाठी धडपड सुरू असते तर दुसऱ्या प्रकारच्या लोकांना या चळवळीत काही विशिष्ट योगदान द्यायचे असते. पहिल्या प्रकाराचे हौशी म्हणून तर दुसऱ्या प्रकाराचे ध्येयवादी म्हणून वर्णन करता येईल, त्यापैकी हौशी संचालकांचा समूह त्यांच्या प्रयत्नांना मिळणाऱ्या प्रतिसादाचा वा त्या प्रयत्नातील अर्थकारणाचा फारसा विचार करीत नसतो. कारण त्यांच्या दृष्टीने हौसेला मोल नसते. ध्येयवादी मंडळी मात्र एकीकडे अर्थकारणामुळे त्रस्त होतात तर दुसरीकडे त्यांनी अपेक्षिलेला प्रतिसाद न मिळाल्यानेही निराश होतात, नाराज होतात. 'युगवाणी 'च्या संपादकांचा समावेश मी या ध्येयवादी गटात करीन.

अर्थात वाङ्मयीन चळवळीत विशिष्ट योगदान देण्याचे ध्येय निश्चित केल्यानंतर अशा मंडळींना निराश होण्याचा अधिकार राहत नाही. आपण निश्चित केलेल्या ध्येयाचे मूल्य चुकविणे एवढेच त्यांच्या हातात उरते व त्यांनी ते मूल्य चुकविले पाहिजे असे मला वाटते. याचा अर्थ नियतकालिकांच्या आर्थिक बाजूकडे दुर्लक्ष करावे असा नाही. या नियतकालिकांचे कार्य हे वाङ्मयीन

चळवळीच्या विकासातील फार मोठे योगदान ठरते. अन्यथा 'सत्यकथा' बंद पडल्यानंतर वृत्तपत्रांनी त्यावर अग्रलेख लिहिलेच नसते.

वरील पार्श्वभूमीवर विचार केला तर वाङ्मयीन नियत्कालिकांचा खप वा लोकप्रियता हा मराठी माणसाच्या वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक औदासिन्याचा वा बधीरतेचा मापदंड ठरू शकत नाही. कारण मराठी माणूस ही खूप व्यापक संकल्पना आहे. त्यात वाङ्मयीन नियतकालिकांचा आस्वाद घेणारे फार थोडे आहेत. व हे थोडे लोक देखील त्यांची क्षमता (वैचारिक व आर्थिक) असताना सुद्धा जेव्हा वाङ्मयीन नियतकालिकांची उपेक्षा करतात तेव्हा तो निश्चितच चिंतेचा विषय ठरतो. 'युगवाणी'चे संपादक याच स्थितीमुळे जर चिंतित झाले असतील तर त्यांची चिंता विचार करण्यासारखीच ठरते.

अर्थात या स्थितीतून मार्ग काढण्यासाठी सरकार वा साहित्य संस्कृतीमंडळ यांच्याकडून पूर्णपणे अनुदान घेणे मात्र मुळीही श्रेयस्कर ठरणार नाही. कारण त्यामुळे अनुदानाच्या पाठोपाठ येणारी दडपणे वाङ्मयीन नियत्कालिकांना येतील व त्याचा त्यांच्या मूळ उद्दिष्टावरच विपरीत परिणाम होईल. ही नियतकालिके एकवेळ अनियतकालिके झाली तरी चालतील पण त्यांनी अनुदानाचा स्वीकार मात्र करायला नको. तरीही दिले जाणारे आंशिक अनुदान स्वीकारायला मात्र हरकत नाही. एवढेच नव्हे तर महागाईच्या प्रमाणात त्यात वाढही व्हायला हवी. पण ही नियतकालिके स्वतःच्या बळावर आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण होणे हाच योग्य मार्ग आहे.

वृत्तपत्रांच्या रविवारच्या पुरवण्या या बाबतीत काही प्रमाणात मदत जरूर करू शकतात. किंबहुना 'तरुण भारत'ने आपल्या रविवार पुरवणीमधून एकदा प्रकाशन व्यवसायाच्या समस्यांकडे विस्ताराने लक्ष वेधले होते. असाच प्रकार वाङ्मयीन नियतकालिकांच्या बाबतीतही पुन्हा होऊ शकतो.

स्थायी निधी उभारून त्यांच्या व्याजातून ही नियतकालिके चालू रहावीत :

—श्री. कमलाकर धारप
वृत्तसंपादक, लोकमत

वाङ्मयीन नियतकालिके वाङ्मयीन विषयास वाहिलेली असावीत. कथा, कविता, ललित गद्य, वाङ्मयीन टिपणे, वाङ्मयविषयक नवे विचार, चांगल्या ग्रंथांची चांगली समीक्षा आदींचा समावेश अशा नियतकालिकात हवा. वाचकांच्या वाङ्मयविषयक जाणीवा प्रगल्भ व्हाव्यात हा हेतू या नियतकालिकाच्या प्रकाशनाभागे असावा व त्यासाठीच वाङ्मयव्यवहारात अशी नियतकालिके आवश्यक असतात. ही नियतकालिके लेखकांना जशी प्रेरणा देतात तशीच वाचकांनाही वाङ्मयोन्मुख करतात.

मराठी साहित्याच्या विश्वात अशा नियतकालिकांनी बजावलेली कामगिरी निश्चितच मोलाची आहे. छंद, दिशा, सत्यकथा, अभिरुची आदि नियतकालिकांचे अंक न्याहाळले तरी त्या नियतकालिकातून समोर आलेले लेखक; कवि, समीक्षक यांची नावे भरभर नजरेसमोरून सरकू लागतात. वृत्तपत्रातून जे विषय हाताळले जातात त्याचे स्वरूप सर्वसामान्य वाचकासाठी असते. पण वाङ्मयीन नियतकालिकांचा वाचक हा मुळातच प्रगल्भ असतो. त्याची प्रगल्भता जोपासण्याचे काम ही नियतकालिके करतात. या नियतकालिकांचे संपादक चोखंदळ होते आणि विभिन्न भाषातून सुरू असलेल्या

प्रयोगांची त्यांची जाणीव समग्र व सखोल होती म्हणूनच नवकथा, नवकविता, आदि प्रकारे वाङ्मयात रूढ होऊ शकले. नियतकालिकांच्या साहित्यपुरवण्यांना हे काम साध्य झाले नसते.

आज वाङ्मयीन नियतकालिके जवळजवळ अस्तित्वातच नाहीत. साहित्य संघांची त्रैमासिक नियतकालिके हीच काय ती ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याचे मुख्य कारण आर्थिक आहे. वास्तविक मराठी विषयात एम. ए. झालेले व मराठीचे प्राध्यापक यांनी मनात आणले तर एका वाङ्मयीन नियतकालिकेचे पालनपोषण सहज करता येऊ शकेल. पण गंभीर वाचनाची नावड, अभ्यासपूर्वक लेखन करण्याचा कंटाळा, या गोष्टी वाङ्मयीन नियतकालिकांच्या ऱ्हासास कारणीभूत ठरल्या असून त्यात बदल होत नाही तोपर्यंत वाङ्मयीन नियतकालिके ही आर्थिक दृष्टचा परवडणारी नाहीत हेही खरेच. पण ही परिस्थिती जाणीवपूर्वक प्रयत्न केले तर पालटता येईल.

सत्यकथेने वाङ्मयाभिरुची घडविण्याचे कार्य केले. तसेच कार्य कोणत्याही वाङ्मयीन नियतकालिकांचे सातत्यपूर्ण प्रकाशन करून साध्य होऊ शकते. पण त्यासाठी सातत्य हवे, तसेच मराठी माणसाला वैचारिकदृष्टचा जागरूक करावयाचे प्रयत्न हवेत. वाङ्मयीन नियतकालिके बंद होणे हे सांस्कृतिक ऱ्हासास कारणीभूत ठरु शकते तेव्हा ही नियतकालिके चालू रहावीत यासाठी प्रयत्न करणे जरूरीचे आहे. त्यासाठी सरकारी अनुदान हेच उत्तर आहे. कागदाच्या वाढत्या किंमती; छपाईचे वाढते दर यामुळे वाङ्मयीन नियतकालिके वाचकांच्या खिशाला परवडत नाहीत, असे म्हणणे धाष्टर्याचे ठरेल. हिंदी चित्रपट पाहण्यासाठी महिन्याकाठी ४०–५० रुपये खर्च करणाऱ्या मराठी माणसाने मराठी वाङ्मयीन नियतकालिके विकत घेण्यासाठी ७–८ रुपये खर्च करण्याची तयारी ठेवायला हवी. त्याच्या स्वतःच्या अभिरुचीवृद्धीसाठी हा खर्च आवश्यक समजायला हवा.

'युगवाणी'च्या संपादकीयात स्थायी निधी उभारून वाङ्मयीन नियतकालिकांचे प्रकाशन सुरू ठेवण्याचा जो विचार मांडण्यात आला आहे तो निश्चितच व्यवहार्य आहे. कला-वाङ्मय यांच्या अभिवृद्धीसाठी, शासन बरीच रक्कम खर्च करीत असते. वाङ्मयीन नियतकालिकांची निर्मिती सुरू रहावी यासाठी स्थायी निधी उभारून त्यांच्या व्याजातून ही नियतकालिके चालू रहावीत असा प्रयत्न सहज करता येईल. दरवर्षी काही रक्कम देण्याऐवजी अशा निधीची निर्मिती अधिक स्थायी स्वरूपाची ठरेल. तेव्हा हा विचार प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न व्हायला हवा.

मराठी माणूसच काय पण एकूणच वाचनाचे प्रमाण कमी होत चालले आहे. त्यामुळे वैचारिक प्रगल्भतेचाही ऱ्हास होतोय. माणसाची चिंतन करण्याची शक्ती घटते आहे. त्यामुळे बुद्धीला त्रास होईल असे कोणतेही आव्हान माणूस स्वीकारीनासा झाला आहे. ही स्थिती बदलण्यासाठी त्याला वाचनोन्मुख करण्याचे प्रयत्न करायला हवेत. दैनिक अंकाचे वाचन माणूस नियमाने करीत असतो, तेव्हा दैनिकांनीही माणूस विचारशील होण्याच्या प्रक्रियेला चालना द्यायला हवी.

दैनिकांच्या रविवारच्या पुरवण्या या वाचकाचे मनोरंजन करण्यावरच भर देताना दिसतात. त्यात वैचारिकतेवरही भर द्यायला हवा. सर्वच दैनिकांच्या रविवारच्या पुरवण्यांनी ही दृष्टी ठेवली तर मग वैचारिक वाङ्मय देण्याचीही स्पर्धा लागू शकेल.

वाङ्मयीन नियतकालिकांची निर्मिती बंद पडण्यामागे व्यावसायिक कारणे होती. आर्थिक पाठबळ नसल्याने ही नियतकालिके बंद पडली. पण त्यामुळे त्यांची आवश्यकताच नव्हती असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल. वाङ्मयीन नियतकालिके ही सामाजिक गरज आहे व त्यामुळे ही नियतकालिके मराठी माणसाला कशी देता येतील यावर होणारे कोणतेही चिंतन हे या नियतकालिकांच्या निर्मितीसाठी उपयोगी ठरेल. ■

वाङ्मयीन नियतकालिकांनी व्यावसायिकता पत्करणे अजिबात गैर नाही :

—प्रभाकर पुराणिक
वृत्तसंपादक / नागपूर पत्रिका

वाङ्मयीन नियतकालिके वाङ्मय प्रवाहांची नोंद घेणारी व वाङ्मयातील जुन्या प्रकारांचे संशोधन करणारी असावीत. त्यांची वाङ्मयीन व्यवहारात आवश्यकता ही नवीन लेखक–लेखिकांचा शोध घेणे, प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची माहिती वाचकापर्यंत पोचवणे हे आहे. आजच्या Corporate World मध्ये वाङ्मयाचे व्यवहारीकरण कार्य देखील अशा नियतकालिकांनी केले पाहिजे. व्यवहारीकरण म्हणजे 'बाजारूपणा' नव्हे.

मराठी वाङ्मयाच्या संदर्भात अशा नियतकालिकांनी चांगले कार्य केले आहे. परंतु अशा प्रकारच्या नियतकालिकांचे लवकरच 'पीठ' तयार केले जाते. वाङ्मयाचे 'मठ' तयार होतात. हे फार अनैसर्गिक आहे.

उल्लेखनीय नियतकालिकांमध्ये 'युगवाणी', 'प्रतिष्ठान', 'अस्मितादर्श' यांचे संपादन आपआपल्या परीने उत्तमच आहे. दोषांची चर्चा करण्यात आपण फार वेळ घालवतो. ज्यांना प्रत्यक्ष काही करायचे नसते, ते दोषांची जास्त चर्चा करीत असतात.

मराठी वाङ्मयीन नियतकालिकांची सध्याची स्थिती फारशी उत्साहजनक नाही. पण निराश होण्याचे काहीच कारण नाही. अशा नियतकालिकांनी लेखक आणि वाङ्मय–रसिकांच्या मनात स्वतःची गरज निर्माण करणे आवश्यक आहे.

आज लिहिले एक जाते आहे व या नियतकालिकांतून चर्चा फार वेगळ्या प्रवाहाची होते. त्यामुळे अशी नियतकालिके वाचलीच पाहिजेत अशी लेखक/समीक्षक यांना गरज वाटत नाही.

वाङ्मयीन सोवळेपणा पाळला जातो. अभिजातपणाचे शिक्के लावले जातात. हे चूक आहे, आष्टीकर, (मधुकर नव्हे) चिन्तामणी लागू अशा लेखकांचीसुद्धा त्यात नोंद घेतली गेलीच पाहिजे. त्यांचीही गंभीर व परिणामांची चर्चा होणे आवश्यक आहे.

साहित्य संस्थांची मुखपत्रे आर्थिक चक्रात सापडली आहेत. पण हे आर्थिक कारण क्षणात दूर होऊ शकते. सांस्कृतिक व सामाजिक कारणे आहेतच. आपल्याला ज्या संस्कृतीचे दर्शन घडवायचे आहे ती संस्कृती नेमकी कोणती आणि तो समाज कोणता, याचा निर्णय ही नियतकालिके घेऊ शकली नाहीत. इतकेच नव्हे तर सांस्कृतिक आणि सामाजिक बदलाचा नीट वेध ते घेऊ शकले नाहीत.

या परिस्थितीवर निश्चितच मात करता येऊ शकते. नियतकालिकांनी स्वतःचे आर्थिक स्वातंत्र्य मिळवले पाहिजे. सांस्कृतिक, सामाजिक आणि वाङ्मयीन चळवळीचा व्यापक दृष्टिकोन असणारा संपादक या नियतकालिकांना आवश्यकच आहे.

वाङ्मयीन नियतकालिकांचे लागोपाठ बंद होणे हे कुठल्याही औदासिन्याचे असे लक्षण नाही. जी नियतकालिके बंद झाली त्यांची सांस्कृतिक/सामाजिक/वाङ्मयीन गरज संपली म्हणूनच ती बंद झालीत. ती त्याच लायकीचीच होती असे आपण म्हणू शकतो. ती काळा बरोबर चालू शकली नाहीत.

ए–मे–जून '८९ च्या 'युगवाणी'च्या अंकातील संपादकीय या संदर्भात यथोचितच आहे. त्या लेखातील विचारांना मी पाठिंबा देतो. परंतु महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती व मंडळ सरकार यांच्या नादी लागण्यात मात्र अजिबात अर्थ नाही असे वाटते. 'युगवाणी'सारख्या चांगल्या नियतकालिकाने आता यापुढे अनुदानशरण राहून चालणार नाही. आज एकूण वाङ्मयीन अभिरुचीचे वातावरण कमी

पडते आहे. मराठी पंडित मंडळी व मराठी वाङ्मय अभ्यासक रसिक यांच्यात फार मोठी दरी निर्माण झाली आहे. ती दूर होऊ शकली तर मराठी नियतकालिकांचे वाचन अधिक वाढेल.

आमच्या वऱ्हाडातील वाङ्मयीन नियतकालिकांना देशीय अथवा प्रादेशिक स्वरूप प्राप्त झाले तरी हरकत नाही. किंबहुना ते झालेच पाहिजे. त्याशिवाय आपलेपणा निर्माण होणार नाही.

वाङ्मयसमीक्षा अथवा वाङ्मयव्यवहार याबाबत आता साहित्यिक वा समीक्षकांनी वृत्तपत्रांकडून जास्त अपेक्षा बाळगू नये. याचे कारण आता मराठी दैनिकांचे रविवारीय किंवा पुरवण्यांचे स्वरूप पार बदलले आहे. ते काळाच्या गरजेनुसार बदलले आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत मराठी साहित्य; मराठी साहित्य संमेलन वगैरे हे वर्तमानपत्रांसाठी एक मोठी घटना होती. आता त्यापेक्षा मोठ्या व व्यापक घटना आजूबाजूला घडत आहेत. समाजजीवन एखाद्या झंझावातासारखे वाहते आहे. तेव्हा मराठी दैनिके लोकजीवनाचा वेध घेण्यात जास्त गुंतली आहेत. त्यामुळे साहित्य आणि साहित्यव्यवहाराची इतक्या तपशिलवार नोंद घेत राहणे दैनिकांना शक्य नाही.

मराठी वाङ्मयीन नियतकालिकांनी आर्थिक दृष्टीने स्वयंपूर्ण होणे आवश्यक आहे. ही नियतकालिके संपूर्णतः व्यापारी / व्यावसायिक वळणाने चालवली गेली तर नक्कीच यशस्वी होतील. सरकारजवळ तोंड वेंगाडण्यापेक्षा व्यापाऱ्यांशी दोस्ती करणे साहित्यविषयक नियतकालिकांना सोपे जाईल. सरकारी लहरी आणि दडपणे यापेक्षा व्यापारी / औद्योगिक / व्यावसायिकांच्या गरजा खूपच लहान असतात.

सरकारसुद्धा आता उद्योगांच्या खाजगीकरणाकडे वळते आहे. मराठी वाङ्मयीन नियतकालिकांनी ते चालविण्यासाठी व्यावसायिकता पत्करणे अजिबात गैर नाही.

'युगवाणी 'सारख्या दर्जेदार वाङ्मयीन नियतकालिकाने शुद्ध व्यावसायिक पद्धतीने काम करावे. त्यामुळे आर्थिक अडचण दूर होईल व कुणापुढे हात पसरावा लागणार नाही. वाङ्मयप्रसाराचे क्षेत्र वाढेल. वऱ्हाडात वाङ्मयीन वातावरण रुजवण्यास सहाय्य होईल. ■

वाङ्मयीन नियतकालिके : तमोयुगाच्या बोगद्यातून प्रवास

: प्रा. राम शेवाळकर

सत्यकथा, हंस, मागोवा, 'माणूस' या सर्व वाचकप्रिय मासिकांचे अपमृत्यू विषण्ण करणारे आहेत. किर्लोस्कर मासिकाचे हस्तांतरण व त्याचे सध्याचे स्वरूप लक्षात घेता दीर्घायुषी प्रयत्नांनाही आता हताश होण्याची पाळी आली आहे, असे म्हणावे लागते. 'मौज' साप्ताहिक बंद करण्याचा संचालकांनी अकल्पित निर्णय घेतला. त्याने विचारक्षेत्रात सुन्न अवस्था उत्पन्न झाली होती. 'किर्लोस्कर' मासिकाच्या हस्तांतरणाने याच अनुभवाची पुनरावृत्ती झाली. दीर्घकाल प्रेमाचे ऋणानुबंध रुजलेल्या वाचकांना विश्वासात न घेता अचानक एकतर्फी निर्णय घेण्याची पाळी संचालकावर एकाएकी आलेली नसणार, आयुष्यभराची अभिरुचीसंपन्न सोबत सोडणे त्यांनाही क्लेशकारक झाले असणार. हे सर्व सुखासुखी झाले नसणार हे आपल्या सहज लक्षात यावे. परंतु त्यांच्याही अडचणी व त्यांचेही प्रश्न हे वेळीच लक्षात घेतले असते तर हे अपमृत्यू कदाचित आपल्याला टाळता आले असते

आकाशवाणी व प्रकाशवाणी, दैनिकांच्या रविवार–आवृत्त्या यांचा पसारा व लोकप्रियता यामुळेही अशा नियतकालिकांची निकड उणावल्यासारखे झाले असेल, या तिन्ही माध्यमांचे आवाहन

अधिक व्यापक, अधिक तात्काल व अधिक आकर्षक असल्याने त्याकडे प्रतिभावंतांचा व रसिकांचाही ओढा अधिक राहाणार. तातडीने भेडसावणारा दुसरा प्रश्न महागाईचा आहे. कागद व मुद्रण यांचे वाढते दर याचे उत्पन्नाशी असणारे प्रमाण व्यस्त आहे, कुठलेही नियतकालिक केवळ वाचकांच्या वा वर्गणीदारांच्या विश्वासावर प्रकाशित होऊ शकेल पण विकसित होऊ शकणार नाही, टिकावही धरू शकणार नाही. त्याला आवश्यक असणारे आर्थिक पाठबळ वाचकांच्या उदंड प्रेमातून उभे करण्या-इतका दिलासा तूर्त तरी असंभव आहे. जाहिरातदारांना त्यांच्या उत्पादनाचे विज्ञापन अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याची हमी देणाऱ्या नियतकालिकांतच देणे किफायतीचे आहे. अशा नियतकालिकांचा ग्राहकवर्ग मर्यादित असतो.

लालित्यप्रधान असणाऱ्या सुखद नियतकालिकांचीच ही दशा तर निखळ वाङ्मयीन स्वरूपाची प्रतिज्ञा केलेल्या नियतकालिकांबद्दल बोलायलाच नको. एकतर आधीपासूनच ही नियतकालिके एका निष्ठेपोटी, ध्येयदृष्टीपोटी, जाणकार ऐपतवानांकडून चालविली जातात. एखादा हरिभाऊ मोटे वा पु. आ. चित्रे हे अशा क्षेत्रात इतिहास घडवितात. पण स्वतःचा वर्तमानही हरवून बसतात. लक्ष्मी-पुत्रांना अनेक अनिष्ट व्यसने असणे आपण आता स्वाभाविक व समर्थनीय मानीत आलो आहोत. आर्थिक परिस्थिती असलेल्या मोटे-चित्र्यांचे वाङ्मयीन नियतकालिकांचे हे व्यसन मराठी साहित्याला लाभदायक ठरले तरी व्यक्तिशः त्या दोघांनाही ऐहिक दृष्ट्या हानीकारक गेले.

'अभिरुची', 'मौज', 'सत्यकथा', 'छंद', 'हंस', 'माणूस', 'रहस्यरंजन', आरंभीचे 'वसुधा' या नियतकालिकांचा अस्त उद्विग्नतेबरोबरच अंतर्मुखतेलाही प्रेरक ठरणे आवश्यक आहे. अशी नियतकालिके काढणे, चालवणे, टिकवणे हा एखाद्या वाङ्मयवेड्या संपादकाच्या ऐपतीचा, शौकाचा, उत्साहाचा वा चिकाटीचा भाग नसून वाचकांच्याही अर्थपूर्ण प्रतिसादाचा व तळमळीचा भाग असायला हवा. अशी मासिके सुरू होताना समाधान व बंद पडल्यावर हळहळ व्यक्त करणे या व्यतिरिक्तही काही भरघोस भूमिका व डोळस उत्तरदायित्व पत्करणे मराठी माणसाला निकडीचे वाटले पाहिजे. अशा प्रयत्नांचे पाठीराखे लेखक, वाचक व कदर करणारे केव्हाही अल्पसंख्यच राहणार, पण असे प्रयत्न हे त्या त्या संस्कृतीच्या सर्वांगीण आरोग्याचे संरक्षक असतात. त्या दृष्टीने प्रतिसादाभावी वा आर्थिक कारणाच्या सबबीवर अकाली अंत ओढवण्याची वेळ येऊ न देण्याची काळजी या अल्पसंख्यांकांनी घेतली पाहिजे. समाजात कलावंत अल्पसंख्यच असतात. आपल्या कलेच्या घाऊक प्रदर्शनाखेरीज त्यांच्याजवळ सामान्यपणे निर्वाहाचे कोणतेही प्रतिष्ठित साधन नसते. तरीपण त्यांच्याबद्दलची कृतज्ञता समाजाच्या ठायी जिवंत असल्यामुळेच ते निर्वेधपणे आयुष्याची वाटचाल करू शकतात. त्यांनी आपल्या कलेतून ओवलेल्या लोकोत्तर आनंदाच्या चाऱ्यावर समाजाचा सांस्कृतिक पिंड पोसला जातो. त्यामुळे आनंदाचे हे विविध स्रोत अखंड टिकून राहावेत ही दक्षता घेणे समाजाला आपले कर्तव्य वाटते. साहित्याच्या बाबतीत असे का होऊ नये ?

युगवाणीसारखी जी साहित्य संस्थांची मुखपत्रे आहेत, त्यांच्या समोरचे प्रश्न अजून वेगळे आहेत. ही मुखपत्रे त्या त्या संस्थांच्या सांस्कृतिक स्पंदनाचे वाङ्मयीन दस्तऐवज म्हणून अभ्यासकांना उपयुक्त ठरतात. त्या त्या प्रदेशातील व सांस्कृतिक व कला क्षेत्रातील स्थिति-गती व विविधप्रवाह याची नोंद त्यांच्या पानांवरच्या विविध लेखन प्रकारातून चिरस्थायी होण्याची आशा असते. त्या प्रदेशातल्या वाङ्मयीन वातावरणाचे प्रतिबिंब त्यात आपल्याला आढळते व त्या समाजाच्या सांस्कृतिक आरोग्याची कांती अशा प्रयत्नांवर तळपत असते. विविध वाङ्मयीन उपक्रम हे तात्कालिक व स्मृतिशेष असतात. तर असे नियतकालिक त्या साहित्यसंस्थेच्या सर्वस्पर्शी निर्मितीचे, अभिरुचीचे व अभिक्रमांचे प्रतिनिधित्व दीर्घकाळ करीत असते. त्या परिसरातल्या प्रतिष्ठाप्राप्त प्रतिभेशी अनुबंध सातत्याने राखून नव्या आशाळू अंकुरांना उजेड दाखविण्याचे भानही त्याला ठेवावे लागते. त्यामुळे साहित्यसंस्थेच्या विविध वाङ्मयीन उपक्रमांमध्ये असे नियतकालिक हा अत्यावश्यक उत्तरदायित्वाचा

अनुक्रमणिका

भाग ठरतो. त्याचा व्यावहारिक प्रपंच पाहणेही उद्बोधक ठरेल. मासिक, द्वैमासिक, त्रैमासिक अशी वाटचाल युगवाणीला उत्साह, लेखनसाह्य व ऐपत यांच्या असहकारामुळे करावी लागली. आज युगवाणीचे वर्षातून चार अंक निघतात. त्याचा वार्षिक अर्थसंकल्प सव्वा लाखाच्या घरात येतो. विदर्भ साहित्य संघाच्या घटनेतील आश्वासनानुसार प्रत्येक सभासद हा युगवाणीचा हक्कदार असतो. नव्या राजवटीत स्वीकारलेल्या नवीन धोरणामुळे सभासदांची संख्या अभूतपूर्व प्रमाणात वाढली. ती त्या सर्वांना हक्काने युगवाणी मिळण्याच्या आशेमुळे. अंकांची संख्याही वाढवणे क्रमप्राप्त होते. त्या प्रमाणात खर्च वाढणेही ओघानेच आले. सभासदाच्या पूर्वीच्या दहा व आत्ताच्या पंधरा रुपये वार्षिक वर्गणीतून काही भाग अंशदान म्हणून त्या त्या शाखेच्या जीविकेसाठी परत द्यावा लागतो. उरलेल्या रकमेतून वर्षभराचे सांस्कृतिक व वाङ्मयीन उपक्रम चालवावे लागतात. यामध्ये युग-वाणीच्या वाटचाला अर्थातच अल्प रक्कम येणार. साहित्य संस्कृती मंडळाचे वार्षिक अनुदान बाराहजार रुपयांचे. उत्पन्नाची बाजू अशी ओशाळवाणी व खर्चाची बाजू उत्तरोत्तर भरभराटीची. या गणितातून वांछित उत्तरे काढण्याच्या धडपडीत विदर्भ साहित्य संघाची तारांबळ उडत असल्यास नवल नाही.

ही एकट्या युगवाणीचीच कथा नाही. सर्वच साहित्य संस्थांच्या नियतकालिकांची व कमी-अधिक प्रमाणात वाङ्मयीन नियतकालिकांची कहाणी यापेक्षा वेगळी नाही. बहुतेक साहित्य संस्थांच्या नियतकालिकांमध्ये अनियमितपणा, विस्कळीतपणा व अशक्तपणा हे बळावत गेलेले जीर्ण रोग आहेत. आस्थेवाईक वाचक, समाजाच्या सर्वांगीण, सांस्कृतिक उन्नयनाबद्दल जागरूक असणारे धनवंत व कल्याणकारी राज्याचे आश्वासन देणारे शासन या तिन्ही घटकांनी आत्मपरीक्षणपूर्वक आपली जबाबदारी ओळखणे निकडीचे झाले आहे.

समाजाला शिताची, सुताची व छताची प्राथमिक गरज भागल्यावर लक्षात येणाऱ्या सांस्कृतिक भुकांच्या शमनाचीही सोय हवी. त्यासाठी विविध ज्ञानशाखांची व्यवस्था असणारी विद्यालये व विद्यापीठे, आरोग्याची काळजी घेणारी इस्पितळे, अतिरिक्त ऊर्जेच्या शांतीसाठी क्रीडांगणे व मनः-शांतीसाठी रंजनकेंद्रे समाजामध्ये जशी व जितकी आवश्यक आहेत, त्यापेक्षा सांकृतिक व वाङ्मयीन प्रयत्नांची गरज अणुमात्र कमी नाही. प्रत्येक विकसनशील समाजाचे ते अविभाज्य अंग आहे व त्याचे पर्याप्त पोषण करणे हे समाजाचे व सत्तेचे कर्तव्य आहे.

विदर्भामध्ये एकेकाळी 'वागीश्वरी', 'विहंगम', 'संदर्भ', 'उन्मेष', 'सुषमा,' सारखे अभिमानास्पद प्रयत्न झाले. 'सावधान', 'आदेश', 'भवितव्य', 'राष्ट्रतेज', (वर्णेकरांचे) 'समाधान' व 'मराठी जग' 'मासेप' 'किरण' यासारखे लोकप्रिय साप्ताहिकांचेही प्रयत्न झाले. त्यानंतर झालेल्या अल्पजीवी प्रयत्नांमध्ये 'अरुंधती'चा प्रयत्न त्यातल्यात्यात लक्षणीय होता. हे प्रयत्न या ना त्या कारणाने विझून गेल्यावर वाढलेल्या काळोखात 'युगवाणी' बरोबरच 'समुचित' व 'अक्षर वैदर्भी' हे लुकलुकणारे प्रयत्न आपल्यापरीने व आपल्यापुरता काळोख निवळण्याचा आटापिटा करीत आहेत. वीणा, ठाकूर आणि कंपनी, नागपूर प्रकाशन, महाराष्ट्र, नागविदर्भ, अमेय या प्रकाशन–संस्थांमध्ये नागपूर प्रकाशन तेवढी चिवटपणाने टिकून आहे. एकूणच क्रमिकेतर नियत-कालिके व प्रकाशने याबाबत विदर्भाचा तमोयुगाच्या बोगद्यातून प्रवास चालू आहे. ■

वाचकांनी चर्चेकरिता उपस्थित व या चर्चेत सुरुवातीस प्रकाशित प्रश्नावलीतील प्रश्नांच्या उत्तरात संक्षिप्त प्रतिक्रिया पाठवून सहकार्य करावे. काही सर्वोत्कृष्ट संक्षिप्त प्रतिक्रिया या उपक्रमातील वाचकांचा सहभाग म्हणून प्रकाशित करण्यात येतील.

वा | च | की | य

एप्रिल–मे–जून १९८९ च्या युगवाणीतील संपादकीय वाचले. वाङ्मयीन नियतकालिकांच्या उदरनिर्वाहाची समस्या किती गंभीर रूप धारण करणारी आहे, याची माझ्याप्रमाणेच प्रत्येक वाचकाची खात्री करून देण्यास हे संपादकीय पुरेसे बोलके आहे. कोण्याही वाङ्मयप्रेमीस ते क्षणकाल सुन्न करून जाईल. सर्व बाजूंनी टाकलेला प्रकाशझोत सुजाण वाचकाला अंतर्मुख करून जाणारा आहे.

वाङ्मयीन नियतकालिकांच्या उदरनिर्वाहाची समस्या ही काही आजचीच नाही; ती तशी अनादी आहे; नि म्हणूनच त्यासाठी आताच काही एवढी उरफोड करण्याची आवश्यकता नाही, असे म्हणणारे भलेही म्हणोत; पण म्हणून काही संवेदनाहीन मनाने या तग धरून राहिलेल्या वाङ्मयीन नियतकालिकांच्या सद्य:स्थितीस संवेदनाहीन पाठमोरे व्हावे असे नाही. उलट ज्या परिस्थितीने या वाङ्मयीन नियतकालिकांना इतके अगतिक करून सोडले आहे त्या सर्व बाजूंचा अत्यंत परखड शब्दात समाचार घेणे हेच सद्य:स्थितीला धरून होईल. वाङ्मयीन नियतकालिकांच्या उदरनिर्वाहाची ही समस्या वि. सा. संघाचे कार्याध्यक्ष वामन तेलंग म्हणतात, (१७–९–१९८९ : तरुण भारत) त्याप्रमाणे आफ्रिकेतील बालकांच्या कुपोषणाच्या समस्येइतकी जरी सर्वांच्या हृदयाला जाऊन भिडणारी नसली तरी मराठी वाङ्मयप्रेमींच्या हृदयाला जाऊन भिडणारी तर निश्चितच आहे. संपादक म्हणतात त्याप्रमाणे ही नियतकालिके जिवंत ठेवण्याचे काम काही फक्त एकट्या–दुकट्याचे नाही. तर ती संपूर्ण समाजाचीच बांधीलकी ठरते. यानिमित्ताने कोणाकोणाकडून काय–काय अपेक्षा आहेत, त्याही त्यांनी इथे व्यक्त करून टाकल्यात, हेही फार बरे झाले. शासन, स्थानिक शासन, शासनाच्या स्वायत्त संस्था, स्थानिक स्वराज्य शासन संस्था यांना जर आपल्या नवीन शैक्षणिक धोरणाबद्दलची खरोखरच खरी खरी आस्था असेल तर समाजाची अशी उच्च अभिरुची जपणाऱ्या अशा वाङ्मयीन नियतकालिकांसाठी आवश्यक ती तरतूद करण्याचे धोरण स्वीकारल्याशिवाय या संस्थांना गत्यंतरच नाही; याचे भान संपादकांनी इथे करून दिले आहे. प्रादेशिक साहित्य संस्थांनाही त्यांनी जी समज दिली, तीही याच जाणिवेतून दिली. प्रादेशिक साहित्य संस्था; कला–चळवळी, त्यांची नियतकालिके यांचे नागरी जीवनातील साऱ्या निमशासकीय–शासकीय; स्थानिक स्वराज्य व सार्वजनिक संस्था काही देणे लागतात का ? याचाही विचार करायला संपादक इथे आपल्याला भाग पाडतात. तसेच मराठीच्या विकासाची भाषा बोलणाऱ्या राजकीय पक्षांना व पुरोगामी शासनाला देखील त्यांनी यासाठी केलेले आव्हान फुसके जाऊ नये असे वाटते. कारण जिथे हे नियतकालिक प्रसिद्ध करण्यास वार्षिक खर्च पाऊण लाखाच्या घरात जातो तिथे शासनाकडून मिळणारे जेमतेम बारा हजार कसे पुरे पडणार ? मात्र समाजातील संबंधित स्तरांकडून संपादकांनी केलेल्या अपेक्षा आज अत्यंत उदात्त; आदर्श नि तरीही स्वप्नाळू वाटून जातात.

संपादकांनी वाङ्मयीन नियतकालिकांचे अपमृत्यू टाळण्यासाठी जे तोडगे सुचविलेत; सूचना केल्यात त्या निश्चितच संपादकांच्या वाङ्मयीन नियतकालिकांबद्दलच्या प्रामाणिक पोटतिडिकेच्या निदर्शक आहेत. 'सर्व सोंगे आणता येतात; पण पैशाचे सोंग नाही' हे माहिती असूनही असल्या वाङ्मयीन चळवळी स्वत:ला खार लावून कराव्यात हे म्हणणेही त्यामुळे जरा धाडसाचेच होईल. अशा नियतकालिकांनी जनमानसात आपले स्वत:चे तितकेच महत्त्वाचे स्थान निर्माण करायला पाहिजे, तरच अशा वाङ्मयीन चळवळी सार्वत्रिक होतील या वामन तेलंगांच्या म्हणण्यात (१७–९–१९८९ : तरुण भारत) तथ्यांश आहेच. थोडक्यात म्हणजे युगवाणीतल्या या संपादकीयाने

त्या त्या घटकांकडून केलेल्या अपेक्षा पूर्ण होतील की नाही सांगणे हे जरी आज अवघड असले तरी या समस्त मराठी-प्रेमींना आणि मराठी प्रेमाचा पुळका आणणाऱ्यांनाही त्यांच्या डोळ्यात संपादकांनी घातलेले हे अंजन काही तरी करायला निश्चितच प्रेरणादायी ठरेल असे वाटते.

प्रा. सुनंदा देशपांडे
३९, टिळकनगर, नागपूर १०

* * *

श्रीपाद भालचंद्र जोशी यांना / स. न. वि. वि.

'युगवाणी'चा नुकताच प्रसिद्ध झालेला अंक मिळाला आणि त्यासोबतचे आवाहनपत्रही मिळाले. या संदर्भात आपण घेत असलेला पुढाकार स्वागतार्ह आहे. सामूहिक प्रयत्नांनीच आपल्या पुढील समस्या सुटू शकतील. आपण संयुक्त कृतीची योजना, प्रश्नावली व संबधित साहित्य पाठविणार आहात–त्याची वाट पहात आहे. ते मिळाल्यावर मी सविस्तर लिहीन. माझ्याही मनात काही उपाय सुचलेले आहेत. कळावे.

पुरुषोत्तम पाटील
संपादक / कवितारती

दि. ७–१०–८९

* * *

मा. श्रीपाद जोशी, सस्नेह नमस्कार.

एप्रिल–मे–जून चा अंक मिळाला. संपादकीय वाचले. प्रश्नांचे गांभीर्य समर्पक शब्दात मांडले आहे. विचार करायला लावणारे ते संपादकीय आहे. हे गांभीर्य आपल्या जनप्रतिनिधींच्या गळी उतरावयाचे तर सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. एखाद्या वारीकशा सायंदैनिकाचे महत्त्व त्यांना पटू शकते. ती दैनिकं जाहिराती गोळा करू शकतात कारण त्यांना वेगळे "मूल्य" आहे. साहित्य–समीक्षेला वाहिलेल्या मासिकांना ते मूल्य नाही. पण अशा मासिकांच्या संपादकांनी एक व्यासपीठ स्थापन केले व एकच प्रयत्न केले तर यश मिळेल असे वाटते. जिल्हा परिषदांच्या शाळांनी आणि महा-विद्यालयांनी दर्जेदार मासिकांचे आजीव सदस्य व्हायचे ठरविले तरी आपले बरेचसे प्रश्न सुटतील.

दृष्टीतल्या करंटेपणाची भव्यता कशी असते, त्याचं उदा. देतो. 'क्ष' च्या नावाने अंक जातो. तो असतो ग्रंथालयाचा. कारण व्यक्तिसाठी वर्गणी कमी असते. संस्थेसाठी थोडी अधिक. असो. या प्रश्नाच्या निमित्ताने तुम्ही पुढाकार घेतला आहे. पुढचे पाऊल ? काय ते कृपया कळवा.

संपादकीयाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन.

प्रा. प्रभाकर बागले
संपादक / अनुष्टुभ्

दि. १२–१०–८९

* * *

स. न. वि. वि.

युगवाणीचा एमेजू–८९ चा अंक मिळाला. फरक चटकन् डोळ्यात भरला. परखड संपादकीय हे एक विशेष. एका अवघड प्रश्नाला वाचा दिलीत, धन्यवाद ! प्रा. म. प. स. सं. मं. वगैरे तुटपुंजे दान देऊन संकट जास्तच घनदाट करीत आहेत. एक मध्यस्थ कोषाची कल्पना फारच छान.

आपले संपादकीय मायमराठीच्या अंकांत पुनर्मुद्रित केले तर चालेल काय ?

सभा मात्र मुंबई सारख्या मध्यवर्ती ठिकाणी मा. श्री. शरद पवार यांच्या उपस्थितीत बोलवावी.

पुन:श्च अभिनंदन

प्रभाकर तेलंग
संपादक / मायमराठी

दि. २६–९–१९८९

श्री. श्रीपाद जोशी यांस स. न. वि. वि.

युगवाणी–ए. मे. जू. '८९ एवढ्यातच हाती पडला. खरे तर युगवाणीचे संपादक बदलल्याने ह्या अंकाची वाट जून '८९ नंतर करीत होतोच. ती एवढ्याचसाठी. संपादनाची धुरा आपल्या खांद्यावर आली. आपला पहिला अंक कसा निघतो ही एक उत्सुकता होतीच. अंक पाहून अत्यंत समाधान वाटले.

युगवाणीचा समृद्ध कथा विभाग, वा. कृ. चोरघडेंची मुलाखत, त्यांच्या साहित्याचा परामर्श घेणारे विविध शैलीतील लेख खरेच अप्रतिम, आणि त्याहूनही विशेष सांगायचे झाले तर आपले संपादकीय टिपण, 'थोडे वेगळे !'

पहिल्याच अंकात आपण आपले हृदगत व्यक्त केले. अनेक साहित्यिक प्रश्नांवर केवळ चर्चा नव्हे तर मंथन होऊ शकेल असे प्रश्न उपस्थित केलेत. त्यातून साहित्य; साहित्यिक नियतकालिके, संस्था यांच्या विपन्नावस्थेबाबत केवळ चिंताच व्यक्त केली नाही तर त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी अनेक उपायही सुचविलेत.

साहित्याची; निखळ साहित्याची शासन, समाज, स्थानिक संस्था यांचेकडून होणारी कुचंबणा हा तर खरोखरी चिंतेचाच प्रश्न आहे. कोट्यावधी रुपयांचा अवास्तव, अनाठायी खर्च करणारे शासन खुद्द मराठीच्या मात्र जोपासना, संवर्धनाचे बाबत उदासीन दिसते, वागते हे दुखणे आजचेच नसले तरी त्यांवर मधूनमधून बोलल्या, लिहिल्या गेले तरच कदाचित चार गोष्टी हिताच्या होऊ शकतात.

चांगल्या नियतकालिकांचा अपमृत्यू झाल्याने आजवर मराठीचा मर्मज्ञ वाचक, रसिक, साहित्यिक खचत गेला आहे. हे दुष्टचक्र या ना त्या परीने अद्यापही चालूच आहे. त्यातून सुटण्यासाठी आपण जी उपाययोजना सुचविली ती खरोखरी लाख मोलाची आहे.

युगवाणीचा हा अंक वाचून तरी संबंधितांना सद्‌बुद्धी येवो असा आशावाद बाळगायला हरकत नसावी. नाही तरी माणूस आशेवर जगत असतोच. संस्था ही तर मानवी समुहच. तिनेही आशा सोडून कसे चालेल ? पहिल्याच अंकात आपण अनेक नवीन उपक्रम जाहीर केलेत. युगवाणीला काय हवे ते देखील; सोहळा–८९; युगवाणी लेखक मेळावा यातून तर युगवाणीच्या समृद्धीत भरच पडेल आणि ते तिच्या दर्जाला साजेसेच असेल.

संपादक बदलला तरी ऋणानुबंध जुनेच राहतात असे मी मानतो. त्यामुळेच आपल्याला मोकळ्या मनाने लिहूही शकलो. आपल्या कार्यकालातील उर्वरित अंकही असेच दर्जेदार निघतील असा विश्वास वाटतो. मलाच काय पण अगदी कुणालाही तो वाटावा असाच आपला पहिला अंक आहे.

दि. २७–९–८९ नामदेव कांबळे / वाशीम

* * *

प्रिय श्री. श्रीपाद भा. जोशी यांस स. न. वि वि.

(१) युगवाणीचा ए-मे-जू. ८९ चा अंक मिळाला. 'चोरघडे व्यक्ती आणि वाङ्मय' विशेषांकच. अंक संग्राह्य. चोखंदळ संपादनाबद्दल आपले अभिनंदन !

(२) आपले दिनांक २० सप्टें. ८९ चे पत्र मिळाले. 'लोककलांचे सौंदर्यशास्त्र' या विषयावरील माझा लेख आपण मागविल्याबद्दल आभारी आहे. २५ ऑक्टो. ८९ पर्यंत आपणास लेख पाठविण्याचा प्रयत्न करतो.

(३) आपण पाठविलेल्या विषयसूचीवर नजर टाकली आणि त्या त्या विषयातील अभ्यासकांकडून आपण जे लेख मागवित आहात किंवा त्यांना लिहिण्यास प्रवृत्त करीत आहात याबाबत आपल्या प्रयत्नांना दाद. ब्रेव्हो. आगे बढो. कळावे,

डॉ. मधुकर वाकोडे
(अंजनगावसुर्जी)

५–१०–८९

श्री. श्रीपाद जोशी,

श्री. शेवाळकरांकडे आपली भेट झाली तेव्हा, आपल्याला 'युगवाणी' मिळालं नसल्याचं पत्र टाकायचं ठरवलं असं मी म्हणाले होते. पण 'युगवाणी' चा अंक मिळाला. आभार.

'युगवाणी' श्री. चोरघडे विशेषांक अतिशय सुंदर तसाच संग्राह्य निघालाय.

तुमच्या संपादनाला शुभेच्छा !

कळावे,

सौ. शुभांगी भडभडे/नागपूर

*   *   *

संपादक, युगवाणी स. न. वि. वि.

एप्रिल-जून १९८९ चा 'युगवाणीचा' अंक मिळाला.

श्री. वामनराव चोरघडे यांच्या अमृत-महोत्सवानिमित्त अनेक लेखकांचे त्यांच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणारे केलेत प्रसिद्ध केला याबद्दल धन्यवाद ! अंकाचे मुखपृष्ठही सुंदर आहे. कळावे,

आपला

दि. ९-१०-८९

ज. बा. कुळकर्णी

*   *   *

प्रिय, श्री. श्रीपाद भालचंद्र जोशी यांस,

सप्रेम नमस्कार

कथाकार चोरघडे विशेषांकाचे स्वरूप लाभलेला 'युगवाणी 'चा एप्रिल-मे-जून १९८९ चा संयुक्त अंक आताच हाती पडला. अंकातील वामनराव चोरघड्यांवरील लेख व इतरही लेख अभ्यास-परिपूर्ण व वाचनीय आहेत. त्यामुळे प्रस्तुत अंकातील समग्र साहित्य भांडार मननीय, लक्षणीय व संग्राह्य ठरेल. आपले संपादकीय थोडे वेगळे असले तरी त्यातील व्यथा फार बोलकी व जिव्हाळ्याची वाटली. त्यातील सूचनांची शासनाने दखल घेतली तर इतर नियतकालिके, मासिके यांची झालेली दुर्दशा युगवाणीच्या नशिबी येणार नाही असे वाटते. आपण नवीन कार्यकारिणीतील अधिकारारूढ प्रतिष्ठित कार्याधिकाऱ्यांच्या सहकार्याने वार्षिक खर्चाच्या तरतुदीचा प्रश्न सोडवण्याचा नेटाने प्रयत्न केल्यास कदाचित् खर्चाचा प्रश्न सोडवला जाऊ शकेल, असाही विश्वास वाटतो.

जाता जाता सहज एक सूचना भाऊ समर्थ हे एक समर्थ कलावंत आहेत याबद्दल शंका नाही. प्रस्तुत अंकाच्या मुखपृष्ठावरील त्यांचे रेखाचित्र आशय-घनता व घनदाट आशयामुळे आमच्या सारख्यांना आकलन होणे बरेचदा आटोक्याबाहेरचे जाते. त्यांच्यासारख्या मान्यवर कलाकाराच्या कृतीला तर स्थान असावेच; परंतु चालू वर्षात महाराष्ट्रात, बृहन्महाराष्ट्रात अनेक साहित्यविषयक मेळावे, संमेलने पार पडल्याने, पुढील तीन वर्षांत 'युगवाणी 'च्या प्रत्येक अंकाच्या मुखपृष्ठावर वा अंतर्भागात महाराष्ट्रातल्या अगदी सुरवातीपासून उदयास आलेल्या वाङ्मयकर्त्यांची उदा। समाज-सुधारक, कादंबरीकार, नाटककार, कथाकार, कवि, चित्रकार, चित्रपति, इत्यादी निरनिराळ्या सृष्टीतील कलावंतांची छायाचित्रे किंवा रेखाचित्रे दिल्यास अभिनवतेत भर तर पडेल, त्याचरोबर; स्मृतीत विरलेल्या महान् व्यक्तींचे नवीन पिढीलाही स्मरण होत राहील; असे वाटते.

प्रस्तुत, सर्वांगसुंदर अभ्यसनीय अंक काढल्याबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन. कळावे.

आपला,

शरच्चंद्र ना. बुचे

दि. २७ सप्टें.; १९८९

(निवृत्त) भाषा उपसंचालक, नागपूर

संमेलन वृत्त

पुसदला ३१ मार्च, १ व २ एप्रिलला झालेल्या व येथे तिसऱ्यांदा होणाऱ्या ४० व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन ख्यातकीर्त तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे हस्ते दिनांक ३१ ला संपन्न झाले. प्रसिद्ध समीक्षक व विख्यात विदुषी प्रा. डॉ. उषा देशमुख संमेलनाच्या अध्यक्षा होत्या. कै. मा. गो. देशमुख हे १९४६ साली पुसद येथे भरलेल्या १० व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते. ४० व्या संमेलनाचे अध्यक्ष-स्थान उषाताईंनी भूषविले हा योगायोग !

उद्‌घाटकीय : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

प्रज्ञासूर्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दि. ३१ ला वि. सा. संमेलनाचे दीपप्रज्वलन करून उद्‌घाटन केले. उद्‌घाटनाच्या भाषणात ते म्हणाले की, " शांतरस हा साहित्यातील प्रमुख रस असून तो शब्दातून निर्माण होतो व शब्द हेच ब्रम्ह होय. शब्दानेच माणसाला माणुसकी प्राप्त झाली, त्यातून भाषा आणि मानवी संस्कृतीचा उगम झाला. भाषा हे मानवाने निर्माण केलेले तंत्रज्ञान होय. परंतु भाषाशास्त्राचा अजूनही उलगडा होत नाही."

विदर्भाविषयी बोलताना ते पुढे म्हणाले की, " विदर्भ हा शब्द उपनिषदातही आलेला असून हा प्रांत प्राचीन व सुसंस्कृत आहे. वैदर्भीय शैली ही संस्कृतात उच्च दर्जाची शैली मानली गेली आहे. महाराष्ट्राला धन्यता वाटावी अशी गोष्ट म्हणजे एकमेकावर प्रेम करणारी, साहित्यिक कार्य कर-णारी जोडपी या भागात दिसतात.'' कवी आ. रा. देशपांडे, कुसुमावती देशपांडे तसेच कै. मा. गो. देशमुख, डॉ. उषा देशमुख यांचा त्यांनी या संदर्भात उल्लेख केला.

अध्यक्षीय : प्रा. डॉ. उषाताई देशमुख

" प्रादेशिक अस्मितेचा आणि परंपरेचा सार्थ अभिमान आजच्या पिढीने बाळगायला पाहिजे. कारण परंपरा आणि संस्कृती यांच्या आधारा-शिवाय माणसाचे माणूसपण आणि त्याचे जगणे निरर्थक ठरेल. त्याचा 'उद्‌गार' जर साहित्यरूप होऊन साक्षात व्हावयाचा असेल तर त्यासाठी त्याला आपल्या मातीशी आणि संस्कृतीशी इमान राखले पाहिजे. त्याशिवाय तरणोपाय नाही. मी भारतीय आहे, महाराष्ट्रीय आहे आणि मी वैदर्भीय आहे याचा सार्थ अभिमान असल्याशिवाय परिवर्तनाच्या वादळवाऱ्यात माणसाला टिकून राहणे दुरापास्त होईल. त्यामुळे प्रादेशिक अस्मिता असल्याशिवाय संस्कृतीचे जतन होणे असंभवनीय ठरते " असा खणखणीत इशारा संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. उषाताई देशमुख यांनी संमेलनाच्या महात्मा फुले व्यासपीठावरून बोलताना दिला.

संमेलनाध्यक्षांचे व उद्‌घाटकांचे स्वागत कार्याध्यक्ष व पुसदचे नगराध्यक्ष डॉ. एन. पी. हिराणी यांनी केले. पूर्वाध्यक्ष, कवीश्रेष्ठ पांडुरंग श्रावण गोरे, वामन कृष्ण चोरघडे, प्रा. शरच्चंद्र टोंगो, प्राचार्य राम शेवाळकर, प्रा. मधुकर केचे यांचेही स्वागत करण्यात आले. स्वागताध्यक्ष सुधाकरराव नाईक हे उपस्थित राहू न शकल्यामुळे त्यांचे भाषण कार्याध्यक्ष डॉ. एन. पी. हिराणी यांनी वाचून दाखविले. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

याप्रसंगी "साहित्यपंढरी" या स्मरणिकेचे प्रकाशन डॉ. उषाताई देशमुख यांच्या हस्ते झाले. संमेलनासाठी आलेल्या शुभेच्छा संदेशांचे वाचन प्रा. मनोहर धारकर यांनी केले. याचवेळी तर्क-तीर्थांच्या हस्ते कलादालन व ग्रंथप्रदर्शनीचे उद्‌घाटन उषाताईंच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे संचालन स्वागत सचिव प्रा. डॉ. उत्तम रुद्रवार यांनी केले तर आभारप्रदर्शन ॲड्. माधवराव माने यांनी केले.

निमंत्रितांचे कविसंमेलन :

दिनांक ३१ च्या रात्रीला निमंत्रित कवींचे बहारदार कविसंमेलन झाले. कविवर्य श्रीधर

शनवारे यांच्या खुसखुशीत संचालनाने त्यात अधिकच रंग भरला होता. कविसंमेलनात मराठीतील नामवंत कवी सामील झाले होते. प्रा. मधुकर केचे, प्रा. विठ्ठल वाघ, श्रीपाद भालचंद्र जोशी, प्रा. देविदास सोटे, मृणाल चिंचाळकर, आशा दिवाण, सुलभा हेर्लेकर, वसुधा घुरडे, प्रा. कृष्णा चौधरी, नीलकृष्ण देशपांडे, शंकर बढे, मिर्झा बेग, बबन सराडकर, अशोक थोरात, शिवा राऊत, नारायण कुळकर्णी कवठेकर, सुखदेव ढाणके, गौतम सुत्राव, आत्माराम राठोड, सुरेश गांजरे, महेन्द्र भवरे, प्रा. मनोहर थारकर, वसंत गिरडकर, इत्यादींचा कवी संमेलनात सहभाग होता. विदर्भाबाहेरील कवी प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी, श्रीकृष्ण वेडेकर, शाहीर आनंद देवडे यांनीही आपल्या कविता सादर केल्या.

परिसंवाद : दूरदर्शन – एक सांस्कृतिक आक्रमण

१ एप्रिलला सकाळी "दूरदर्शन एक सांस्कृतिक आक्रमण" या विषयावरील परिसंवाद चांगला रंगला. प्रा. प्रभाकर उर्ध्वरेषे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिसंवादात नामवंत विचारवंत साहित्यिकांनी भाग घेतला. सर्वश्री पुरुषोत्तम दारव्हेकर, डॉ. भा. ल. भोळे, प्रा. सुरेश द्वादशीवार, प्रा. श्रीपाद भालचंद्र जोशी, प्रा. राजन जयस्वाल, प्राचार्य राम डोके यांनी आपले विचार मांडले.

दूरदर्शनच्या आक्रमणामुळे बालकांपासून वृद्धापर्यंत सर्वांवरच आघात झाला आहे असे पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे म्हणणे, तर डॉ. भा. ल. भोळे म्हणाले की, 'आपल्या देशात काही स्वार्थी मंडळींनी स्वतःच्या स्वार्थासाठी विक्रमी वेगाने दूरदर्शन आणले. जाहिरनाम्यातील आश्वासनांची पूर्ती करता आली नसल्याने नाकर्त्या राज्यकर्त्यांनी आपली अकार्यक्षमता झाकण्यासाठी लोकांच्या पुढे केलेले दूरदर्शन हे एक मायाजाल आहे.' दूरदर्शन या जनमाध्यमाचा व्यक्ती, समाज, शासन व मतनिर्मिती यांचे संदर्भातील परस्पर नाते विशद करणारे, संवाद व माध्यम शास्त्रीयदृष्टचा हे सांस्कृतिक आक्रमण उलगडून दाखविणारे, श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे भाषण हे या परिसंवादाचे खास आकर्षण ठरले. त्यामुळे संवादशास्त्रीय या पद्धतीने हा विषय मांडणारे मराठीतील हे पहिलेच संमेलन ठरले. प्राचार्य राम डोके म्हणाले की; "दूरदर्शन हे संस्कृतीवरील आक्रमण आहे त्यामुळे संस्काराचे वातावरण उध्वस्त झाले आहे." परिसंवादाचे प्रास्ताविक व समारोप परिसंवादाचे अध्यक्ष प्रभाकर उर्ध्वरेषे यांनी केला.

पूर्वाध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिकांचा सत्कार :

विदर्भ साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष सर्वश्री वामन चोरघडे, पांडुरंग श्रावण गोरे, प्रा. शरच्चंद्र टोंगो, प्रा. मधुकर केचे, प्रा. राम शेवाळकर यांचा तसेच ज्येष्ठ साहित्यक सर्वश्री प्रा. प्र. वा. उर्ध्वरेषे, मामासाहेब गंद्रे, ज्ञानेश्वर साधू, पुरुषोत्तम दारव्हेकर, बाळकृष्ण शंकर देशपांडे, सुगंधा शेंडे, इंदूमती शेवडे, उध्दव शेळके, वसंतराव वऱ्हाडपांडे, भाऊसाहेब पाटणकर; उषा लिमये आदींचा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. संमेलनाध्यक्ष डॉ. उषाताई देशमुख यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

लेखिका संमेलन : मुक्तीपेक्षा परिवर्तन महत्वाचे

स्त्रियांना स्वतःच्या अस्मितेची जाणीव होऊ लागली आहे. त्यामुळेच मुक्ती चळवळ सुरू झाली आहे. परंतु मुक्तीचा निश्चित अर्थ कोणता हे आंदोलनकर्तेही सांगू शकत नाही. त्यामुळे मुक्तीपेक्षा परिवर्तन आणणे जास्त महत्त्वाचे ठरेल, असा सूर वैदर्भीय लेखिका संमेलनातून उमटला. तर "साहित्य विश्वातील कथा आणि व्यथा" या विषयावर झालेल्या परिसंवादात सुगंधा शेंडे, सुलभा हेर्लेकर, उषा लिमये, पुष्पा पत्की, कु. उर्मिला निनावे, सुहासिनी मुठाळकर; यांनी आपले विचार मांडले. अध्यक्षस्थानी

इंदूमती शेवडे होत्या. यानंतर श्री. भाऊसाहेब पाटणकर यांनी "मराठी शेरशायरी"चा कार्यक्रम सादर केला. रात्री शिरीष थिएटर, पुणे यांनी "शहाणेवाडा पुणे" हा नाटयप्रयोग सादर केला.

शोककळा।

एस. एम. जोशींच्या निधनाने महाराष्ट्राचे थोर विचारवंत व समाजवादी नेते श्री. एस. एम. जोशी यांच्या निधनाने शोकाकुल झालेल्या संमेलनाच्या कार्यक्रमातील पुढील नियोजित कार्यक्रम स्थगित करण्यात आले. डॉ. उषाताई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली शोक सभा घेण्यात येऊन एस. एम. जोशी यांना आदरभावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्याध्यक्ष डॉ. एन. पी. हिराणी, डॉ. भा. ल. भोळे, प्रा. उध्वरेषे, प्रा. राम शेवाळकर यांनी श्रद्धांजली वाहिली. दिवंगत साहित्यिक पत्रकार व राजकीय पुढारी यांनाही श्रद्धांजली वाहण्यात आली. मराठवाडा विद्यापीठ नामांतर व महात्मा फुलेंचा अवमान करणारे बाळ गांगल यांचा निषेध करणारा ठरावही पारित करण्यात आला.

बालवाङ्मय : परिसंवाद

दुपारच्या सत्रात "प्रतिभावंतानी बालसाहित्याची उपेक्षा केली आहे" या विषयावर प्रा. वसंत वऱ्हाडपांडे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. प्रतिभावंतांनी बालसाहित्याची उपेक्षा केली आहे ही वस्तुस्थिती आहे. असा सूर त्यातून निघाला. सर्वश्री प्रभाकर पुराणिक, प्रा. गोविंद देशपांडे, प्रा. श्रीकांत तिडके, प्रा विजया डवीर, प्रा. मदन धनकर, मामा गंधे, महावीर जोंधळे, शंकर कऱ्हाडे व प्रा. ग. वा. करंदीकर यांनी त्यात भाग घेतला होता.

कथाकथन व नवोदितांचे कविसंमेलन :

दुपारी कथाकथनाचा कार्यक्रम झाला. त्यात सर्वश्री बाळकृष्ण देव, वर्षा रेगे, जयश्री रुईकर, डॉ. संवजीनी देशमुख, हेमंत कोठीकर, रविकिरण पंडीत आदींनी कथाकथन केले. "मुंगी उडाली आकाशी" या कादंबरीचे लेखक श्री. पद्माकर गोवईकर यांनी या कादंबरीतील एक प्रकरण साभिनय सादर केले. प्रा. वामन चोरघडे हे अध्यक्षस्थानी होते. रात्री नवोदितांचे कविसंमेलन वि. रा. गिरी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

एस. एम. जोशी यांच्या निधनाने शोककळा पसरलेले हे संमेलन एस. एम. च्या आठवणी काढत संपले. ■

– प्रा. डॉ. उत्तम रुद्रवार
प्रा. दिनकर गुल्हाने



केंद्रीय कार्यवृत्त दि. १ जुलै ८९ ते ३० सप्टें. १९८९

रविवार, दि. ९ जुलै १९८९ : विवेक प्रकाशन व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. हिरामण लांजे यांच्या "वैनेचे वारे" या लेखसंग्रहाचे प्रकाशन गडकरी सभागृहात पार पडले. प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वसंतराव वऱ्हाडपांडे होते. प्राचार्य श्री. म. पांडे यांनी या लेखसंग्रहाचे प्रकाशन केले. श्री. हिरामण लांजे यांचे याप्रसंगी स्वागत करण्यात आले. त्यांनी आपल्या भाषणातून लेखनामागची भूमिका विशद केली. याप्रसंगी मान्यवर साहित्यिक उपस्थित होते.

शुक्रवार, दि. १४ जुलै १९८९ : विदर्भ साहित्य संघाचे पूर्वाध्यक्ष कै. डॉ. य. खु. देशपांडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

शनिवार, दि. १५ जुलै १९८९ : विदर्भातील एक ज्येष्ठ साहित्यिक श्री. प्रभाकर उर्ध्वरेषे यांच्या दुःखद निधनानिमित्त विदर्भ साहित्य संघात एक शोकसभा घेण्यात येऊन त्यांच्या स्मृतीस श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

मंगळवार, दि. १८ जुलै १९८९ सुप्रसिद्ध दलित साहित्यिक व शाहीर कै. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

शनिवार, दि. २२ व रविवार दि. २३ जुलै १९८९ : विदर्भ साहित्य संघातर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणारी गणेश व्याख्यानमाला यंदा संतवाङ्मयाचे अभ्यासक व मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. यु. म. पठाण यांनी गुंफली. दोन्ही दिवशी श्रीयुत पठाण यांनी "ज्ञानदेवे रचिला पाया" या विषयावर अतिशय सूक्ष्म व मर्मग्राही व प्रासादिक पद्धतीने विवेचन करून श्रोत्यांना आपल्या अमोघ व व्यासंगी वक्तृत्वाने खिळवून ठेवले. दोन्हीही दिवशी श्रोत्यांची अमाप गर्दी होती. ही व्याख्यानमाला यशस्वी करण्यासाठी श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी बरेच परिश्रम घेतले.

सोमवार, दि. ३१ जुलै १९८९ : विदर्भ साहित्य संघ व भारत–सोव्हिएत सांस्कृतिक संघाची नागपूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने विख्यात कथाकार (हिंदी) मुन्शी प्रेमचंद यांची १०९ वी जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी भाई ए. बी. वर्धन होते. प्रारंभी सुधाकर गायधनी व राजेंद्र पटोरिया यांच्या कविता झाल्या. मुन्शी प्रेमचंद यांच्या समृद्ध लेखनाची वैशिष्टये उद्घाटित करणारी सौ. शोभाताई उबगडे व श्री. रज्जन त्रिवेदी यांची समर्पक भाषणे झाली. डॉ. वि. स. जोग यांनी प्रास्ताविक केले तर वक्त्यांचा परिचय कार्याध्यक्ष श्री. वामन तेलंग यांनी करून दिला. कॉम्रेड बिंदाप्रसाद कश्यप यांचेही यावेळी भाषण झाले. इस्कॉसचे सचिव राम लोखंडे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले.

मंगळवार, दि. १ ऑगस्ट ८९ : लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या छायाचित्रास हार अर्पण करून त्यांच्या स्मृतीस आदरांजली वाहण्यात आली.

रविवार, दि. १३ ऑगस्ट ८९ : विदर्भ साहित्य संघ आणि पु. भा. भावे स्मृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने पु. भा. भावे स्मृतिदिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. धनवटे रंग-मंदिरात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात भाव्यांच्या साहित्यावर आधारित विविधरंगी कार्यक्रम सादर करण्यात आले. कु. वैशाली देशपांडे (जळगाव जामोद) यांनी पु. भा. भावे लिखित " ठिणगी " ही कथा परिणामकारकरीत्या सादर केली. कु. मृणालिनी नानिवडेकर या विद्यार्थिनीने कै. ज. के. उपाध्ये यांच्यावरील " संपुनि गेला खेळ " हा पु. भा. भावे लिखित मृत्युलेख सादर केला तर सौ. मालती पेंढारकर यांनी स्वामिनी नाटकातील काशीचे स्वगत सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. प्रख्यात साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात त्यांच्यासह डॉ. वि. भि. कोलते, सौ. सुमतीबाई सुकळीकर, सौ. उमा माडखोलकर यांनी पु. भा. भावे यांच्या रोचक आठवणी सांगितल्या. पु. भा. भावे स्मृती समितीच्या मुंबई शाखेतर्फे भाव्यांच्या कथेवरील श्री. गिरीश दावके यांनी लिहिलेली " सायंकाळ " ही एकांकिका सादर करण्यात आली. या एकांकिकेत सौ. मालती पेंढारकर, श्री. जयंत सावरकर व सौ नयना आपटे यांचा सहभाग होता. नागपूर व अमरावती विद्यापीठातील एम्. ए. (मराठी) परीक्षेत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना व तसेच नाटयदर्पण, मुंबई व भावे स्मृती समितीच्या वतीने ३० जुलै ८९ रोजी नागपूर येथे घेण्यात आलेल्या कथाकथन स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना रोख रकमांची पारितोषिके देण्यात आली. पारितोषिक विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे. कु. अरुंधती ठोंबरे (वर्धा), श्री. आनंद सहस्रबुद्धे व कु. मंगला सरायकर (नागपूर), सौ. शुभा साठे (कोराडी).

पु. भा. भावे स्मृतिदिनाच्या या कार्यक्रमास रसिक प्रेक्षकांची लक्षणीय उपस्थिती होती.

मंगळवार, दि. १५ ऑगस्ट ८९ : भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त वि. सा. संघाचे स्थानिक कार्य-कारिणी सदस्य व कार्यालयीन कर्मचारी यांच्या उपस्थितीत झेंडावंदन संपन्न झाले. या प्रसंगी सर्व उपस्थितांना मिठाई वाटण्यात आली.

शनिवार, दि. २ सप्टेंबर ८९ थोर साहित्यिक व ज्ञानपीठ पारितोषिक विजेते कै. वि. स. खांडेकर यांच्या छायाचित्रास त्यांच्या स्मृतिदिनाप्रित्यर्थ पुष्पहार अर्पण करण्यात आला.

रविवार, दि. ३ सप्टेंबर ८९ : लोकशाही हक्क संरक्षण समिती व वि. सा. संघ यांच्या संयुक्त विद्यमाने एक चर्चा गडकरी दालनात आयोजित करण्यात आली. यात मान्यवर वक्त्यांनी भाग घेतला.

मंगळवार, दि. ५ सप्टेंबर ८९ : भारताचे माजी राष्ट्रपती व थोर शिक्षणतज्ञ कै. डॉ. राधाकृष्णन यांच्या जयंतीप्रित्यर्थ त्यांच्या छायाचित्रास हार अर्पण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

शनि, रवि, सोम ९, १०, ११ सप्टेंबर ८९ : श्री. चक्रधर प्रभू जयंतीनिमित्त व गोविंद प्रभू

जयंतीनिमित्त वि. सा. संघाच्या सहकार्याने एका व्याख्यान सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यात डॉ. वि. भि. कोलते, प्राचार्य राम शेवाळकर इ. महनीय व्यक्तींची व्याख्याने झाली.

मंगळवार दि. १२ सप्टें. ८९ : महाराष्ट्रातील विख्यात कथाकार वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष व वि. सा. संमेलनाध्यक्ष श्री. वा. कृ. चोरघडे यांचा अमृतमहोत्सवानिमित्त गडकरी सभागृहात सत्कार करण्यात आला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री. के. ज. पुरोहित उर्फ शांताराम हे होते. या प्रसंगी डॉ. वि. भि. कोलते, प्राचार्य राम शेवाळकर, डॉ. सौ. आशा सावदेकर यांची श्री. वा. कृ. चोरघडे यांच्या साहित्यिक व वाङ्मयीन कार्याचा गौरव करणारी भाषणे झाली. सत्कारास उत्तर देताना बापूसाहेब चोरघडे यांनी आपल्या वाङ्मयनिर्मितीची प्रेरणा ऋषिमुनींच्या साहित्यात आहे असे प्रतिपादन केले. त्यांनी आपल्या भाषणात जुन्या स्मृतींना उजाळा दिला. समारंभाध्यक्ष प्रा. पुरोहित म्हणाले की करुणेचा झरा व मोह हे वामनरावांचे प्रमुख गुण आहेत. शाल व श्रीफळ देऊन श्री. पुरोहित यांच्या हस्ते वामनरावांचा सत्कार करण्यात आला. या सत्कारानिमित्त 'युगवाणी' या वि. सा. संघाच्या मुखपत्राने काढलेल्या कथा विशेषांकाचे प्रकाशन अध्यक्षांनी केले. गडकरी सभागृहात झालेल्या कार्यक्रमाचे संचालन श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी केले. या कार्यक्रमास श्रोत्यांची बरीच उपस्थिती होती.

रविवार, सोमवार दि. १७ व १८ सप्टें. ८९ : वि. सा. संघातर्फे दरवर्षी घेण्यात येणारी कै. रघुनाथराव आष्टीकर स्मृती मराठी विनोदी एकांकिका स्पर्धा धनवटे रंगमंदिरात संपन्न झाली. या स्पर्धेत या वर्षी एकूण १० प्रवेश आले होते पैकी ६ एकांकिका स्पर्धेत सादर झाल्या. श्री. म. ना. लोही, श्री. श्याम वंड व सौ. ज्योत्स्ना धर्माधिकारी यांनी एकांकिकांचे परीक्षण केले. पारितोषिक वितरण समारंभात प्रा लोही यांनी एकांकिकांचे अतिशय परखड व वस्तुनिष्ठ विवेचन केले व या वर्षी प्रथम क्रमांकाचे व लेखनाचे पारितोषिक प्राप्त करण्यास एकही एकांकिका योग्य नव्हती असे प्रतिपादन केले. वि. सा. संघाचे एक ज्येष्ठ सदस्य व नाट्यप्रेमी श्री मधुसूदन वनहट्टी यांचे हस्ते श्री. वामन तेलंग यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण संपन्न झाले. या स्पर्धेच्या संयोजनासाठी श्री. प्रकाश देशपांडे, सौ. कुमुद पाठक व सौ. सुहासिनी लाडकर (आमंत्रक) यांनी बरेच परिश्रम घेतले. पारितोषिक वितरण समारंभाचे संचालन सौ. कुमुद पाठक व आभार प्रदर्शन सौ. सुहासिनी लाडकर यांनी केले.

कै. रघुनाथराव आष्टीकर स्मृति विनोदी एकांकिका स्पर्धा १९८९ : निकाल पत्रक

निर्मिती	एकांकिका	संस्था	पारितोषिक
प्रथम	–	–	कै. गणेश सखाराम अंधारे फिरती ढाल व २०१/– रुपये
द्वितीय	सेंड ऑफ	महाराष्ट्र बँक स्पोर्टस अँन्ड रिक्रिएशन क्लब	२०१/– रुपये
तृतीय	सुख शोधावं लागतं	नवरंग, नागपूर	१०१/– रुपये

अभिनयाची पारितोषिके तथा लेखन व दिग्दर्शन

	कलावंत	भूमिका	एकांकिका	संस्था	पारितोषिके
पुरुष प्रथम	मोहन पांडे	दांडेकर	सेंड ऑफ	महाराष्ट्र बँक स्पोर्टस अँन्ड रिक्रिएशन क्लब	५१/– रु. व प्रशस्ती पत्र
पुरुष द्वितीय	श्याम मोहरील	लुकतुके	काला पहाड	रंगस्वानंद	२५/– रु. व प्रशस्ती पत्र
पुरुष उत्तेजनार्थ	सुबोध पंडे	युवक १	बाप बिप बाप	युवक बिरादरी	प्रशस्ती पत्रक
स्त्री प्रथम	शुभांगी चंडी	कमल	काही खरं नव्हे	नाटयायन वडधामना	५१/– रु. व प्रशस्ती पत्र
स्त्री द्वितीय	अपर्णा घोंड	आशा	सुख शोधावं लागतं	नवरंग	२५/– रु. व प्रशस्ती पत्र
स्त्री उत्तेजनार्थ	कौमुदी पंडे	अण्णाची पत्नी	सुख शोधावं लागतं	नवरंग	प्रशस्ती पत्रक
दिग्दर्शन	दिलीप वाईकर		सेंड ऑफ	महाराष्ट्र बँक स्पोर्टस् अँन्ड रिक्रिएशन क्लब	७५/– रु. व प्रशस्ती पत्र

शनिवार, दि. २३ सप्टेंबर ८९ : सुप्रसिद्ध नाटककार कै. मामा वरेरकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांच्या छायाचित्रास पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

मंगळवार, दि. २६ सप्टेंबर ८९ : सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार श्री. आर. के. लक्ष्मण व सौ. लक्ष्मण यांनी वि. सा. संघास भेट दिली. या प्रसंगी संघाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांनी उभयतांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर यांनी त्यांना वि. सा. संघाच्या कार्याची माहिती दिली. श्री. लक्ष्मण यांनी वि. सा. संघाच्या कार्याबद्दल समाधान व शुभेच्छा व्यक्त केल्या. श्री. लक्ष्मण यांचे सोबत ज्ञानपीठ पारितोषिक विजेते श्री. हरिश नवल यांचेही प्रा. शेवाळकर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

शुक्रवार, दि. २९ सप्टें. ८९ : कै. दत्तो वामन पोतदार स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत सुप्रसिद्ध शिवकथाकार श्री. विजय देशमुख यांचे "छत्रपती संभाजी" या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक श्री. चंद्रकांत कुळकर्णी व आभारप्रदर्शन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले. या कार्यक्रमास श्रोत्यांची प्रचंड गर्दी होती.

परीक्षा समिति

या तीन महिन्यात परीक्षा समितीतर्फे कुठल्याही कार्यक्रमाचे आयोजन झाले नाही.

श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय

नवे ग्रंथ नवे समीक्षक

ग्रंथ समीक्षणाचा १ ला कार्यक्रम दि. ७ जून १९८९ रोजी आयोजित करण्यात आला. यात सौ. रोहिणी सावदेकर, सौ. शिल्पा घाटे व श्री. विराग पाचपोर यांनी अनुक्रमे वादळातील दीपस्तंभ (गो. नी. दांडेकर), पाखरांचे परगणे (वसंत चिंचाळकर) व नाही चिरा नाही पणती (नीळकंठ देशमुख) या नवीन ग्रंथांवर समीक्षणे सादर केली.

या समीक्षण मालेतील दुसरा कार्यक्रम बुधवार दि. १९ जुलै रोजी सादर करण्यात आला. या कार्यक्रमात सौ. शुभांगी संत, प्रा. कु. वीणा वोडकर व प्रा. श्याम मोहरकर या समीक्षकांनी अनुक्रमे रेडियम, गाजलेल्या प्रस्तावना, रंगयात्रा या ग्रंथांची समीक्षणे सादर केली.

या मालेतील तिसरा कार्यक्रम गुरुवार दि. ३१ ऑगस्ट १९८९ रोजी सादर करण्यात आला. या कार्यक्रमात सौ. शुभा साठे व सौ. वीणा सुकळीकर या समीक्षकांनी भाग घेतला. त्यांनी अनुक्रमे मैत्र (पु. ल. देशपांडे), क क ची क (व. पु. काळे) या दोन ग्रंथांची समीक्षणे सादर केली. याच कार्यक्रमात ज्ञानपीठ पारितोषिक विजेते कविवर्य कुसुमाग्रज यांच्या काव्यगायनाची ध्वनीफित उपस्थितांना ऐकवण्यात आली. श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयात आता साहित्यिकांची भाषणे, काव्यगायन, साहित्यचर्चा यांच्या ध्वनीफिती ठेवण्याची व्यवस्था झाली असून या योजनेचा शुभारंभ सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. वसंत वऱ्हाडपांडे यांच्या हस्ते या कार्यक्रमात करण्यात आला.

मालेतील चवथा कार्यक्रम दि. ५ सप्टेंबर १९८९ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात प्रा. सुनंदा देशपांडे ("नाथ हा माझा"–कांचन घाणेकर), प्रशांत इंदुरकर ("ऑलिंपिक शताब्दीकडे"–हेमंत जोगदेव) व अनिल नितनवरे ("तुझे गीत गाण्यासाठी"–मंगेश पाडगावकर) या समीक्षकांनी भाग घेतला.

प्रबंध–परिचय

मराठी वाङ्मयात नव्याने झालेल्या संशोधनाचा परिचय अभ्यासकांना करून देण्याच्या उद्देशाने विदर्भ साहित्य संघाच्या श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे "प्रबंध परिचय" हा नवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

या उपक्रमातील पहिला कार्यक्रम कै. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनी मंगळवार दि. १८–७–१९८९ रोजी आयोजित केला. सौ. आशा घावडे यांनी आपल्या "अण्णाभाऊ साठे व्यक्ति आणि वाङ्मय" या आपल्या प्रबंधाचा परिचय करून दिला.

या उपक्रमातील दुसऱ्या कार्यक्रमात डॉ. विश्वेश्वर सावदेकर यांनी आपल्या "मराठी विज्ञान-कथा स्वरूप आणि समीक्षा" या प्रबंधाचा शुक्रवार दिनांक ४ ऑगस्ट १९८९ रोजी परिचय करून दिला.

या उपक्रमातील तिसऱ्या कार्यक्रमांत प्रा. डॉ. रविंद्र शोभणे यांनी आपल्या "कादंबरीकार श्री. ना. पेंडसे व्यक्ति आणि वाङ्मय" या प्रबंधाचा परिचय दिनांक २ सप्टेंबर १९८९ रोजी करून दिला.

बालकवी जन्मशताब्दी एक अभिनव कार्यक्रम

शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे बालकवी जन्मशताब्दी प्रारंभाचा आगळावेगळा कार्यक्रम दि. १३ ऑगस्ट रोजी तेलंगखेडी उद्यानात सादर करण्यात आला. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. द. भि. कुळकर्णी व डॉ. सौ. आशा सावदेकर यांनी बालकवींच्या कवितांमधील सौंदर्य विशद केले तर श्री. सुनील शिनखेडे व श्री. श्याम धोंड यांनी बालकवींच्या कविता उपस्थितांसमोर सादर केल्या. कुमारी मंजू जोशी हिने बालकवींच्या कवितांचे गायन केले व सौ. अनुराधा परांडे यांनी बालकवींवरील स्वरचित कवितेचे वाचन केले. कु. राधिका केळापुरे या छोटचा बालिकेने या कार्यक्रमात भाग घेऊन बालकवींच्या मुलांसाठी लिहिलेल्या कविता सादर केल्या. अशा तऱ्हेने हा अभिनव कार्यक्रम निसर्गाच्या सान्निध्यात संपन्न झाला.

कै. श्रीमती इंदिरा खरे वक्तृत्व स्पर्धा १९८९-९०

विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणारी आंतरशालेय कै. श्रीमती इंदिरा खरे वक्तृत्व स्पर्धा दिनांक ५-१०-८९ रोजी वि. सा. संघाच्या गडकरी सभागृहात घेण्यात आली. स्पर्धेत एकूण वीस विद्यार्थ्यांनी भाग घेतला. स्पर्धेचे विषय पुढीलप्रमाणे होते.

१. महाभारतातील आवडलेली व्यक्तिरेखा २. वृत्तपत्रांचे वाचन.

३. लता मंगेशकर ४. क्रिकेटचा एक दिवसीय सामना.

स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्वच पण निवडक विद्यार्थ्यांनी संपूर्ण तयारीने आपला विषय मांडला स्पर्धेचे परीक्षक म्हणून सौ. मीना भगत आणि सौ. शुभा साठे ह्यांनी काम केले.

स्पर्धा अतिशय रंगतदार होऊन पुढील विद्यार्थिनींनी गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे बक्षीस पटकावले. बक्षीस समारंभ डॉ. सौ. निलिमा कुळकर्णी ह्यांच्या हस्ते झाला. स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे. १. प्रथम क्रमांक : रेणुका उन्हेकर, सोमलवार हायस्कूल, खामला २. द्वितीय क्रमांक : वैशाली राहटे, राजेंद्र हायस्कूल ३. तृतीय क्रमांक : गौरी मुंजे, भिडे कन्या शाळा.

(१) भंडारा

विदर्भ साहित्य संघ शाखा भंडाराच्या वतीने सोमवार दि. ३१ जुलै १९८९ रोजी वि. वा. शिरवाडकर लिखित "कौंतेय" नाटकाच्या परीक्षणाचा कार्यक्रम सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात संपन्न झाला. अध्यक्षस्थानी ॲड्. श्री. सुधीर गुप्ते होते, तर माननीय श्री. प्रभाकरराव दाढी, प्राचार्य समर्थ महाविद्यालय, लाखनी हे या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते.

सौ. सुधा कापरे, कु. माधुरी सुतोने, श्री. विठ्ठल लांजेवार आणि सौ. कल्पना पनके यांनी "कौंतेय" नाटकासंबंधी आपापली मते सुरुवातीला व्यक्त केल्यानंतर प्रमुख वक्ते प्राचार्य दाढी यांनी "कौंतेय" नाटकाचा आधार घेऊन ललित वाङ्मयात रेखाटलेली कर्णाची व्यक्तिरेखा आणि मूळ महाभारतात कर्णाची व्यक्तिरेखा यावर आपले अभ्यासपूर्ण विचार मांडले. कार्यक्रमाला रसिक श्रोतृवृंद उपस्थित होता.

प्रमुख वक्त्यांचे स्वागत अध्यक्ष श्री. गुप्ते यांनी केले तर आभारप्रदर्शन सहकार्यवाह सौ. पनके यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन कार्यवाह कु. माधुरी सुतोने यांनी केले.

वि. सा. संघ शाखा भंडाराच्या वतीने दि. १९-८-८९ रोजी रात्री ८-३० वाजता सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात कविसंमेलन संपन्न झाले. या कविसंमेलनात श्री. प्रदीप गादेवार, कु. नीलिमा सुतोने, श्रीमती पांढरीपांडे, सौ. सरोज सर्वटे, श्री. विठ्ठल लांजवार, कु. माधुरी पांडे, शिक्षणाधिकारी, श्री. भाऊ गावंडे, श्री. हिंमत खवले, श्री. रणदिवे, सौ. कापरे, श्री. शंकरराव शहारे, श्री. क्षीरसागर, मुख्याध्यापक श्री. वैस, श्री. मिलिंद हरदास इत्यादी कवी-कवयित्रींना आपल्या कविता सादर केल्या. काही नवोदित कवींचा उस्फूर्त प्रतिसाद हे ह्या कविसंमेलनाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

कविसंमेलनाचे संयोजन सौ. कापरे यांनी तर आभारप्रदर्शन माधुरी सुतोने यांनी केले. अध्यक्षस्थानी शाखाध्यक्ष श्री. सुधीर गुप्ते होते.

(२) लाखनी

दि. २०-८-८९ रोजी लाखनी शाखेची आमसभा पार पडली. कार्यवाह श्री. बोरकर यांनी वर्षाचे कार्यवृत्त व कोषाध्यक्षांनी वार्षिक जमाखर्च सभेपुढे सादर केला. त्यावर साधकबाधक चर्चा होऊन त्याला मंजुरी देण्यात आली. याच सभेत श्री. वसंत कृष्णाजी हुकरे व कै. रामकृष्ण डोमाजी गायधनी या सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. शाखेचे पूर्वाध्यक्ष श्री. शिवणकर गुरुजी यांनी आपल्या दिवंगत पत्नी कै. सौ. शालिनीबाई शिवणकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ लाखनी शाखेस रुपये १००१/- (रुपये एक हजार एक) देणगी दिली. ती स्वीकृत करून श्री. शिवणकर यांच्या प्रती आभार व्यक्त करण्यात आले. प्रथम पूर्वाध्यक्ष श्री. हुकरे यांच्या नावाने शाखेच्या वर्धापन दिनी लाखनी केंद्रात मराठी विषयामध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला कै. वसंत हुकरे पारितोषिक देण्याचा व दरवर्षी २७ जानेवारीला शालिनी कथाकथन स्पर्धा घेऊन शालिनी शिवणकर पारितोषिक देण्याचा निर्णय घेण्यात आला. एका ठरान्वये श्री. द. सा. बोरकर यांची वि. सा. संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीवर निवड झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले. लोकचंद किरणापुरे ह्या हृदयरोगी

मुलाला उपचारार्थ शाखेने निधी गोळा केल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. दुसऱ्या एका, ठरावान्वये शाखेची सदस्य संख्या वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला.

(३) पुलगाव

वि. सा. संघाचे पुलगाव शाखेतर्फे सुप्रसिद्ध साहित्य समीक्षक डॉ. निर्मलकुमार फडकुले (सोलापूर) यांचे "साहित्य आपल्याला काय देते." या विषयावर अतिशय सुंदर व विवेचक व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार दि. २९ सप्टेंबर १९८९ रोजी आय. टी. आय. हॉल, पुलगाव येथे झाले. सभेस बराच श्रोतृवृंद उपस्थित होता.

इतर शाखांचे या कालावधीतील कार्यवृत्त हाती आले नाही.

जुलै १९८९ ते सप्टेंबर १९८९ या काळातील मान्य झालेल्या आजीव सदस्यांची यादी.

१. श्री. शिवाजी जवरे, दुसरबीड (जिल्हा बुलढाणा). २. श्री. वसंत विष्णू कुळकर्णी, नागपूर. ३. श्री. दिपक हरीष ढाणे, लाखनी (जिल्हा भंडारा). ४. श्री. दत्तात्रय वासुदेव काशीकर, चंद्रपूर. ५. श्री. अ. गो. उर्फ सुधिर गुप्ते, भंडारा. ६. श्री. संजय गुप्ते, भंडारा. ७. श्री. परशुराम कृष्णाजी लिमये, कल्याण (जिल्हा ठाणे). ८. श्री. अविनाश कृष्णराव देशपांडे, नागपूर.

सरचिटणीस

शुद्धिपत्रक

१. पृष्ठ ७ वरील शीर्षकात 'भ्रांतीमान' हा शब्द 'भ्रांतिमान' असा वाचावा.
२. पृष्ठ १२ वरील लेखात 'उध्वस्त' हा शब्द सर्वत्र 'उद्ध्वस्त' असा वाचावा.
३. पृष्ठ २६ वरील कॉलम २ ओळ क्र. १२ मध्ये Ranaissace हा शब्द Renaissance असा वाचावा.
४. पृष्ठ ५९ वर 'कथावस्तूचे मनोभाषावैज्ञानिक विश्लेषण' असे शीर्षक वाचावे.
५. पृष्ठ ६१ वरील अहवालात अंतिम निवडीत विचारास घेण्यात आलेल्या पुस्तकांच्या अगोदर डॅश हवा.
६. पृष्ठ ६७ वर १८ व्या ओळीत श्री समोरील स्वल्पविराम नको.
७. पृष्ठ ६९ वर पुस्तकाच्या माहितीत लेखक : माधव गडकरी असे हवे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची
ललितकलाविषयक प्रकाशने

अ.क्र.	प्रकाशनाचे नाव	लेखक	किंमत रु.
१.	लय ताल विचार	डॉ.श.वि. गोखले	८०/-
२.	तंजावूर नृत्य प्रबंध	श्री. पार्वतीकुमार	१६५/-
३.	माझा संगीत व्यासंग	श्री. गोविंदराव टेंबे	२८/-
४.	संगीत दर्पण	—	१५/-
५.	संगीत रत्नाकर भाग १	प्रा.ग.ह. तारळेकर	२९/-
६.	संगीत रत्नाकर भाग २	प्रा.ग.ह. तारळेकर	३०/-
७.	नाट्यमंडप (भरतमुनीप्रणित नाट्यमंडपम् चा अनुवाद)	डॉ.र.पु. कुलकर्णी	१५/-
८.	काश्यपशिल्प ("काश्यपशिल्पम्" या संस्कृत ग्रंथाचा अनुवाद)	डॉ.र.पु. कुलकर्णी	६०/-
९.	Life & Still Life (केकी मूस यांच्या छायाचित्रांचा संग्रह)	—	१००/- व १२५/-
१०.	प्रकाशचित्रण : एक कला माध्यम	श्री.के.बा. गोडबोले	२१०/-
११.	शंकर पळशीकर (चित्रसंग्रह)		९०/-
१२.	चित्रचिरंतन (श्री शुभराय महाराज यांच्या चित्रांचा संग्रह)	—	४०/-

साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने खालील केन्द्रांवर मिळतील

१. प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखन सामग्री विभाग,
चर्नी रोड,
मुंबई - ४०० ००४

२. व्यवस्थापक,
शासन लेखन सामग्री आणि ग्रंथागार,
शहागंज, गांधी चौक,
औरंगाबाद - ४३१ ००१

३. व्यवस्थापक
शासकीय ग्रंथागार
बडवे बिल्डिंग, पी.वाय्.सी. जिमखाना,
पुणे - ४११ ००४

४. व्यवस्थापक
शासन मुद्रण व ग्रंथागार,
सिव्हिल लाईन्स,
नागपूर - ४४० ००१

प्रकाशक मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर - ४४० ०१२
मुद्रक : मधुसूदन पाडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर - ४४० ०१२
मुखपृष्ठ मुद्रक : मधुकर आर्टस्, धंतोली, नागपूर - ४४० ०१२.

मुलाला उपचारार्थ शाखेने निधी गोळा केल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. दुसऱ्या एका ठरावान्वये शाखेची सदस्य संख्या वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला.

(३) पुलगाव

वि. सा. संघाचे पुलगाव शाखेतर्फे सुप्रसिद्ध साहित्य समीक्षक डॉ. निर्मलकुमार फडकुले (सोलापूर) यांचे "साहित्य आपल्याला काय देते." या विषयावर अतिशय सुंदर व विवेचक व्याख्यान झाले. या कार्यक्रमाचे आयोजन शुक्रवार दि. २९ सप्टेंबर १९८९ रोजी आय. टी. आय. हॉल, पुलगाव येथे झाले. सभेस बराच श्रोतृवृंद उपस्थित होता.

इतर शाखांचे या कालावधीतील कार्यवृत्त हाती आले नाही.

जुलै १९८९ ते सप्टेंबर १९८९ या काळातील मान्य झालेल्या आजीव सदस्यांची यादी.

१. श्री. शिवाजी जवरे, दुसरबीड (जिल्हा बुलढाणा). २. श्री. वसंत विष्णू कुळकर्णी, नागपूर. ३. श्री. दिपक हरीष ढाणे, लाखनी (जिल्हा भंडारा). ४. श्री. दत्तात्रय वासुदेव काशीकर, चंद्रपूर. ५. श्री. अ. गो. उर्फ सुधिर गुप्ते, भंडारा. ६. श्री. संजय गुप्ते, भंडारा. ७. श्री. परशुराम कृष्णाजी लिमये, कल्याण (जिल्हा ठाणे). ८. श्री. अविनाश कृष्णराव देशपांडे, नागपूर.

सरचिटणीस

शुद्धिपत्रक

१. पृष्ठ ७ वरील शीर्षकात 'भ्रांतीमान' हा शब्द 'भ्रांतिमान' असा वाचावा.

२. पृष्ठ १२ वरील लेखात 'उध्वस्त' हा शब्द सर्वत्र 'उद्ध्वस्त' असा वाचावा.

३. पृष्ठ २६ वरील कॉलम २ ओळ क्र. १२ मध्ये Ranaissace हा शब्द Renaissance असा वाचावा.

४. पृष्ठ ५६ वर 'कथावस्तूचे मनोभाषावैज्ञानिक विश्लेषण' असे शीर्षक वाचावे.

५. पृष्ठ ६१ वरील अहवालात अंतिम निवडीत विचारास घेण्यात आलेल्या पुस्तकांच्या अगोदर डॅश हवा.

६. पृष्ठ ६७ वर १८ व्या ओळीत श्री समोरील स्वल्पविराम नको.

७. पृष्ठ ६९ वर पुस्तकाच्या माहितीत लेखक । माधव गडकरी असे हवे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची
ललितकलाविषयक प्रकाशने

अ.क्र.	प्रकाशनाचे नाव	लेखक	किंमत रु.
१.	लय ताल विचार	डॉ.श.वि. गोखले	८०/-
२.	तंजावूर नृत्य प्रबंध	श्री. पार्वतीकुमार	१६५/-
३.	माझा संगीत व्यासंग	श्री. गोविंदराव टेंबे	२८/-
४.	संगीत दर्पण	—	१५/-
५.	संगीत रत्नाकर भाग १	प्रा.ग.ह. तारळेकर	२९/-
६.	संगीत रत्नाकर भाग २	प्रा.ग.ह. तारळेकर	३०/-
७.	नाट्यमंडप (भरतमुनीप्रणित नाट्यमंडपम् चा अनुवाद)	डॉ.र.पु. कुलकर्णी	१५/-
८.	काश्यपशिल्प ("काश्यपशिल्पम्" या संस्कृत ग्रंथाचा अनुवाद)	डॉ.र.पु. कुलकर्णी	६०/-
९.	Life & Still Life (केकी मूस यांच्या छायाचित्रांचा संग्रह)	—	१००/- व १२५/-
१०.	प्रकाशचित्रण : एक कला माध्यम	श्री.के.बा. गोडबोले	२१०/-
११.	शंकर पळशीकर (चित्रसंग्रह)		९०/-
१२.	चित्रचिरंतन (श्री शुभराय महाराज यांच्या चित्रांचा संग्रह)	—	४०/-

साहित्य आणि संस्कृती मंडळाची प्रकाशने खालील केन्द्रांवर मिळतील

१. प्रकाशन व्यवस्थापक,
शासन मुद्रण व लेखन सामग्री विभाग,
चर्नी रोड,
मुंबई - ४०० ००४

२. व्यवस्थापक,
शासन लेखन सामग्री आणि ग्रंथागार,
शहागंज, गांधी चौक,
औरंगाबाद - ४३१ ००१

३. व्यवस्थापक
शासकीय ग्रंथागार
वडवे बिल्डिंग, पी.वाय्.सी. जिमखाना,
पुणे - ४११ ००४

४. व्यवस्थापक
शासन मुद्रण व ग्रंथागार,
सिव्हिल लाईन्स,
नागपूर - ४४० ००१

प्रकाशक मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर- ४४० ०१२
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर- ४४० ०१२
मुखपृष्ठ मुद्रक : मधुकर आर्टस, धंतोली, नागपूर- ४४० ०१२.

भिंत खचली, कलथून खांब गेला
जुनी पडकी उद्ध्वस्त धर्मशाला
तिच्या कौलारी बसुन पारवा तो
खिन्न नीरस एकांत गीत गातो

सूर्य मध्यान्ही नभी उभा आहे
घार मंडळ त्याभवती घालिताहे
पक्षि पानांच्या आंत सावल्यांत
सुखे साखरझोपेत पेंगतात

तुला नाही परी हौस उडायची
गोड हिरव्या झुबक्यात दडायची
उष्ण झळ्या बाहेर तापतात
गीतनिद्रा तव आंत अखंडीत

चित्त किंवा तव कोनत्या विकारे
दुखवि खुपदे का सांग, सांग बा रे!
तुला काही जगतात नको मान?
गोड गावे मग भान हे कुठून

झोप सौख्यानंतर [illegible] मानवाची
पुरी क्षणही को[illegible]कायची?
दुःखनिद्रे निद्रि[illegible]
[illegible]



दुःखनिद्रा ती शांत [illegible]